तिहास-संशोधक-मंडळ स्वीय ग्रंथमाला क्र. ५४

Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-194745

# पुणें नगर संशोधन वृत्त

संपादक व प्रकाशक
चिंतामण गणेश कर्वे,
चिटणीस, नगर संशोधन समिति,
भा. इ. सं. मंडळ, पुणें

मुद्रक
विठ्ठल हरि बर्वे,
ालय, ११५।१ शिवाजीनगर, पुणें ४

U8.23156cp.N4
H2
194745

शक १८६४ ]    किंमत १ रुपया    [ इ. १९४२

# निवेदन

'**पुणें नगर संशोधन समिति**' या भा. इ. सं. मंडळाच्या विशेष समितीच्या द्वारें जें पुणेंनगरविषयक संशोधन-संकलन झालें त्याचा पहिला खंड प्रसिद्ध झालेला पाहून एका नव्या दिशेनें मंडळानें पुढें पाऊल टाकिलें, असें सर्व अभ्यासप्रियजनांस वाटेल. नगर संशोधन किंवा ग्रामस्थल संशोधनासारखें संशोधन हा व्यापक संशोधनाचा पायाच आहे, या दृष्टीनें या विषयीचें महत्त्व थोडक्यांत दर्शविण्याचा प्रयत्न 'संपादकीय प्रस्तावां'त झालेलाच आहे. पुण्याप्रमाणेंच नाशिक, कोल्हापूर इत्यादि महाराष्ट्रांतील प्राचीन शहरीं प्रयत्न व्हावे अशी आमची अतिशय तीव्र इच्छा आहे; आणि त्या दिशेनें कांहीं प्रयत्नहि आम्हीं चालू टेविले आहेत. पुण्यांतच अधिक प्रयत्न आम्हांस साध्य होण्यासारखा होता. परंतु अन्यत्र असे आणि त्या त्या नगरांच्या प्राचीनत्वाच्या मानानें याहूनहि विस्तृत प्रमाणांवर संघटित प्रयत्न व्हावयास पाहिजेत. पुण्याच्या आमच्या प्रयत्नास व इतरत्र करावयाच्या अशा प्रयत्नांस मार्ग-दर्शक होण्याच्या दृष्टीनें कांहीं विवेचन येथें करणें उपयुक्त होईल.

पुण्याविषयीं माहिती देणारें **सर्वांत जुनें छापील पुस्तक** म्हटलें म्हणजे **इ. स. १८६८** सालीं कै. नारायण विष्णु जोशी यांनीं लिहिलेलें 'पुणें शहराचें वर्णन' हें होय. त्यानंतर सरकारी ग्रामवृत्तमाला-**ग्याझिटीअर्स** इंग्रजींत १८८५ चे सुमारास क्यांबेलसाहेब यांच्या देखरेखीखालीं तयार होऊन प्रसिद्ध झालीं. या मालेंत पुण्याच्या वांट्याला तीन खंड आलेले आहेत. सुमारें **इ. स. १८८८** मध्यें कै. सीताराम गायकवाड या गृहस्थांनीं '**पुणें वर्णन**' लहान लहान दोन भागांत लिहून मराठींत प्रसिद्ध केलें.

याशिवाय पूना डिरेक्टरी, पूना गाइड या नांवाचीं लहानमोठीं पांच चार चोपडीं इंग्रजींत व क्वचित् मराठींतहि झालेलीं आहेत. श्री सयाजी साहित्यमालेंतहि एक छोटेंसें पुस्तक पुण्यावर प्रसिद्ध झालें आहे. कै. हरिभाऊ भागवत यांचें पुण्या-संबंधींचें पुस्तक अर्वाचीन पुण्याचीच माहिती विशेषेंकरून देण्यासाठीं लिहिलेलें आहे. इ. स. १९३५ सालीं अखिल भारतीय इतिहास परिषद् भरली त्यावेळीं येथील केसरी-मराठा संस्थेतर्फे एक सचित्र 'पूना गाइड' इंग्रजींत प्रसिद्ध करण्यांत आलें आहे आणि त्यानंतर अखिल भारतीय भौतिकशास्त्र परिषदेच्या निमित्तानें मुंबई-पुणें या नगरांची सजोड माहिती देणारें एक इंग्रजी पुस्तकहि प्रसिद्ध झालेलें आहे.

एखाद्या नगराचा कारभार करणाऱ्या संस्थेजवळ त्या नगरांतील प्रत्येक घर, चबूतरा, रस्ता, गल्ली, देऊळ, मशीद, विहीर, बाग, पार, चावडी, चौकी, स्मशानें, नद्या,

पूल, ओढा, नाला, धर्मशाळा, तालमी, शाळा, तुरुंग, कारखाने, बाजार, दवाखाना, मंडई, नाकें, वाहन, दुकान, किंबहुना मनुष्य व जनावर यांबाबत माहितीची नोंद असावी लागते. नगरकारभारांत, मुलांच्या शिक्षणाचा व नागरिकांच्याहि शिक्षणाचा समावेश होतो आणि अशा शिक्षणासाठीं आणि एकंदर व्यवहारासाठीं आपल्या नगराविषयीं सर्व प्रकारची साधार, सप्रमाण, यथार्थ आणि इत्यंभूत माहिती नागरिकांस असणें त्यांच्या सुशिक्षणाचे दृष्टीनें किती आवश्यक आहे हें निराळें वर्णन करून सांगावयास नको. या दृष्टीनें नगर संस्थांनीं या नगर-ज्ञानसंग्रहास आणि प्रसारास तें आपलेंच कार्य समजून जेवढें साहाय्य करतां येईल तेवढें केलें पाहिजे; एवढेंच नव्हे तर या कामाचा हरतऱ्हेनें पुरस्कार केला पाहिजे. प्रस्तुतच्या नगर-कारभार-कायद्याप्रमाणें असें काम या संस्थांना करण्यास मुभा आहे.

पुणेंनगर-संस्थेनें 'पुणें वर्णन' तयार करण्यासाठीं एक बक्षीस कांहीं वर्षांपूर्वी लाविलें होतें. त्यास अनुसरून कै. केळकर नांवाच्या एका गृहस्थानीं कांहीं मजकूर लिहून दिला. त्यांतील कांहीं भाग '**पुणें म्युनिसिपल गॅझेट**' नामक पत्रिकेंत पुणें म्युनिसिपालिटीनें प्रसिद्धहि केला होता. परंतु केळकर यांचे प्रयत्न शास्त्रीय कसोटीवर लावण्यासारखे नव्हते. परंतु पुणें म्युनिसिपालिटीनें इष्ट दिशेनें प्रारंभ केला होता यांत संशय नाहीं. पण तो प्रयत्न तसाच राहिला.

स्वतंत्र पुस्तकें सोडलीं तर पुणेंशहरविषयक टांचणवजा माहिती बरीच विखुरलेली अशी सांपडेल. उदा. **लोकहितवादी** रा. गोपाळ हरी देशमुख यांचे विविध लेख. निरनिराळ्या घराण्यांचे इतिहास हल्लीं तयार होत आहेत, त्यांतहि कांहीं प्रासंगिक माहिती येते. तसेंच पूर्वी निरनिराळ्या कारणानें पुणें शहरीं अनेक प्रवासी येऊन गेले. त्यांच्या प्रवासवृत्तांत कांहीं उपयुक्त व कधीं कधीं समक्ष पाहिलेल्या व ऐकलेल्या माहितीची नोंद आढळून येते. उदा. लॉर्ड व्हॅलेंशिया, ईस्ट इंडिया कंपनीचे मॅलेटसारखे जे वकील वगैरे लोक पुण्यांत राहिले त्यांच्या पत्रव्यवहारांतूनहि व चरित्रांतून कांहीं माहिती आढळून येते. पण ती प्रासंगिक व थोडीच असणार.

प्रामाण्याचे दृष्टीनें विचार केला असतां सरकारी ग्याझिटीअर्समधील माहिती सर्वांत अधिक साधार मानण्यास चिंता नाहीं. सदर ग्रंथांतून आधारांची नोंदहि तळटीपांत जागजागीं केलेली दृष्टीस पडते. कै. जोशी यांनींहि कांहीं जुने कागद पाहून माहिती दिली होती. या प्रयत्नांमुळें कांहीं साधार माहिती आपणांस उपलब्ध आहे. परंतु ती फार अल्प आहे. आणि साधारणपणें आहे तेथें सुद्धां कच्चेपणा, उणीवा किंवा चुका नाहींतच असें पुढील शोधावरून आढळत नाहीं. उदाहरणार्थ, शनवारवाडा जळून गेला त्याची नक्की तारीख व साल. आज त्या वाड्यावर सरकारी गील्या लागलेल्या शिलालेखांत दिलेली तारीख व साल चुकीचें ठरत आहे. एवढ्या मोठ्या याची-

संबंधांत हा अनुभव येतो तर इतर अनेक बाबींसंबंधानें अधिक बोलावयासच नको. तात्पर्य काय, फार बारकाईनें व अनेक भरंवसेलायक प्रमाणें पाहून आपणांस सर्व माहिती जुळविली पाहिजे. छापील व आजवर उपलब्ध झालेली माहिती कोठें आहे तें वर सांगितलेंच आहे. पण सांगोपांग व साधार माहिती जर जुळवावयाची तर कोणत्या दिशेनें प्रयत्न केला पाहिजे तें पुढें पाहूं.

( १ ) प्रथम **सरकारी पेशवे दप्तर** पाहिलें पाहिजे. या दप्तरांतील उपयुक्त माहिती आजवर बरीच प्रसिद्ध झाली आहे. ती सर्व महत्त्वाची आहे. परंतु या दप्तरांत खुद्द पुणें शहराबाबतचेच सुमारें २०० रुमाल आहेत. त्यांची तपासणी व्हावयास पाहिजे. कांहीं निमित्तानें पुणें येथील गोखले इकॉनॉमिक इन्स्टिट्यूटनें या दप्तरांतून कांहीं माहिती मिळविली आहे. (त्यांतील कांहीं भाग या पुस्तकांत पुढें दिला आहे). आणि अजून पुष्कळ महत्त्वाचा भाग छापण्याजोगा शिल्लक आहे. श्री. डिसकळकर, प्रो. चिं. ब. जोशी, श्री. रु. वा. पुरंदरे, प्रो. द. वा. पोतदार, श्री. शं. ना. जोशी प्रभृति मंडळींनीं अधून मधून हीं दप्तरें पाहून कांहीं माहिती मिळविली आहे. त्यांतील बरीच अद्यापि प्रसिद्ध व्हावयाची आहे. परंतु हें दप्तर म्हणजे सप्रमाण माहितीचें एक अमोलिक भांडार आहे यांत संशय नाहीं.

( २ ) **पुणें पेठ कुलकर्णी यांचीं दप्तरें** जर मिळतील तर प्रयत्न केला पाहिजे. पेशवे दप्तरांत आज जे रुमाल आहेत त्यांत पेठ कुलकर्ण्याकडील कागद आढळतात. बरेच कागद प्लेगसारख्या आपत्तींत आणि अज्ञानामुळें जळून, कुजून किंवा वाण्याकडे जाऊन नष्ट झाले आहेत. पण अद्यापिहि कांहीं गळाठा शिल्लक सांपडेल. पेठ कुलकर्ण्यांचें मनापासून साहाय्य झालें पाहिजे.

( ३ ) **सरकारी खात्यांचीं दप्तरें** माहितीनें भरलेलीं आहेत. सर्वच कागद पेशवे दप्तरांत आले नाहींत. कांहीं जिल्हा दप्तरांत, कांहीं मुंबईच्या सेक्रेटरीएट दप्तरखान्यांत आणि कांहीं अद्यापिहि त्या त्या खात्याकडेच सांठवून पडले आहेत. इंग्रजी आमदानीच्या पहिल्या विशी-पंचविशींत म्हणजे कमिशनरी अंमल होता त्यावेळीं आजच्या इतकीं खातें-विभागणी नव्हती. सरकारी योजना, खातें-विभागणी वगैरेंत वारंवार पुष्कळच बदल झालेले आहेत. त्यामुळें जुने जुने कागद व दप्तरें अशोधित परंतु संग्रहीत अवस्थेंत जागजागीं पडून आहेत. उदाहरणार्थ, **नवें रस्ता-इमारत-खातें** झालें त्यावेळीं अनेक जुने वाडे, हुडे, तटीं, देवळें, बागा पाडल्या मोडल्या आणि नवी मांडणी झाली. जुन्या इमारतींचें सामान लिलावांत गेलें!! याची नोंद त्या त्या दप्तरांत अवश्य मिळाली पाहिजे. जरी पुष्कळ जुने कागद अधून मधून निरुपयोगी म्हणून नष्ट करण्याची चाल निरनिराळ्या सरकारी खात्यांतून चालू होती व आहे, तथापि जे संग्रह आज आहेत त्यांतहि खात्रीनें पुष्कळ माहिती दडलेली आहे.

एंजिनिअर खात्याच्याच रिपोर्टांतून बाजीरावाच्या पुणें शहरांतील वाड्यांच्या दुरुस्तीची जी नोंद या ग्रंथांत दिली आहे ती या प्रकरणीं मार्गदर्शक होईल.

कमिशनरी अमलांत पुण्यांतील जुने वाडे जे सरकारनें ताब्यांत घेतले होते त्यांस दरसाल दुरुस्ती होत असे आणि त्याचीं एस्टिमेटें (अंदाज खर्डे) तयार होत होतीं. अशा नोंदी आमचे पाहण्यांत सरकारी कमिशनरी पत्रव्यवहार आला तेव्हां आम्हांस आढळल्या आहेत. एस्टिमेटांबरोबर नकाशेहि जोडल्याचे उल्लेख आढळले, पण हे नकाशे सोबत नव्हते. ते जर असतील व मिळतील तर पेशव्यांच्या वाड्यांचे पेशवाई अखेरीचें बरेचसें नक्की चित्र आपणांसमोर उभें राहील. कारण वस्तुस्थितीचेच नकाशे मिळतील.

**( ४ ) पी. डब्ल्यू. डी.**–एंजिनिअरिंग खात्याप्रमाणेंच **सर्व्हे-मोजणी** खात्याचें दप्तरहि पाहाण्यास मिळविलें पाहिजे. या मोजणी खात्यांत घरांच्या, बागांच्या, मोजमापाचे कागद मिळतील. इतकेंच काय पण मोजमापावरून काढलेले आराखडे व नकाशेहि मिळतील. ' मुंबई सेक्रेटरीएट ' मध्यें नकाशांचा प्रचंड सांठा आहे. तो कधींच तपासलेला किंवा पाहिलेला नसावासें वाटतें; त्यांत किती तरी नोंदी मिळतील. सरकारनें नव्या नव्या योजना, कालव्याच्या, पाण्याच्या, रस्त्याच्या वगैरे केल्या त्यासाठीं जी पाहाणी झाली त्याचेहि कागद-नकाशे मिळविले पाहिजेत. अशा एका रिपोर्टांतच शिंद्यांच्या वानवडीच्या वाड्याची नोंद केलेली आढळली ती या ग्रंथांत दिली आहे. त्याहून निराळा पुरावा आज त्या वाड्याबाबत त्याचा साक्षात् पडका भाग आज उभा असतांनाहि शाबिती करण्याजोगा शिंदे सरकारांनाहि दाखविणें आज कठिण होत आहे ! !

**( ५ ) कागद-नोंदणी रेजिस्ट्रेशन खातें**— याकडे जुने हक्कासंबंधीं कागद, गहाण विक्री-खरेदीचीं खतें, नोंदणीस येतात. त्या दप्तरांतहि तपास केला पाहिजे. फार महत्त्वाची माहिती सांपडेल.

म्युनिसिपालिट्यांची स्थापना बरीच पुढच्या काळांतली आहे. त्यामुळें त्या दप्तरांतून जुनी माहिती फार थोडी आढळते. पण जी आहे ती पाहिली पाहिजे.

एवंच, **अनेक सरकारी खात्यांचीं दप्तरें या कामासाठीं पाहाण्याची परवानगी, सोय व व्यवस्था झाली पाहिजे.** मग परिश्रम करून थोडथोडी उपयुक्त माहिती निवडून एकत्र केली पाहिजे.

( ६ ) वादाच्या निमित्तानें अनेक कागदपत्रें, कैफियती, साक्षी वगैरे न्यायालय दप्तरांत येतात. त्यांत फार उपयुक्त माहिती आढळते म्हणून **न्यायालय दप्तरें**–तालुका– जिल्हा आणि वरिष्ठ हायकोर्ट येथील दप्तरें हीं तपासलीं पाहिजेत.

( ७ ) **खाजगी दप्तरें** वरील माहितीच्या पुरवणीला फार उपयोगी पडतील. आजच्या स्थावराच्या मालकांकडे भोगवट्यांचें जुनें कागदपत्र असतील तें त्यांचें कडून मिळवून त्यांतील चतुःसीमा, स्थल, काल, व धारकव्यक्ति यांचे उल्लेख नोंदून प्रसिद्ध केले पाहिजेत. अगदीं अलीकडील कागद प्रसिद्ध करण्याची तादृश्य गरज नाहीं, आणि जुन्या कागदांतील मजकुरहि निवडक व आवश्यक तेवढा प्रसिद्ध केल्यास अधिक माहिती देतां येईल. बाकीचा भाग संग्रहीं दप्तरीं ठेवून द्यावा. पण असे खाजगी कागदपत्र आम्हांस दाखविण्यास लोकांनीं हौसेनें व निःशंकपणें पुढें आले पाहिजे म्हणजे आम्हांस मोठें सहाय्य मिळेल यांत संदेह नाहीं. यासाठीं कांहीं लोकजागृति व लोकशिक्षणाचे प्रयत्न करावे लागतील.

( ८ ) कागदी व सप्रमाण माहिती मिळत नसेल तेथें **वृद्धवचन-आख्यायिका** मिळतील तर त्यांचाहि संग्रह केला पाहिजे.

( ९ ) त्याबरोबरच **वाङ्मयांतहि कांहीं सामान्य व विशेष स्वरूपाची माहिती** आढळते. राम जोशीच्या ' ब्राह्मणी व जोगदारी ' सारख्या लावण्यांतून किंवा नारायणरावाचा वध वगैरेसारख्या काव्यांतून किंवा क्षेत्र, नदी, तीर्थ-महात्म्यादि ग्रंथांतूनहि विवेचक बुद्धीनें माहिती निवडून घेतली पाहिजे.

(१०) माहितीचा संग्रह झाला तथापि त्या माहितीच्या आधारें स्थलांची प्रतवारी, जानवारी वगैरे लावून मोजमापांसह नकाशे वगैरे तयार करून पूर्ण सजावट करावी तेव्हां त्यावेळचें पुण्यासारखें शहर आपल्या डोळ्यांसमोर यथार्थपणें उभें राहील. मधून मधून अद्यापिहि जीव धरून असणाऱ्या **अवशेषांची छायाचित्रेंहि** घेऊन छापलीं पाहिजेत. तसेंच आजच्या नकाशाशीं जुन्या वस्तुस्थितीचा मेळ पाहून समजून पडेल अशी वास्तव्यबोधक चित्रें व नकाशे तयार करून दिले पाहिजेत.

एवढें काम करावयाचें तर केवढी दगदग पडेल, जिकीर करावी लागेल व धारकावा राखावा लागेल याची कल्पनाच केलेली बरी. एखाद्या स्वतंत्र मंडळाचेंच हें काम आहे. तथापि हिंय्या करून आमच्या मंडळानें कामास हात तर घातला आहे. **रा. कर्वे** यांनीं उत्साहानें हा भारहि शिरावर घेतला खरा, तथापि त्यांस साहाय्य करणारी मंडळी पुढें यावयास पाहिजेत. पुणेंनगरसंस्थेनें आपलें दप्तर पाहाण्याची परवानगी आम्हांस दिली आहे. पेठवार छापील नकाशांचे आराखडेहि आम्हांस विनामूल्य दिले आहेत. आणि थोडीशी आर्थिक मदतहि केली आहे. नगरसंस्थेचें साहाय्य हाच आमचा मुख्य अपेक्षित आधार आहे. नगरसंस्थेकडे निरनिराळीं खातीं-मोजमाप घेणारे, नकाशे काढणारे वगैरे सरंजाम थोडाबहुत तरी असतोच, त्यांचेंहि साहाय्य आम्हांस मिळेल अशी गरज हळूं हळूं पडेल व तें आम्हांस मिळेल असा भरंवसा आम्हांस वाटत आहे. नगरसंस्थेनें आम्हांस आपल्यातर्फे कार्यासाठीं गैरसर योजनाच करून द्यावी म्हणजे

अधिक व्यवस्थितपणें व हुरुपानें काम करतां येईल. शिक्षणासाठीं **जुन्या पुण्याच्या स्लाइड्स** देखील तयार केल्या पाहिजेत. जुन्या नगरविषयक वस्तूंचें, चित्रांचें, नकाशांचें एक **प्रदर्शन-म्युझियमहि** सिद्ध केलें पाहिजे. हा विषय नगरसंस्थेनें तिच्या अनेक जिव्हाळ्याच्या विषयांपैकीं एक मानून त्याचा सर्वतोपरी पुरस्कार केला पाहिजे. असा पुरस्कार करण्यास पुणेंनगरसंस्थेनें शुभारंभ तर केलाच आहे. आतां इतर नगरसंस्थाहि याच मार्गानें आपलीं पाऊलें टाकतील आणि स्थानिक उत्साही कार्यकर्ते पुढें येतील तर अन्य प्रसिद्ध स्थळींहि असेच उपक्रम हातीं घेतां येतील. आमच्याकडून जें अल्पस्वल्प साहाय्य होण्यासारखें असेल तें आम्ही अवश्य करूं. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स वगैरे देशांत अशीं कार्यें अनेक रीतीनें झालेलीं आहेत आणि स्थानिक माहितीचे प्रचंड खंड प्रसिद्ध झालेले आहेत. आपणांसहि आपलें कर्तव्य केलें पाहिजे. आमच्या उणीवांची आम्हांस जाणीव आहे. आणि जसें मनुष्य-बळ आणि द्रव्यबळ अनुकूल होईल तसें आम्ही अधिक भरीव असें कार्य करून दाखवूं अशी उमेद आम्हांस आहे.

पुणें
ज्येष्ठ वा ११।१८६४

**दत्तो वामन पोतदार,**
कार्याध्यक्ष, भा. इ. सं. मंडळ, पुणें.

# संपादकीय प्रस्ताव

जागतिक संशोधनांत नगरसंशोधनाला किती कमी महत्त्व आहे याची जाणीव असूनहि नगरसंशोधनाचें कार्य चालविलें जातें. राष्ट्राचा इतिहास एकदम व मोठा विस्तृत होऊं शकत नाहीं. त्याला व्यक्ती, घराणीं, गांवें, शहरें, तालुके, जिल्हे, प्रांत, देश यांच्या बारीकसारीक माहितीची जोड देऊन शेवटीं एकत्र, एका दृष्टींत या सर्वांची पाहाणी करावी लागते. तेव्हां तो खरा संकलित राष्ट्रेतिहास होतो. कण कण वेंचून धन जमतें.

पूर्वीचीं क्षेत्रमाहात्म्यें हीं याच इतिहासांत बसतात. त्यांच्यांतील पौराणिक भाग काढून टाका म्हणजे तो इतिहास-भूगोलच आहे. आजहि अशीं ऐतिहासिक राजकीय क्षेत्रमाहात्म्यें नव्या दृष्टीनें तयार केलीं पाहिजेत. आपण प्रथम आपल्यापासूनच इतिहासाच्या अभ्यासाला सुरुवात करावी. आपल्या पायाशीं काय जळतें ( ! ) हें पाहूनच डोंगर विझवावयास धांवावें.

आपण ज्या गांवांत राहतों तें गांव किती जुनें आहे, त्याचा उल्लेख कोठें शिलालेख, ताम्रपट यांत किंवा निदान जुन्या कागदपत्रांतून आढळतो कीं काय, हें प्रत्येक सुशिक्षित गांवकऱ्यानें समजून घेतलें पाहिजे. शाळेंतलि शिक्षकांनीं भूगोल-इतिहासास आरंभ करतांना प्रथम आपल्या गांवाचा भूगोल आणि इतिहास मुलांस शिकविला पाहिजे. इंग्लंडांतील गांवांची माहिती तोंडपाठ, पण आपल्याच गांवांतील इतिहासप्रसिद्ध स्थळांचींहि नांवें माहित नाहींत, अशी आज कित्येक ठिकाणीं स्थिति आढळून येत असल्यानें खेद होतो. गांवांतील मंदिरें आणि जुन्या वास्तु यांची चांगली माहिती इंग्रजी गॅझेटिअरमध्यें दिलेली असते; तेवढी देखील आमच्या शिक्षकांना किंवा सुशिक्षित म्हणविणाऱ्यांना नसते, याची लाज वाटावयास पाहिजे. परका प्रवासी गॅझेटिअर-गाईडवरून गांवाचा इतिहास समजावून घेतो व मग त्याच्या अनुरोधानें गांवाची पाहणी करूं लागतो. कांहीं शंका तो साहजिक गांवकऱ्यांना नव्हे, गांवाच्या प्रतिष्ठित पुढाऱ्यांना विचारतो, पण त्यांना कोठें काय माहीत असतें ! त्या उपऱ्या माणसाला जितकें गांवाचें ज्ञान तितकेंहि या स्थायिकांना नसतें ! या गोष्टीची कोणाला जरूरीच वाटत नाहीं.

पुण्याचीच गोष्ट घ्या. हें त्रिखंड गाजलेलें इतिहासप्रसिद्ध ठिकाण. हिंदुस्थानांत मोठें साम्राज्य स्थापन केलेल्या पेशव्यांची ही राजधानी. भोसले, शिंदे, होळकर, गायकवाड, निंबाळकर, घोरपडे, जाधव, पोवार, भोइटे, चव्हाण, पटवर्धन, प्रतिनिधि, पंतसचिव, रास्ते, विंचुरकर, पानसे, मेहेंदळे, फडणीस, फडके, बिनिवाले इ.

संस्थानिक–सरदार–दरकदार व सरकारी बावनपागा, यांचे तळ पुण्यास सारखे पडलेले असत. इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीज, निजाम, यांसारख्या परराष्ट्रांचे वकील येथें राहत. या सर्वांचे वाडे, आणि लष्करें पुण्यास असत. खुद्द पेशव्यांचे चार–पांच वाडे मोठ्या पेठांतून होते. श्रावण मासांत लाखों रुपये दक्षिणा पेशवे सरकार वांटीत. हजारों शास्त्रीपंडित साऱ्या हिंदुस्थानांतून पुण्यास या दक्षिणेसाठीं येत व महिनोमहिने मुक्काम ठोकीत. या दक्षिणेच्या खैरातीसाठीं पर्वतीच्या पायथ्याशीं मोठा रमणा बांधला होता. त्या वेळीं शनवारवाड्याचें वैभव केवढें थोरलें! खुद्द वाड्यांत सुमारें दीड दोन हजार माणूस असे. आंत प्रत्येक खाशाचे महाल वेगळे. कात्रजचें पाणी दगडी नळांतून आणून वाड्यांत खेळविलेलें. वेगवेगळ्या आकारांचीं अनेक कारंजीं. पुढल्या चौकांत कारकुनी फड. अनेक परराष्ट्रांचीं, मराठ्यांच्या सरदारांचीं आणि महालांचीं खातीं त्यांत लाविलेलीं. आरसेमहालांत श्रीमंत बसत. दरबारचा दिवाणखाना केवढा प्रचंड होता! सवाई माधवरावाच्या लग्नांत त्यांत पन्नास 'सोन्याची काठी' (राजेरजवाड्यांच्या काठ्या घेतलेले चोपदार) उभी राहिली होती. रुप्याचे काठीवाले किती, याची गणतीच नव्हती. तटाच्या बाहेर चौगीर्दीला हशमांच्या छपरबंदी असत. शहरांत पेठापेठांतून चौक्या व सरकारी झेंडे असत. आजच्या पेक्षांहि जास्त पर्वती टेकडी सर्व सुखसोयींनीं नटलेली असे. खालीं जलविहारासाठीं तळें व त्याकांठीं हिराबाग होती. दुसऱ्या बाजीरावानें कोथरूडलाहि एक सुंदर बाग व जलमंदिर केलें होतें. शहरांत व बाहेर पर्वतीजवळ मोठा शिकारखाना होता. वाघ किती तरी होते. हत्तींच्या व एडक्यांच्या टक्करा होत. वानवडीस शिंद्यांनीं उत्तर हिंदुस्थानांतील खेळ–विलास कसे असतात हें दाखवून दिलें होतें. बालपेशव्यास त्यांनीं दारूची लंका कशी असते हें रमण्यांत दारूकाम सोडून एकदां प्रत्यक्षहि दाखविलें. दारूचा हनुमंत आपली जळती शेंपटी घेऊन उड्डाण करूं लागला तेव्हां दारूलंकेंतील घरें भराभर पेटूं लागलीं व अलम पुण्यानें डोंगरावर जागजागीं बसून हा तमाशा पाहिला. असो. तेव्हां या पेशवाईतील पुण्याचा मागोवा आज घेऊं म्हटलें तर कितपत शक्य आहे! सरकारवाडे जळाले, सरदारांचे वाडे पडले, लष्करी तळ हालले, रस्ते बदलले, पेठांच्या मर्यादा कमी अधिक झाल्या व देवळें आणि त्यांतील देव काय ते आपल्या नवीन नवीन येणाऱ्या मालकांना भाड्याचें व इतर उत्पन्न देतात म्हणूनच कायम उभे आहेत! पेशवाईच्या मागें शिवाजीच्या कालांतील पुण्याचे अवशेष किती आहेत! त्याच्या लालमहालाचे पहिल्या बाजीरावाचे वेळींच नुसते चौथरे व आंतील कांहीं कारंजीं शिल्लक होतीं. जुन्या कसब्याभोंवतीं पांढरीचा कोट जो होता तो आज पायांतच असेल. औरंगजेबानें वसविलेली मोहियाबाद ऊर्फ बुधवार पेठ आज वेगळ्या मर्यादेंत आणि स्वरूपांत आहे. शहाजीची शहापूर पेठ आणि मलिकंबराची मलकापूर ऊर्फ मलिक पेठ आज नामांतर पावल्या आहेत.

मावळतवेस व केदारवेस कुंभारवेशीप्रमाणें नामशेषहि नाहींत. तेराव्या शतकांत देवळांचें रूपांतर पावलेले शेखसल्ला दर्गे मात्र मुसलमानांनीं टिकविले आहेत. याप्रमाणें पुण्यांतील कित्येक जुनीं स्थळें सांगतां येतील.

तीं केव्हां झालीं व कशीं होतीं, हें समजून घेण्यास जुने कागदपत्र पाहिले पाहिजेत. घराण्याचे इतिहास तपासले पाहिजेत व व्यक्तींचीं चरित्रें संशोधिलीं पाहिजेत. एवढा खटाटोप केल्यास जुनें पुणें आपल्यापुढें उभें राहील व आपल्या स्वाभिमानांत मोठी भर पडेल. आज अशी स्थिति आहे कीं, पुण्याचा सुसंगत इतिहास उपलब्ध नाहीं, लिहिलेला नाहीं किंवा लिहिण्याची तयारी नाहीं. मराठी साम्राज्याच्या प्रत्यक्ष राजधानीची ही दशा तर सातारा, कोल्हापूर, नागपूर या इतर राजधान्यांची काय स्थिति असेल !

एखाद्या गांवचा इतिहास लिहिण्यास तेथील ग्रामस्थांची फार मदत लागते. त्यांनीं आपल्या जवळचे कागपत्र दाखविले पाहिजेत. आठवणी आख्यायिका दिल्या पाहिजेत. जीर्णोद्धाराच्या कल्पनेला चांगलें उचलून धरलें पाहिजे व प्राचीन ऐतिहासिक वास्तूंच्या स्मारकासाठीं द्रव्यसाहाय्य केलें पाहिजे. अशा मदतीशिवाय बिचारा संशोधक एकटा काय करणार ! शिवाय नगर-संशोधनाची आस्था सर्वच नागरिकांना पाहिजे. वेगवेगळीं लहान मोठीं कामें करणारीं माणसें तयार होतील तेव्हां हा संशोधनाचा गाडा पुढें सरकणार व पल्ला गांठणार. Charity begins at home या इंग्रजी म्हणीप्रमाणें प्रथम आपल्या गांवच्या इतिहासाबाबतच्या अभ्यासाला प्रत्यक्ष अवशेषांवरून सुरुवात करावी. प्रत्येक मोठ्या गांवांत एक स्थानिक इतिहास मंडळ पाहिजे. त्यांतील सभासदांनीं संशोधन करून गांवची सर्व माहिती जमवून ठेवावी व अधिकृत इतिहास म्हणून तिचा उपयोग सर्वत्र केला जावा. भारत-इतिहास संशोधक-मंडळानें पुणें संशोधनासाठीं जशी एक शाखा काढली आहे तशी सातारा, कोल्हापूर, नाशीक, नागपूर, बडोदें इत्यादि महाराष्ट्रांतील इतिहासप्रसिद्ध ठिकाणीं नगरसंशोधनाचें कार्य सुरू होणें जरूर आहे. बृहन्महाराष्ट्रांतहि कलकत्ता, अहमदाबाद, दिल्ली, तंजावर, बंगलोर वगैरे ठिकाणीं मराठ्यांच्या इतिहासाचीं स्थानिक साधनें जमा केलीं जावींत. अशा तऱ्हेनें नगरसंशोधनाची खटपट नेटानें झाल्यास महाराष्ट्राचा समग्र आणि सुसंगत इतिहास तयार होईल व त्यांचीं स्मारकें उभीं दिसतील.

भारत-इतिहास संशोधक-मंडळाचे दोन तपांचे कार्यवाह प्रो. दत्तो वामन पोतदार यांनीं अशा नगरसंशोधनाची तळमळ एकसारखी ठेवून त्यासाठीं एक स्वतंत्र शाखा उघडण्याची आकांक्षा किती दिवसांपासून तरी बाळगिली होती. त्या दृष्टीनें मागें एक-दोन प्रयत्नहि केले. शेवटीं भा. इ. सं. मं. च्या कारभारी मंडळाकडून ता. १२।३।३९ च्या सभेंत एक योजना मांडून ती मान्य करून घेतली व श्री. चिं. ग. कर्वे यांच्याकडे

या नगरसंशोधनसमितीचें काम सोंपविलें. समितीची पहिली सभा ता. १९ जुलै १९३१ रोजीं भरून कामास आरंभ झाला. आतापावेतों सुमारें ४० पाक्षिक सभा झाल्या व त्यांत सुमारें १५० टांचणें वाचलीं गेलीं आहेत. या संशोधन टांचणांतील कांहीं मजकूर प्रस्तुत ग्रंथांत दिला आहे.

या टांचणांपैकीं कांहीं अस्सल साधनें, म्हणजे अप्रसिद्ध कागदपत्रें यावरून तयार केलेलीं आहेत. अशीं साधनें कितीतरी सांपडतील व मंडळांतहि आहेत. कांहीं टांचणें प्रत्यक्ष जागा, वास्तू पाहून माहिती घेऊन तयार केलीं आहेत. तींहि कमी महत्त्वाचीं नाहींत. त्यांत मिळेल त्याप्रमाणें भर घातली पाहिजे व कांहीं दुरुस्त्याहि करणें अवश्य वाटेल. तिसऱ्या प्रकारचीं टांचणें म्हणजे छापील ग्रंथांत जो पुण्यासंबंधीं भाग आला असेल तो निवडून टिपून ठेवलेला मजकूर. या मजकुराचा उपयोग संशोधनाला पायाप्रमाणें होतो. या माहितीवरून संशोधनाची दिशा कळते व इतिहासाच्या तुटलेल्या सांखळ्या जोडतां येतात.

वरील प्रकारांनीं नगरसंशोधनाचें काम मंडळांत चालू आहे. तथापि त्याला अद्यापि जोर चढला नाहीं. एकट्या दुकट्याचें हें काम नव्हे, असें वारंवार आम्ही बजावतोंच. वास्तविक सुशिक्षित नागरिक आणि नगरपालिका यांचें मोठें साहाय्य पाहिजे. पुणें नगरपालिकेचेंच हें एक आवश्यक कार्य आम्हीं चालविलें आहे. तेव्हां त्या स्थानिक स्वराज्यसंस्थेनें भा. इ. सं. मंडळाला जरूर ती मदत अक्षयीं केली पाहिजे. दोन सालांपासून थोडी आर्थिक मदत मिळूं लागली आहे. तथापि या मदतीप्रमाणेंच प्रत्यक्ष संशोधनाच्या कामांत म्यु. अधिकाऱ्यांनीं लक्ष घालून जुन्या वास्तूंची बूज राखली पाहिजे. नवे रस्ते करण्याच्या वेळीं जुने अवशेष शिल्लक राहातील याकडे अवधान पाहिजे. ऐतिहासिक वस्तू गोळा करून आणून मंडळाच्या संग्रहांत ठेवल्या पाहिजेत. याप्रमाणें चोहोंकडून उठावणी झाल्यास हें पुण्यनगरीचें संशोधन आदर्शवत् होण्यास फार दिवस लागणार नाहींत. असो.

नगरसंशोधनवृत्ताचा हा पहिला भाग आहे. यापुढें सवडीप्रमाणें पुढले भाग प्रसिद्ध करण्याचें योजलें आहे.

# पुणें नगर संशोधन वृत्त

## अनुक्रमाणिका


| | | |
|---|---|---|
| १ पेशवाई अखेरच्या शनिवार पेठेच्या चतुःसीमा | ( प्रा. चिं. ब. जोशी १३-४-४० ) | १ |
| २ शुक्रवार पेठेची चतुःसीमा | ( " २७-७-४० ) | २ |
| ३ पेठ गुरुवार ऊर्फ वेताळ | ( श्री.कृ.वा.पुरंदरे २७-१२-३९ ) | ४ |
| ४ गुरुवार पेठेचा कारभार | ( श्री. चिं. ग. कर्वे १०-९-४१ ) | ७ |
| ५ गुरुवार पेठेची खानेसुमारी | ( " " ) | ७ |
| ६ न्याहाल पेठेचें दुसरें नांव नागेश पेठ | ( प्रा. द. वा. पोतदार १३-३-४० ) | ८ |
| ७ शाहापूर पेठ | ( श्री. चिं. ग. कर्वे १२-२-४० ) | ९ |
| ८ अंबरखाना | ( सर.गं.ना.मुजुमदार २७-८-४१ ) | ९ |
| ९ गायधार व खडकधार | ( प्रा. द. वा. पोतदार २८-२-४० ) | ११ |
| १० एका जुन्या वहींतील नोंदी | ( श्री. शं. ना. जोशी १३-८-४१ ) | ११ |
| ११ रात्रीची तोफ व परवाना | ( श्री. चिं. ग. कर्वे ७-१-४२ ) | १२ |
| १२ जुने पूल | ( " ३०-८-३९ ) | १३ |
| १३ जुन्या विहिरी | ( " " ) | १३ |
| १४ जुने हौद | ( " १६-८-३९ ) | १४ |
| १५ पुणें शहरानजीकचीं चांगल्या पाण्याचीं ठिकाणें | ( श्री.शं.ना.जोशी ११-१२-४० ) | १६ |
| १६ मुंजेरी–माळी भागाची व्याप्ति | ( चिं. ग. कर्वे ७-८-४० ) | १७ |
| १७ तुळशीबागकरांची मुंजेरी बाग | ( " ३-१२-४१ ) | १८ |
| १८ " पर्वतीबाग | ( " २-७-४१ ) | १९ |
| १९ जुन्या बागा | ( प्रा. पोतदार १-११-३९ ) | १९ |
| २० लकडी पुलाजवळील समाधी | ( चिं. ग. कर्वे २-८-३९ ) | २० |
| २१ दहा तोंडाची देवी | ( " ५-११-४१ ) | २० |
| २२ दगडी दीपपुतळी | ( प्रा. पोतदार–मुजुमदार १६-८-३९ ) | २१ |
| २३ रास्त्यांचा नळ | ( श्री. शं. ना. जोशी १९-२-४१ ) | २२ |
| २४ जुन्या मंडईचा कौल | ( श्री. चिं. ग. कर्वे १२-८-४१ ) | २२ |

| | | |
|---|---|---|
| २५ येवडा–गारपीर रस्ता | ( श्री. चिं. ग. कर्वे १३-३-४० ) | २३ |
| २६ रविवार पेठेंतील मोठे लोक | ( „ ) | २३ |
| २७ रामनवमीचे उत्सव | ( „ ) | २४ |
| २८ शेट्याचा बाजार | ( „ १४-२-४० ) | २५ |
| २९ रोहरा | ( „ „ ) | २५ |
| ३० शनवारवाड्याला आग व पाण्याचे बंब | ( „ ३१-१-४० ) | २५ |
| ३१ सदाशिव पेठेची चावडी व झेंडा | ( प्रा. पोतदार ४-१०-३९ ) | २६ |
| ३२ केदारवेस | ( „ „ ) | २६ |
| ३३ मोंजे कासारी | ( „ „ ) | २७ |
| ३४ पासोड्या मारुती | ( „ „ ) | २७ |
| ३५ टांकसाळ | ( „ „ ) | २७ |
| ३६ महत्त्वाचीं देवस्थानें | ( श्री. चिं, ग. कर्वे ३०-८-३९ ) | २८ |
| ३७ ओंकारेश्वर | ( „ १४-२-४० ) | २९ |
| ३८ बुधवारांतील बालाजी | ( „ २४-७-४० ) | २९ |
| ३९ जुनी व नवी बेलबाग | ( श्री. चिं. ग. कर्वे १३-३-४१ ) | ३० |
| ४० बेलबागेंतील विष्णुमूर्ति | ( „ „ ) | ३० |
| ४१ शुक्रवार पेठेंतील बेलबाग | ( श्री. चिं. ग. कर्वे १३-३-४० ) | ३० |
| ४२ चोळखण आळींतील वैद्यांचें राममंदिर | ( श्री. शं. ल. वैद्य १-११-३९ ) | ३१ |
| ४३ नरसोबाचें देऊळ | ( श्री. चिं. ग. कर्वे ७-१-४२ ) | ३३ |
| ४४ शेख सल्ला | ( „ १४-२-४० ) | ३४ |
| ४५ शेख सल्ल्याचे ताबूत | ( „ १३-३-४० ) | ३४ |
| ४६ बिबी सैदानी | ( „ १४-२-४० ) | ३४ |
| ४७ Our lady of Immaculate Conception | ( „ ३०-८-३९ ) | ३५ |
| ४८ आंचलि ओढा | ( „ ३०-७-४१ ) | ३५ |
| ४९ फर्मानबाडी कोठें होती | ( श्री. चिं. ग. कर्वे २९-११-३९ ) | ३६ |
| ५० शिवाजीचा लालमहाल | ( „ १४-२-४० ) | ३६ |
| ५१ शुक्रवारवाडा | ( श्री. य. न. केळकर १६-८-३० ) | ३८ |
| ५२ शुक्रवार वाडा | ( श्री. चिं. ग. कर्वे १४-२-४० ) | ४० |
| ५३ विश्रामबाग वाडा | ( „ „ ) | ४० |
| ५४ विश्रामबाग वाड्याची रचना | ( „ ३१-१-४० ) | ४१ |
| ५५ बुधवार वाडा | ( „ १४-२-४० ) | ४१ |
| ५६ बुधवार वाडा रचना | ( „ १३-३-४० ) | ४१ |

५७ गणेश पेठेंतील पेशव्यांचा वाडा ( श्री. चिं. ग. कर्वे ३१-१-४० ) ४२

५८ शुक्रवार वाड्याखेरीज पेशव्यांचें शुक्रवारांतील घर ( ,, ,, ) ४२

५९ कोथरूड येथील पेशव्यांचा वाडा ( ,, १४-२-४० ) ४३

६० आनंदीबाईचें भातुकलीचें घर ( ,, ३०-८-३९ ) ४३

६१ धाकटे चिमाजी आप्पा पेशवे यांचे वाडे व वंश ( ,, १८-१०-३९ ) ४३

६२ पिंपळखरे वाड्याचें बेचनपत्र ( श्री. शं. ना. जोशी ३०-७-४१ ) ४५

६३ मुजुमदार वाडा कसबा पेठ ( सर. गं. ना. मुजुमदार १-११-३९ ) ४७

६४ शंकर बापूजी मुजुमदार वाडा ( ,, २७-१२-३९ ) ४८

६५ रविवार पेठेंतील मिसाळ यांचें घर ( श्री. शं. ना. जोशी ५-२-४१ ) ५०

६६ शिंदे वाडा—वानवडी ( प्रा. द. वा. पोतदार ३१-१-४० ) ५२

६७ शिंदे छत्री ( श्री. चिं. ग. कर्वे १४-२-४० ) ५३

६८ बाळशास्त्री टोकेकर यांचा वाडा ( ,, २०-९-३९ ) ५४

६९ होळकर छत्री ( श्री. चिं. ग. कर्वे ४-९-४० ) ५५

७० तुळशीबागेचे पुजारी जोशी यांचा वाडा ( ,, ५-११-४१ ) ५६

७१ बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या वास्तु ( श्री. मा. ग. बावडेकर १६-८-३९ ) ५६

७२ ठोसर घराणें व होळकर वाडा ( श्री. चिं. ग. कर्वे ४-२-४२ ) ५९

७३ पुण्यांतील जुने वाडे, हप्ता १ ( प्रा. पोतदार २-८-३९ ) ६०

७४ ,, ,, ,, २ ( ,, १६-८-३९ ) ६२

७५ ,, ,, ,, ३ ( ,, ३०-८-३९ ) ६५

७६ नगर—पाहाणी, फेरी १ ( श्री. चिं. ग. कर्वे १८-१०-३९ ) ६८

७७ ,, ,, ,, २ ( ,, २४-७-४० ) ६९

७८ ,, ,, ,, ३ ( ,, ,, ) ७०

७९ ,, ,, ,, ४ ( ,, ११-१२-४० ) ७१


( विषयाच्या नांवापुढें, ज्यांचें टांचण आहे त्यांचें नांव व ज्या पाक्षिकसभेंत तें वाचलें त्याची तारीख दिली आहे. )

# पुणें नगर संशोधनवृत्त

१

## पेशवाई अखेरच्या

## शनिवार पेठेच्या चतुःसीमा

१ पूर्व बाजूची हद्द ईशान्य कोनास वाडा कुशाबा शेरे याचा वाडा पलीकडे नदी तेथून सरकार वाडा दिल्ली दरवाजा निमे पलीकडे निमे वाडा कसब्याकडे खासगीवाले यांचे वाड्याचे ××× वर पूर्वेची हद्द मिळाली पुढें हाद बुधवारची तेथून रूमणवाला आठवले याचे घरापासून नीट रस्त्याने नगरकर याचे वाड्याचे कोपऱ्यावर येऊन मिळाली.

१ दक्षिण बाजूची हद्द आग्नीकोनावर मेहेंदळे याचे वाड्याचे पूर्वेचे कोपऱ्यावरून रूम्हणवाला घेऊन हुजूर पागेवरून गे ×× लपत देव याचे घरावरून पुढें कोलटकराचे घरावरून कर्वे याचे घरावरून टाकळे याचे घरावरून गायेकवाड्याचा निमे वाडा व निमे वाडा पेठ नारायण व बालाजी धोंडदेव मजुरे याचे घरापो दक्षिणेची बाजू हाद येऊन मिळाली.

१ पश्चिम बाजूची हद्द नैरुत्य कोनावर बालाजी धोंडदेव मजुरे याचे कोपऱ्यावरून नीट उत्तरेचे बोळानें त्रिंबकपंत मेहेंदळे याचे घरावरून बोळानें पश्चिमेस रूम्हणवाला घेऊन **नारोशंकर याचे घाटावरून** नीट कांहीं कांहीं घराचे पिछाडींनें नदीचे कडेने ओंकारेश्वर व अमृतेश्वर याचे देवळाचे कोपऱ्यावरून पश्चिम बाजूची हद्द वायव्य कोनावर पुरी झाली.

१ उत्तरेची हाद वायव्य कोनापासून नीट पूर्वेस नदीनें ईशान्य कोनास उत्तरबाजूची किनाऱ्यानें ×× चिपेवर (!) हाद मिळाली.

### पेठ मारचे बाग वाडगी वगैरे

१ हुजूर पागेंत बाग केला. हाली वहिवाट मिरजकर यांजकडे सरकारांतून दिल्ही. याजकडून मक्त्याने १०० विटोबा जागले याणी पेठ का शनवार आन पेठ बागी वगैरे तुलसी फुले येकर ३ अजमासे यासी चतुःसीमा पूर्वेस रस्ता दक्षिणोत्तर जात आहे. दरम्यान दरवाजा भिंती छपरे वगैरे आहे. दक्षिणेस बहिरोपंत मेहेंदळे

याचा वाडा हाली वहिवाट आणा नगरकर पश्चमेस नारायणपेठ दरम्यान रस्ता उत्तरेस फेट मारची वस्तीची घरें बागेंत विहीर दुरुस्ती चालू.

१ कबुतर खान्याचे वाडगे हाली जिराईत पेरणी मका लाविली होती कर्पे संगाजी मोरो याणी मक्त्याने केली आहे लांबी रुंदी अजमासे येकर २ यासी चतुःसीमा पूर्वेस **रामशास्त्री याचे घर** दक्षिणेस हैबतराव शंकर परभु याचे घर पश्चमेस रस्ता दक्षिणोत्तर जात आहे. व उत्तरेस रस्ता पूर्वपश्चम जात आहे.

१ वोंकारेश्वर देव याची बाग वहिवाट सिवरामभट चित्राव हाली मक्त्याने बापूजी माली याणे केला आहे ते रु. ६० आत पेरा केली व निंबोल्या व पेरू व वांगी फुलझाडे आहेत व भुडकी नदीचे पाणी येत आहे. लांबी रुंदी अजमासे येकर ४ यासी चतुःसीमा चार दिवाली भिंती आहे. पूर्वेस देवालय पश्चिमेस घाटाचा रस्ता दक्षिणेस रस्ता व उत्तरेस न ×× याचा भोगवटा बहुत दिवसाचा आहे पत्र कांहीं नाहीं भोगवटा आहे.

१ माधवराव रास्ते याचे वाड्यातील वाडगे आहेत पेरणी मका भिकाजी इंगले यांनी लाविली.

१ भाऊ लाटे यानी वाडगे आंत पेरणी मका व वांगी लाविली आहेत कर्पे हरी माली भुमकर यानें मक्त्यानें रु. दहास केली आहे.

१ आपा बळवंतराव याचे वाडगे.

१ रामराव विष्णू याचे परसावात वाडगे हाली पेरणी भाजी आहे विहीर येक आहे जमीन अदमासे ८१० आहे.

१ हासमनीस याचे घर जाग्यापैकी जागेत बाग केली आहे त्यांत झाड झाडोरा नाही. फुलझाडे व तुलसी लावून भाजी व मका पेरणी करून खातात व विहीर येक आहे येक मोटेचे पाणी आहे लांबी रुंदी अदमासें येकर ४ आहे. त्याचे पत्र इनामीं नाही.

[ पेशवे दप्तरांतील अप्रसिद्ध कागदावरून ]

---

# २

# शुक्रवार पेठेची चतुःसीमा

१ पूर्व बाजूची हद्द ईशान्य कोनास वाडा हकिमजीचा नजीक वल्लभ सुंदरच्या वाड्यावरून सदरहूची हद्द दक्षणचे आगे निघाली ते दरम्यान मुगर नाईक देव व मोरो अपाजी दामले याचे पागेवरून जीवनदास गोवर्धनदास वानवले व पार्वती रोगी (रोंगी!) दरम्यान रस्ता आदितवारास जाण्याचा तंबाखू वोळीचा पुढें वाडा बापूजी

नानाजी नजीक हद्द आदिनवाराचा **हत्ती महाल** पुढें बाहा माहात फौजदार व दादवलमहान फौजदार व चांभाराची घरें व खाटीक आळीवरून सरकारची आलंग खाम बारदाराची पुढें श्री रामजींचें देवलावरून पंचमुखी मारुतीवरून खनाळ भाई मोमीन याचे घरावरून फकीर तल्यानजीक सोभाराम नाईक देवनवाल कुंभार व बुला कुंभार कुडलवाल याचे घरावरून **रुपराम चौधरी याचे हौदानजीक** गंगाप्रसाद सुभेदार याचे घरावरून बापूजी सिंदे कुडाळकर याचे घरावरून सरकारचा **बारुतखाना** हल्लीं वहिवाटीस रामचंद्र चौधरी यांजकडे व गवताचे गंजीचे वावर दक्षणेचा व पूर्वेस कोपरा तेथें मारुतीचें देवालय **मोरोबादादाचे बागेची** बाडी तेथ पावेतों पूर्वेची हद्द मिळाली.

१ दक्षण बाजूची हद्द अग्नीय कोनापासून पच्यमेचे आगे मारुतीचे देवळापासून गंज टेकडीकडे जातो रस्ता पूर्व पश्चिम सडकेंत नैरुती कोनावर पिंपळाचा पार आहे पुढें पर्वतीची सीव व रस्ता नवलोबाकडे जात आहे तेत पावेतो दक्षण बाजूची मिळाली.

१ पच्यम बाजूची हद्द नैरुत्य कोनापासून **पुरंदरे यांचे बागेवरून** नीट रस्त्यानें श्री वेंकटेशाचे देवालयावरून कामाटपुऱ्यावरून महादोबा पुरंदरे याचे बागेचे कोपऱ्यापावेतों दरम्यान **तोफखाना** हाली तुरंग घाट व त्यापुढें जागा परपोला आहे पुढें गोविंद पोवळेकर व बावले याचे बागेवरून छटु छपरचंद याचे आळीवरून **अली-बहाद्दर याचे बागेचे** कोपऱ्यावरून पुढें भिका माली व रंगोपंत बाबा गोखले याचे दिवाण त्याचे घरावरून **नाना फडणीस याचे बागेचा** कोपरा तेथून पुढें केसोपंत करंदीकर व उमरावसिंग भाऊ सरंजामे याचे घरावरून काळे ( वावर ! ) नजीक मारुतीचे देवळावरून त्रिंबकराव नाईक येरडे याचे घरावरून दाजीबा पानसे व पिलंभट मराठे याचे घरावरून समाईक रस्त्यानें तुलसीबागवरून नाना साठे याचे घरापावेतों येऊन पश्चिम हद्द मिळाली.

१ उत्तर बाजूची हद्द वायव्य कोनावर नाना साठे व नानू याचे घरापासून व तुलसीबागेवरून दरम्यान रस्ता बुधवार पेठ तेथून गोविंदराव निलकंठराव खाजगीवाले याचे घराचा **बावन खाणीचा** कोपरा मधील रस्ता पुढें जोहरवाणी याचे घर खुटाचे वरून पुढें **काले जोगेश्वरीवरून** राघोपंत नगरकर याचे घरावरून खिडाडिने चिंतामणी याचे घरावरून भगवान आत्माराम लोहार सिंदे व गणोबा लकटखाने याचे घरावरून व पेठ मारचे कुलकर्णी याचे घरावरून हकीमजीचे घरापर्यंत उत्तर बाजूची हद्द मिळाली.

## ३

# पेठ गुरुवार ऊर्फ वेताळ

पुण्यास सर्व वारांच्या पेठा आहेत पण गुरुवार पेठ मात्र नाहीं असें वरवर पाहाणारास वाटतें परंतु तसें नसून या नांवाची पुण्यास पेठ होती व आहे पण तिचें नामांतर झाल्यामुळें तसें वाटतें इतकेंच. सध्यां पुण्यास वेताळ पेठ या नांवानें ओळखली जाणारी पेठ हीच " गुरुवार " पेठ होय. ही पेठ सुमारें इ. स १७५० या सालीं वसली.

श. १६८९–९० तील 'पटी वसील बाकी गुरुवार' या मथळ्याच्या कागदावरून या सालीं या पेठेंत दुकान सारा देणारीं कुळें किती होतीं व त्यांना किती दुकान सारा द्यावा लागे याची माहिती मिळते. या पेठेंत बहुतेक वस्ती उदम्यांची असून ते अनेक प्रकारचे व्यवसाय करीत असलेले दिसतात. यांची जातवारी काढल्यास ती अशी काढतां येईलः १ तेली, १ सोनार, १ कुंभार ( परदेशी ), १ लोधी, १ छेपरबंद, १ सुतार ( परदेशी ), १ साटीक, १ सिपीजैन, १ गोवर्धन, १ तांबोळी, १ गुजराती, १ मोची, १ जोहशी, १ जंगम, १ परीट, १ जिनगर, १ बागवान, १ मारवाडी, १ भडभुंजे, १ गुरव, १ पेंढारी, १ भोई, १ काछी, १ कळवंतीण, वगैरे. यांत महाराष्ट्रीय* ब्राह्मणाचीं घरें फक्त सहा सातच दिसत आणि ते स्वतः तेथें राहत असेंहि नाहीं. सर्व धंदेवाईकच आहेत.

श. १७०८ तील जमेच्या बाबी

१९२१ दुकानसारा

३५४॥। भाडे सरकारच्या घरापुढील जाग्याचे व मेण+ बाजारांतील वगैरे

३४२॥≈ बैठक मेणबाजारांतील सराफ वगैरे याजपासोन रोज घ्यावयाचे ते

१५५ गतकुळी जागे दुसऱ्या कुळास देऊन पत्रे करून दिल्हीं त्या बाा नजर

३३ दुकानापुढें लागत वलणी खाले उदम्यानी•रस्तवोलीस छपरे घातलीं त्या बाा घेतले.

---

*ब्राह्मणः—१ वासुदेव जोशी १ गणेश नाा १ रामजी खंडेराव १ धोंडजोसी १ दाळवाले १ बाळाजीपंत बापट १ नारायण भट

+मेण बाजारः—दररोज दुकानासाठीं पालें द्यावयाचीं व रात्रीं काढावयाचीं अशीं दुकानें असलेला बाजार, जुनाबाजार

७० रस्त्यांत रिकामे जागे होते ते कुळास देऊन चावडीचे पत्र करून दिल्हे त्या बाा घेतले.

३७ बोंबीलवाले मेण बाजारांत बसतात त्याचा मख्ता......

५० लोणारी या बाा पटी

७० कुळानी आपली घरे फ़ोख्त केली ज्यानी घेतली त्यास चौत्र्याचे पत्र करून दिल्हे.

४३॥ खंड गुन्हेगारी

(गुन्हे पेठेंत होणारे यांची चौकशी होऊन गुन्हेगारापासून घेतेवेळी रक्कम. यांत सामाजिक गुन्ह्याबद्दल गुन्हेगारी घेतलेली आहे.)

१ या यादीवरून पेठेचे कारभाराकडे खर्च काय येत असे तेंहि समजून येतें. एक कमाविसदार व त्याचे हाताखाली च्यार प्यादे असत. कमाविसदाराचा सालचा पगार १२५ रु. असून प्याद्यास प्रत्येकीं सालाचे ३६ रु. मिळत असत. कमाविसदाराच्या हाताखालीं कारकुन असून त्यास सालीना १०० हा मिळत असत. सालाचा सादीलवार खर्च ७॥ रु. पेठेची कचेरी ती चावडी.

१ पेठेंत होणारे किरकोळ गुन्ह्याची चौकशी होऊन येणारी गुन्हेगारी ही पेठेच्या वसुलाची बाब असे. या गुन्हेगारींत सामाजिक गुन्हा. असे असतां सरकारांत घरपट्टी वगैरेबद्दल सालाचे १२१८॥ रु. च मिळत आहेत यांतून खर्च वजा केल्यावर निव्वळ प्राप्ती (१२००-१५०) सुमार १०५० रु. राहिली तर रहात असेल.

१ या पेठेची दरसालचे निरनिराळ्या बाबींचा जमाखर्च दाखविणारे दुसरे दोन हिशेबी कागद आहेत यावरून पेठेच्या जमेच्या बाबी पुढील प्रमाणें ठरवितां येतील:

१ दुकानसारा, १ भाडें सरकारचे वाड्याचे पुढील व मेण बाजार, १ बैठक मेणबाजारांतील सराफ वगैरे याजपासून दररोज घ्यावयाचे ते, १ गतकुळी जागा दुसऱ्या कुळास देऊन पत्रें करून दिलीं त्या बाा नजर, १ दुकानालगत रस्त्याच्या काठीं छपरें घातलीं त्याचें भाडें, १ रस्त्याच्या काठीं रिकामी जागा होती ती कुळास देऊन चावडीचें पत्र करून घेतलें त्या बाा, १ बोंबीलवाले मेण बाजारांत बसतात त्याकडून मक्त्याचे घेतले ते, १ कुळानी आपलीं घरें फ़ोक केलीं त्याबद्दल घेतले ते, १ लोणारी यांजकडून १ खंड गुन्हेगारी. यांत गुन्ह्यांचाहि अंतर्भाव होतो.

शक १७०९-१० चे हिशेबावरून

१ खरेदी खतावर चौतरापटी शें. १० प्रो आकारली.

१ खंड गुन्हेगारांचें प्रकरण—१ साधी मारामारी, १ चोर, १ तंटा, १ शिवीगाळ,

१ रंगारी यानें चांभाराचीं चिरगुटें रंगवून दिलीं त्याबद्दल रंगारी चांभाराचीं चिरगुटें रंगवून देत नाहींत असे असतां यानें घेतली सा घेतले.

१ खोटीं नाणीं चालविणारा मलकापुरी रुपयांत सिसें भरून चालविण्याकरितां पेठेंत आला. झडती घेतां खोटे रुपये निघाले.

१ देणे घेणेचे फडशाबद्दल १ कर्ज उगवून दिलेयद्दल.

१ या **पेठेंत सरकारचा वाडा होता** त्याचे दुरुस्तींचें काम या सालांत चालूं झालें.

१ एकंदर जमा ४४४१०– झाली त्यांतील खर्च
२७८४॥ वराता वगैरे

१ सरकार वाड्यापुढील जागेचें भाडें सरासरी ३८८८– येत असे.

१ दुकानापुढें छपरें घातलीं असतां जास्त भाडें द्यावें लागे.

१ लांबी हात ५ व रुंदी हात ५ बद्दल रु. ६० घेतले.

१ बोंबीलवाल्याकडून बारमाही करार मात्र मासापासून झालेला असून त्यांजकडून फक्त पांच माही आकार घेतला आहे. यावरून हे लोक प्रथमच या सालापासून बाजारांत बसूं लागले असावेत.

१ एकाद्या बाईस एकाद्याजवळ ( रखीली ) म्हणून रहावयाचे झाल्यास सरकारची परवानगी लागे. योग्य कारण दिसल्यास परवानगी मिळे. अशी स्त्री विधवा असावयास पाहिजे हें सांगणें नको.

१ गुरुवार पेठेचें नांव वेताळ पेठ पडलें तें पेशवाईंत पडलें.

१ मेणबाजार पट्टी दरमहाचे बोलीची असे. जागेचे क्षेत्राप्रमाणे दर असत ०॥० रु. पासून २ रु. पर्यंत दराचे दाखले मिळतात.

१ नौकराकडे बाकी असलेली रक्कम वसूल होणें शक्य नसल्यास ती " बाजदादन " खातीं खर्च लिहिली जाई.

१ घर साऱ्याबद्दल वसूल न देणाऱ्याच्या सबबी पाहाण्याजोग्या आहेत. त्यांत फारच थोड्या विचारांत घेतलेल्या दिसतात.

## पेठेच्या शेट्याचे हक्क कोणकोणते असत याची स्पष्टता

१ दाण्याच्या गोणीस हर जिनस गोणी ०८।

१ सेव भाजीचे दर दुकानास ०८।

१ लकडवाल्यापासून दर घरास लाकडे मण १ ( सालास )

१ लग्न मोहतराचा सेला

१ बकरे धनगरापासून दर घरास दरसाल एक व धनगर याचीं आठवडा पावसेर घेत जाणे

१ सुपारी दर दुकानास आठवडा सुपारी येक घेत जावी

१ पाने विड्याची दर दुकानास दररोज १०

१ गवताची पेंडी दर भाऱ्यास दररोज येक घेत जावी

१ मोळीस लाकूड दररोज एक

१ आंब्याची सेव पाटीस आंबे पांच करवंदी दर पाटीस ००।

[ तुळशीबागवाले दप्तर ]

---

४

# गुरुवार पेठेचा कारभार

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
जनार्दनपंत दादा स्वामीचे शेवेसी

पो हरी बलाल साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष पेठ गुरुवार शहर पुणे येथील का आपलेकडे आहे त्यास पेठ मजकूरचे कारभार प्रकर्णी रा बापु शेट मालवणकर याचा कारकून याचे हातेपर्टाची चिठी पेशजीपासून होत असते मागेपासून भोगवटा चालत आला व आपलेहि अमलात चालला हाली शेट मजकूर स्वारीत आल्यापासोन याचे कारकुनाचे हाते चिठी होत नाही म्हणोन मशारनिलेनी सांगितले त्यावरून आपणास लिहिले असे तरी पेशजीपासून व आपले अमलात चालत आले असेल त्याप्रमाणे चालवणेचा करार स्वारीत आहे बाजवी पूर्वीपासून चालते तसे चालावे रा छ २१ मोहरम बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती

[ तुळशीबागवाले दप्तर ]

---

५

# गुरुवार पेठेची खानेसुमारी

खाने सुमारी———बोटखत पेट गुरुवार का पुणे सुा सलास पत्री नवी चालणे.

१ होनाजी जासूद पेशजी मालजी माली राहात होता

१ शाहाजी लोखडया पेशजी कासाई कुभारीण राहात होती

१ भवानी डाम्या जासूद

१ रामजी तुप्या
१ वाघोजी जावलकर
१ बाबाजी मोरा नि॥ कोतवाल
१ सोना बागवान
१ बाबू बागवान
१ सटवा घोडक्या याचे जाग्यावर
  १ बायको राडाव
  १ विठोजी कालढाका
  ——
  २
१ चतुर्भुज कुंभार
१ महिपति चिबवा
१ सटवा शिरपा
१ पथाजी व भीम्या माली
१ माहादाजी माली
१ केरोजी
१ तिवरी धीरज चौधरी
१ हीरा हाजारी
१ लाला भोई
१ भोला भाई
१ जमाल महमद साडणी स्वार
——
२०

[ तुळशीबागवाले दप्तर ]

## ६

# न्याहाल पेठेचें दुसरें नांव नागेश पेठ

न्याहाल पेठेच्या न्याहाल नांवासंबंधानें एक कथा नमूद आहे. तिचा संबंध कोण्या न्याहाल नांवाच्या मनुष्याशीं लागतो ( पहा पूना ग्याझि. पृ. २७५ ). पेशवे दप्तरांत पेठांचे कागदांत या पेठेचा उल्लेख न्याहाल उर्फ **नागेश** असा आहे. अनेक स्थळीं तसा आला आहे. नागेशाचें देवालय या भागांतच आहे त्यावरूनच या विभागास **नागेश** हें नांव दिलें असावें.

या बाबत पेशवे दप्तरांतील उतारे.—

१ सन आर्बा मया तेन व अलफ सन १२१३.
“ पेठ नागेश उर्फ न्याहाल ”

२ पेठ नागेश न्याहाल—फसली १२३० “ पटी खणावर घ्यावयाची चाल नाही ”—इ.

३ पेठ नागेश—सन १२४५ फसली. २ देवालये, १ मठ बैरागी, १ फकिराचा तकिया, १ बाग शामदास भाई यांचा.

४ पेठ नागेश—फ. १२२८ इ. १८१९.

५ पेठ न्याहाल—रास्ते पागा—पूर्व ईशान्य कोनास
बिनीवाले बाग—दक्षिण०
माळी पैकी—शास्त्रीबावाचा बाग०
पश्चिम बाजूस—नैरित्य कोनास०

---

## ७

# शाहापूर पेठ ( सोमवार पेठ )

गांवची शांत केली त्यावेळीं महार आणि मांग यांच्यांत पेढियाच्या घागरी-बद्दल भांडण लागलें. “पाटील सेटे माळी पेठ शाहापूर याजला वर्तमान पुसले.” मांगांनी घागर चालवावी असा निकाल होऊन “ मांगाचे डोईवर पेढियाची घागर देऊन गावाभोवता टोणगा फिरविला. सात केली असे. पेठापेठांनी सांतीच्या खर्चाची पटी घेतली असे. ”

पे. द. २२ ले. ३७९ ] [ २४–६–१७३८

---

## ८

# अंबरखाना

श्री

एजंट रुमाल नंबर १४ पैकी पुडकें
उमाबाई उर्फ अक्कासाहेब माणकेश्वर ७

नंबर १

श्री
Inam
A
Commission

यादी आंबरखानेचा मोजदाद गज तपशील. दरगजास फूट ३

| | |
|---|---|
| १७॥ पूर्वपश्चेम | १०। उंची |
| २७॥ दक्षण उत्तर | ५॥। जमिनीवर |
| | ४॥ जमिनीत तळघर |
| | १०। |

येणे प्रो दगडी चिरेबंदी काम आहे सदरहू इमारतींत खोल्या ६ आहेत या पो दक्षणेकडील खोल्या २ व उत्तरेकडील खोल्या २ येणे प्रो कायम आहेत मधले खोल्या २ अक्कासाहेबानी पाडून देवलाचे कारखाना चालविले आहेत सदरहू दगडी इमारतीवर कवलारु छावणी होती तेथपर्यंत बिऱ्हाडकरी राहत होते. त्यानी सरकारास नाजराच विद्यमाने दरमहा भाडा रुपये दोन सहा आणे २।= सुमार येत होते. सदरहू अंबरखानेच जागा सदरहू इमारतीचे पुर्ढे पडवी आसे व मध्ये ...... बाजूस वाट सोडूनच्या बाजूला कौलारु छपरे आहेत तेथे बिऱ्हाडकरी असतात........येकंदर जागेपैकी श्रीमंताचे तीन हिसे जागा अन्यासाहेब यांस दिल्हे येक हीसा चिमाजी आप्पासाहेब याचे त्याकडील कुणबिणी वगैरे आहेत ते त्याचे त्याजकडे ठेविले सदरहू अंबरखानेंत सवाई माधवराव याचे कारकिर्दीत दाणे भरीत होते व दाणेचे कारखाने कडील कामगार वरील कवलारु इमारतीत बसून हिसेब तयार करीत होते. अलिकडे बाजीराव साहेब याचे कारकिर्दीत दाणे साठवीत नव्हतें अंबरखाने मोकळेच होते वरील कवलारु इमारतीवर पेशवे कडील नोकर लोक राहात होते

१ सन १८३८ किंवा सन १८३९ सालीं नाजर यांणीं रपोट केलेलीं, आंबार सरकारी आहे. तेथे दुसरे लोक कांहीं हक नसता राहतात. याजवर बोल सो याणी जाऊन जागा पाहून चिमाजी आप्पासाहेब याचे निसबतीचे लोक तेथे होते त्याचे खेरीज करून बाकी लोकावर भाडे बसविले आणि नाजरास हुकूम दिल्हा की भाडा वसूल करून सरकार दाखल करावा याप्रो वहिवाट चालला. साल गुा १८४४ प्रारंभी अंबरखाना अकासाहेबास देण्यास हुकूम आला आ – आमचे जमेत द्यावे म्हणून कलेक्टर साहेब याणी जडज साहेबास लिहिले त्याजवरून जडज्याचे हुकमावरून नाजर याणी मामलेदार याचे स्वाधीन केला. पावती घेतले. अंबरखानेचे दगड व लाकडे लेलाव कलक्टर सो नीं केली रु. ३१५ आकार जाला.

[ पेशवे दप्तरांतील अप्रसिद्ध कागद ]

## ९

# गायधार व खडकधार

[ रा. गोहाड बी. ए. पुणें—नवापूल—यांचेकडील दोन कागदांचे आधारें ]

१ कागद शके १७९१ शुक्लनाम संवत्सरे श्रावण शु. ( व ?) ८ चे आहेत.

२ यांत रामकृष्णगीर व बिण मेणगीर व दारकुगीर बीण लक्ष्मणगीर बाबा गोसावी इनामदार मौजे येरवडे तर्फ हवेली जि. पुणें यासी पन्ना व हुकरटी बिण टिकाराम कारभाई वस्ती शहर पुणें पेठ जुना गंज यांनी करार करून दिल्हा आहे की "तुमच्या गावासमधी नदीतील किंव धारा दोन गांवधार यक व धरना नजीक खडकधार ह्या दोनही धारां'ची वहिवाट तुमच्या वडिलांपासोन आम्ही करीत आहों. तशींच करूं रात्रीचे मासे खेरीजकरून दिवसाचे मासे देत जाऊ व श्री बहिरव देवाचे नंदादीपास दर साल रुपये १० देत जाऊं" खोरीचें मासे खेरीजकरून पांगोरीचे मासे देनार नाही—इत्यादी

यावरून येरवड्याजवळ नदींत **गायधार व खडकधार** अशी दोन नदींतील धारांचीं नांवें होतीं. आणि माशांचे खोरीचे व पांगारीचे म्हणजे रात्रीचे व दिवसाचे असा अर्थ दिसतो. ही दोन ठिकाणचीं नांवें अजून चालतात कीं काय शोधिलें पाहिजे व ठिकाणेंहि शोधलीं पाहिजेत.

ठिकाणांना अशीं नांवें अनेक असतात. त्यांचा शोध स्थलनिश्चयाला अनो-नात उपयोगी पडतो. कारण शेंकडों वर्षें हीं तशींच चालतात. गांवनामापेक्षांहि स्थळ नाम अधिक आयुष्यवंत असतात.

---

## १०

# जुन्या वहींतील नोंदी

**मावळ रस्त्याचा पूल**—१ पुणें येथील नदीस पूल मावळचे रस्त्याचा पेशवे सरकारचे कारकिर्दीत होता. तो साल गुा पावसानें काही पडला तो दरोबस्त साल मारी उलगडून टाकिला. हली कुंभार वेसीने दरोबस्त रस्ता मावलचा जात आहे.

**नवे रस्ते**—१ शहर पुणें येथे पेशजी श्रीमंतानी शहरात फरस बांधिले होते. हाली इंग्रज बाहदु(र) याणी फरस काढून सडका बाधितात व नाकझरीचे पूल रस्ते याचे पेठेकडील व मंगळवारांतील व गणेश पेठेतील वगैरे जुने लहान होते ते पाडून
१ १ १
नवे चागले बांधिले सन १२४७ शके १७५१ हेमलंबी नाम संवछरे

**कानडे वाडा**—१ रामचंद्र गणेश याचा वाडा नदीकाठी पुणे मुा आहे. त्यास रामचंद्रपंत याचे नातु रावसाहेब आसे म्हणत होते. त्याणी फाल्गुन शुा १ शके १७६२ या रोजी गचीवरून तळी उडी घातली नंतर प्रतिपदेस दुत दिल्हा पुढें शुा ३ रोज बुधवार देवआज्ञा जाली. मोगलाईत सरंजाम बारा हजार रुपायाचा चालू होता. या प्रो प्रार समक्ष पुणे मुा पाहिला तो लिा आसे.

शके १७६२ सन १२५०

**दगडीपूल**—१ पेशजी कुंभार वेसीपुढें नदीस पूल बांधण्याचा बेत नारायणराव बलाळ पेशवे यानी करून पाया घातला होता पुढें काम व्हावे तो मारले गेले तेव्हा काम तसेच आज पावेतो राहिले हली त्याच जाग्यावर धरणे व पूल आसे येक बेत करून काम इंग्रज बहादूर याणी चालविले आहे व कांहींसी ? बद्दल पटी पुण्यातलि बडेलोक व सावकार याजवर पुलाबाा पटी करून दाहा वीस हाजार रुो उत्पन्न केले या प्रो मार आहे व कामही चालू आहे. कलम

**वकील**—पुणे मुा साहेबाचे कोडत आहे त्या कामावर हली मिल साहेब आहेत तेथे वकील सनदी आहेत. त्यांत रावजी गडबोले होते. त्यानी कांही कागद खोटे...

**रात्रीची तोफ**—१ पुणे मुा रात्रीस वरदीची तोफ भाबावडे येथे पेशवे सरकारचे अमला पासोन चालू होती ती सन पौष शुा १५ या मिती पासोन कुपणी सरकार याणी बंद केली शहरात चौक्या आहेत. त्या कायम असोन शहरात लोक हरवख्त रात्रौ फिरतात त्यास अटकाव काही नाही.

**तारायंत्र**—१ वीज यंत्राचे वासे मुंबई पासोन तहत किकवी परियंत रोउन लोखडाची तार आडकाऊन ठेविली आहे सन १७६३ माघ मासी किकवी मुा पाहिल्यावरून लिा असे.

---

## ११

# रात्रीची तोफ व परवाना

श्रीराम प्रा

हुजूर अर्जोबुक नंबर ३४५० सन १८४३

यादी नारायणराव रामचंद्र तुलसीबागकर शहर पुणे सुाा आर्बा आर्बैन मया तन व अलफ सन १२५३ फसली कारणें याद दिल्ही ऐसीजे तुलसीबागेत हरहमेशा कथापुराणें व भजनें नेहमी रात्रौ होतात व आम्हांस शहरांत लोकाचे येथे कथाकीर्तनास व लग्न प्रयोजनांत जावे लागते त्यास आम्हांपासी बिला नाही याजमुळें तोफ

सुटल्यानंतर जान्या येण्याची वगैरे हरकत फार होती त्यास घडे लोकापासी बहुतेक चिले आहेत त्याप्रमाणे आम्हासही नेहमी एक चिला देण्याविसी पोलीस दगेगे यास हुकुम जाला पाहिजे तारीख ३१ माहे जुलई सन १८४३ इसवी

सही नारायणराव रामचं

जाब द्र तुळसीबागकर दस्तुर खुद

चिला मिळणार नाही. ता. २ अगष्ट सन १८४३ इसवी

( सही अिंग्रजी )

[ तुळशीबागवाले दप्तर ]

---

## १२

# जुने पूल

तक्षम पुणें शहरांत म्युनिसिपल आक्ट होण्यापूर्वी पूल होते त्यांजबद्दल—

१ हालालखोराचा पूल पेठ मंगळवार

१ दारुवाल्याचा पूल पेठ रविवार

१ भटी गेटाचा पूल

१ नानाचे पेठेत मांगाचे गेटा जवळचा

१ घशेटीचा पूल पेठ गंज

१ नागोबाचा पूल

१ कुंभारवेस धरण पूर्वी बांधलें आहे

१ जकात्याचे हवेली जवळचा पूल पेठ कसबा

१ देवजी बाबा याचे मठाजवळ पेठ रविवार

१ नरपतगीर याचे मठाजवळचा

१ भवानी पेठेतील

१ साच्यापीर पेठ नानाची

१२

[ म्यु. दप्तर पुणें ]

---

## १३

# जुन्या विहिरी

१३ जानेवारी १८६४

### विहिरी व आड चालू

| | गोड्यापाण्याच्या | खारेपाण्याच्या |
|---|---|---|
| १५११ खाजगी लोकाच्या | ८६ | १४२५ |
| ६८७ दरमाही पाणी असते त्या | २२ | ६६५ |
| ८२४ आठ माही पाणी असते त्या | ६४ | ७६० |

| | | | |
|---|---|---|---|
| २९ सरकारी | | | |
| | १८ दरमाही पाणी असते त्या | १ | १७ |
| | ११ आठ माही पाणी असते | ० | ११ |
| १५४० | | ८७ | १४५३ |

[ म्यु. दफ्तर ]

## १४
# जुने हौद

पुणें म्युनिसिपालिटीच्या दफ्तरांत पुण्याविषयीं जुनी माहिती मधून मधून कांहीं अनुषंगानें सांपडते. म्युनिसिपालिटी १८५७ त स्थापन झाली. त्यानंतर ३।४ वर्षांत गांवाची सर्व दृष्टींनीं पाहाणी करण्यांत आली. त्यासंबंधी दफ्तरांत सविस्तर नोंदी आहेत. एका नोंदींत पुण्यांत पब्लिक ॲक्ट लागण्यापूर्वीच्या सरकारी व खाजगी हौदांची पुढीलप्रमाणें माहिती आढळते.

### कात्रजच्या नळाला जोडलेले हौद ( सरकारी पब्लिक ॲक्ट पूर्वीचे )

१ काळा हौद पेठ शुक्रवार
१ लकडखान्यांतील हौद
१ तुळसीबागेंतील
१ बुधवारचा हौद
१ फडक्याचा हौद
१ गणेश पेठेचा हौद
१ उरगांव ?
१ बदामी हौद पेठ शुक्रवार
१ भाऊ महाराज यांचे वाड्यांतील सरकारी
१ भाऊ दातार यांचा हौद आलीकडे सरकारांत आहे
१ नानाचा हौद
१ शुक्रवारचा हौद
१ शनवारवाड्यांत

### म्युनिसिपल ॲक्ट झाल्यानंतरचे

१ पेठ रास्ते हालालखोर यास नवीन
१ पेठ नानाची मांगाचे गावाजवळ
१ पेठ गणेश दुरजनसिंगाचे पागेंत
१ पेठ भवानी पुलाजवळ
१ शनिवार हत्तीमाहालांत

### लोकाचे असोन पब्लिक ॲक्ट होण्यापूर्वींचे

१ नरपतगीर बाबा पेठ रास्ते
१ ढमढेरे यांचे वाड्याजवळ बोळांत
१ मोरोबादादाचे वाड्यांत
१ गुरुजी याचे वाड्यांत उसवास
१ खाजगीवाले यांचे वाड्यांत हौद
१ जोग यांचे वाड्यांत
१ माणकेश्वर यांचे वाड्याजवळ
१ बोडस यांचे वाड्यांत
१ टकल्याचे बागेंत देशमुखाचा हौद
१ चिटणीस यांचे वाड्यातील

१ जोशी यांचे घराजवळील उस्वास
१ बोहरी लोकांचे मुलानीयाचे जमान खान्यानजीक
१ बुधवार वाड्यांत मामलेदार कचेरींत
१ घोरपडे याचे वाड्यांत
१ दीक्षित याचे पाराजवळचा उसवास
१ कवडीकर यांचे वाड्यांतील
१ रामेश्वराजवळील विष्णूचे देवळांत
१ फरसखान्यांत
१ पेठ कसबा झांबऱ्याचे चावडीजवळ नरपतगीर गेट

**प्रावीट लोकांचे घरांत असोन मालकांस उपयोग**—ऑक्ट होण्यापूर्वीचे.

१ गोविंदराव करंदीकर याचे वाड्यांत
१ रघुनाथशास्त्री परवते याचे घरांत
१ राघवाचार्य जप याचे घराजवळचा उसवास
१ माणकेश्वर याचे वाड्यांत
१ भिडे याचे वाड्यांत
१ दामले याचे वाड्यांत उसवास
१ कासीनाथ दादा रेटर याचे वाड्यांत
१ दुसरे फडके याचे वाड्यांत
१ सखाराम दादा याचे वाड्यांत
१ तुळसीबागवाले याचे वाड्यांत
१ भिडे याचे घराजळवचा उसवास
१ किबे याचे वाड्यांत
१ दसपुत्रे याचे वाड्यांत
१ मुलार्जी साहेब याचे वाड्यांत
१ भिडे शुक्रवारांतील याचे वाड्यांत
१ चिंतामण पांडुरंग फडके याचे वाड्यांत
१ जपवाले बावा याचे घराजवळचा उसवास

**तक्षम पेठ सदाशिव येथे नहर आंबेगांव येथून फडणीस याणी नळ आणिला आहे त्या नळावरील हौद** ( पब्लिक ऑक्ट होण्यापूर्वीचे )

१ पेठ सदाशिव
१ विश्राम बागेच्या वाड्यांत
१ पेठ सदाशिव पुष्करणीचा
१ लक्ष्मणशास्त्री याचे वाड्यांत

**तक्षम मौजे कोंढवे येथून रास्ते यांनीं नळ बांधून आणिला आहे त्याचे पाणी ज्या हौदास जाते ते हौद**—(ऑक्ट सुरू होण्यापूर्वीचे)

१ रास्ते यांचे वाड्याजवळ महादेव समोर १ रास्ते याचे वाड्यांत व देवळांत वगैरे हौद ३

**तक्षम मौजे कोंढवे येथून रूपराम चौधरी याणी नळ बांधून आणिला आहे त्याचे पाण्याचे हौद आहेत ते.** ( पब्लिक ऑक्ट होण्यापूर्वीचे )

१ पाच हौद
१ पेठ भवानी दिनशा सेठ पारशी याणी बांधिला तो
१ पंचमुखी मारुतीजवळ
१ बोरडिंग स्कूलचे वाड्यांत

प्रावोट

१ जगन्नाथ शंकरसेट याचे वाड्यांत पेठ शुक्रवार येथे.

# १५

# पुणें शहरानजीक असलेलीं चांगल्या पाण्याचीं ठिकाणें

श्री

यादी पाणी चांगलें पुणें मुक्कामी स्वारी गेल्यावर पियावयास आणावयाचे.

१ मौजे वडगांव पुण्याहून अडीचतीन कोस आहे तेथील विहिरीचे चांगले आहे बाजीराव ज्या विहीरीचे आणवीत होते ते.

३ पण्यांत कारकोळ पुऱ्यात भडभड्याचे विहीरीचे चांगले परंतु ही वर लिहीली विहीरीचे न मिळाल्यास मग हे बरे परंतु प्रर्ज्यन्याने विहीर भरली नसल्यास.

२ **सखाराम बापु** पाणी **भांबवड्याचे झरयाचे** अणवीत होते ते चांगले व रास्ते याणी झरा केला आहे ते.

४ पाषाणचे विहीरीचे मळ्यातील पाणी बरे आहे परंतु असल्यास

५ मौजे कोंढाये येथें झरा चांगला आहे. पुण्याहून दोन कोस.

वर नमूद असलेल्या यादीचा अस्सल कागद रामचंद्र गंगाधर जोशी उर्फ दाजीबा दादा सर सुभेदार यांचे वेळच्या जुन्या कागदांत मिळाला. दाजीबादादा हे छत्रपती प्रतापसिंह महाराज व शाहीजी उर्फ आपासाहेब महाराज यांचे कारकीर्दीत प्रथम सरसुभेदार व नंतर हुजूर दप्तरदार होते. अर्थातच यादीचे आरंभी 'पुणें मुक्कामी स्वारी गेल्यावर' असे शब्द आहेत. त्यांतील 'स्वारी' म्हणजे छत्रपती सरकार असा अर्थ करणें रास्त आहे.

यादीचे आरंभी नक्कल असा शब्द नाही. तथापी ही नक्कल असावी. यादींत एकंदर पाच कलमें आहेत. परंतु पहिलें कलमाचे पुढें तिसरें कलम आहे. या कलमाचे मागें आंकडा लिहितानां प्रथम दोहोंचा आंकडा होता तो खोडून त्या ऐवजी तिहीचा आकडा लिहिला आहे दुसऱ्या कागदाची नक्कल करतांना दुसऱ्या कलमा ऐवजी हस्तदोषानें तिसरे कलम लिहिलें गेलें. अर्थातच सबंध कलमांस काट मारण्याऐवजी प्रत्येक कलमाचे मागें जे अंक आहेत त्यांची दुरुस्ती करून मूळ कागदांतील कलमांचा अनुक्रम कायम ठेविला आहे दुसरे कलमाचे शेवटी 'व रास्ते याणी झरा केला आहे ते' हे शब्द मागाहून लिहिले आहेत.

[ रामचंद्र गंगाधर जोशी, सरसुभेदार सातारा यांच्या दप्तरांतील कागद त्यांचे पणतू रा. वा. वि. जोशी यांच्या कृपेनें प्रस्तुत के. ]

## १६

# मुंजेरी व माळी भागाची व्याप्ति

'मुंजेरी' व 'माळी' हीं नांवें पुण्यांत अनेक भागांत आढळतात. पुण्याच्या आग्नेयेस 'स्वार गेटा पलीकडे कात्रज रस्यावर " मौजे मुंजेरी " नांवानें एक भाग आहे. त्याच्या समोर ' मस्तानी बाग ' आहे. हिराबागेच्या उत्तरेस ' शीव निसबत मुंजेरी ' आहे. थोरल्या माधवरावाच्या रोजनिशींत एके ठिकाणीं " सटवाजी वाडेकर वस्ती कसबे पुणें निसबत मुंजेरी " असा उल्लेख आहे ( वाड थो. मा. २ क्र. ६२२ ). पुण्याच्या पेठवार भागांत ' कसबा माळी ' व ' कसबा मुंजेरी ' असे दोन भाग १८६५ च्या म्युनिसिपल याद्यांत आहेत. आजहि कसब्याचा पूर्वभाग मंगळवारच्या पुलापर्यंत मुंजेरी–माळी अशा नांवानें कांहीं लोक ओळखतात. ' माळी वेस ' कोठें होती ती जागाहि दाखविण्यांत येते. शुक्रवारांतील कांहीं भाग ' माळी ' म्हणून म्हटला जातो. येरवड्याच्या रेव्हेन्यू नकाशांत संगमापासून बंडगार्डनच्या धरणापर्यंतचा भाग " मौजे माळी मुंजेरीची शीव " म्हणून दाखविला आहे. त्या बाजूस नदींत ' माळी मुंजेरीचें बेट ' अशीं दोन बेटेंहि दाखविलीं आहेत. पुणें शहर ज्यावर वसलें त्या तीन वाड्यांपैकीं पुणेंवाडीस मुंजेरी म्हणतात, असें लोकहितवादी सांगतात ( ऐ. गोष्टी २–३१ ); तसेंच पुण्याचे आग्नेयेस मुंजेरीची व पूर्वेस माळीची जमीन आहे, असेंहि त्याच पुढें सांगतात.

यासर्व गोष्टींवरूनहि मुंजेरी–माळी भागांची व्याप्ति नरी केवढी होती याचा निश्चय होत नाहीं.

(१) पुणें शहर हल्लीं जेथें आहे तेथें कसबे लोहोगांव होतें. त्याच्या तीन वाड्या-कासारवाडी, पुणेंवाडी, पाडळी. कासारवाडीवर पेठा कसबा झाला. पुणेंवाडीस **मुंजेरी** म्हणतात व पाडळीस माळी राहत होते त्यास हल्लीं **माळीच** म्हणतात.

पुणें वाडीचे पाटील झांबरे व कुलकर्णी राजकर्णी होते.

पुण्याचे आग्नेयेस मुंजेरीची जमीन आहे व पूर्वेस माळीची जमीन आहे.

—ऐतिहासिक गोष्टी भाग २ पृ. ३१

( २ ) १६७८ तला माळी भागाचा उल्लेख अप्रसिद्ध पेशवे दप्तरांत सांपडतो. यानंतर इ. स. १७०३ मध्यें जी मोजणी झाली तीवरून माळी जमीन ९०० चौरस बिघे ( ७॥८४ टके ) व मुंजेरी सव्वातीन चाहूर ( १३८१ टके ) होती असें दिसतें. १७४६–४७ त माळीमुंजेरी असा जोड उल्लेख सांपडतो. आस्तापूर पेठ ( मंगळवार ) माळीमध्यें घेतली व पेठ मोडली अशीहि माहिती आहे. —श्री. डिकसळकर टांचण.

( ३ ) हिराबागेच्या चतुःसीमा—

१ पूर्वेस प्रतबंदी नं. १८।१९

१ दक्षिणेस मार्ग ओलांडून प्रतबंदी नं. १६।१४
१ पश्चिमेस पर्वतीचें तर्फे प्रतबंदी नं. ११।१३ व शीव निसबत मुंजेरी
१ उत्तरेस शीव निसबत मुंजेरी व प्रतबंदी नं. १८
( २१ माहे एप्रिल १८५६ ची सनद हिराबागेची )
( ४ ) '.सटवाजी वाडेकर वस्ती कसबें पुणें निसबत मुंजेरी.'
— वाड रोजनिशी थोरले माधवराव २ ले. ६२२.
कलम

---

## १७

# तुळशीबागकरांची मुंजेरी बाग

श्री

कैफयत नारायणराव रामचंद्र खिरे तुलसीबागकर सुा तिसा आशेरीन मयातैन व अलफ शके १७५० सर्वधारी नाम संवछरे संवस्थान तुलशीबाग का। पुणे याकडे श्रीमंत कैलासवासी नानासाहेब व भाउसाहेब पेशवे पंतप्रधान यानी का। मा।रचे **मुंजरी** पो। बाग करावयास जमीन दिल्ही तेथे आम्ही बाग केला दाहा पाचवर्षे जाहाली यावर मलोजी बिन येसाजी झाबरा नि।। **मुजरी** का। मा।र याची मिरासीची जमीन त्या जमिनीत त्याने विहिरीचे खालटे खापून लाकडाची वडव लावली होती त्याचे खर्चाबा। व वतनी जमीन याचे किंमती बा। झाबरा मा।र वारसा सांगू लागला त्यास पेशवे सरकारातून जमीन आम्हास दिल्ही खरी परंतु झाबऱ्याचा हरयेक विसी वारसा नसावा म्हणोन शके १६८४ चित्रभानु नाम संवछरी विहिरीचे खाचऱ्याबा। व वडवेचे लाकडाबा। व मिरासी जमिनीचे किमतीबा। ठरावाचे रु। देऊन झाबरा याचे खरीदीखत करून घेतले तो बाग आम्हाकडे बहुत दिवस असता अलीकडे कैलासवासी **नाना फडणीस याणी आपले बागे**लगत आमची बाग आहे तेथे हरजिनसी झाडाची रोपे तयार करून हुड्या काढून नेऊं म्हणून बाग मागून घेतली झाडाच्या हुड्या काढून नेऊन आमची बाग आम्हास द्यावी ती दिल्ही नाही फडणीस राज्याचे कारभारी त्यानी ती बाग आमची आपले बागेखाली दाबली त्यास आमचे बागेची जमीन रुके ८३ तीन नि।। **मुजरी** याप्रो। आजपर्यंत कुलकर्णी जमीन झाड्यास आमचे आजे कैलासवासी नारो आपाजी यांचे नावें लिहीत आले आहेत याजकरिता साहेब मेहरबान होऊन आमची बाग आम्हाकडे चालती केली पाहिजे मिती मार्ग शु।। १

[ उलटतांच पाठीमागच्या टोकावर शेरा—

सदर्हूप्रो। कैफत गंगाधर महादेव मोजणीचें कारकून न पांडुरंग सखाराम मुनीम याजपासी दिल्ही असे]

[ तुळशीबागवाले दप्तर ]

---

## १८

# तुळशीबागकरांची पर्वतीबाग

श्रीमंत

राजश्री तात्यासाहेब सुभेदार साहेबाचे शेवेसी

कबूल बोपसेटी बीन बहिरजी ताटेमाली सुा सित अशेर मयातैन व अलफ तुमची आंबराअी बाग मौजे पर्वती येथील आम्ही मक्त्याने घेतली त्याचे करार रुपये ७५ पाऊणसे चांदवड चलनी देऊं अस्मानी जाली तर आमची आम्हाकडे आपल्याकडे काही कझ्यां नाही सुलतानी जाली तर जनसिरस्तेप्रमाणे साहेबी मजुरा द्यावी खेरीज आंबे पिकले सुमार दोनसे देऊं हे कबूल कतबा लेहून दिल्ही सही मिती फाल्गुण वा ५ शके १७३७ युवानाम संवछरे नीाा खुद्द

[ 'बिाा गंगाधर बलाल जोसी कुलकर्णी मौजे वडगाव कराड ' असें बाजूला आहे. ]                [ तुळसीबागवाले दप्तर ]

---

## १९

# जुन्या बागा

पेशवे दप्तर ४० ले. ५६ बाळाजी बाजीराव यांच पुणें येथील बागांची गणती आहे.

| | |
|---|---|
| १ नाईचा १ | ११ पाटणकर १ |
| २ बाईचा १ | १२ चिमणाजी भीवराव १ |
| ३ जोगळेकर १ | १३ सरकारचे ३ |
| ४ जिवाजीपंत ३ | १४ महिपतराव १ |
| ५ माहादोबाचे २ | १५ आयाबा १ |
| ६ बाईचा ( पर्वतीचे नागा जवळील ) १ | १६ मल्हारजी होळकर १ |
| ७ विसाजी पंत १ | १७ सुभेदाराचा १ |
| ८ श्रीपतराव बापूजी १ | १८ राणोजी शिंदे १ |
| ९ सिदोजी राऊत १ | १९ वानवडी १ |
| १० पुरंदरे भट १ | २० त्रिंबक रामाचा १ |

## २०

# लकडी पुलाजवळील समाधी

लकडीपूल नानासाहेब पेशव्यांनी १७६१ मध्यें बांधला. ' नडगे मोडीस ' बांधला असा उल्लेख असल्यानें **नडगे मोडीची** जागा ती असावी असें दिसतें. नानासाहेबांना याच पुलाजवळ दहन केलें. पुढें नारायणरावांच्या वधानंतर याच स्मशानाच्या जागीं त्यांच्या छिन्नविच्छिन्न शवाला त्रिंबकरावमामा पेठे यांनी अपरात्रीं अग्निसंस्कार केला. या ठिकाणची एक समाधी ' खून झालेल्या पेशवे सरकार ' ची आहे असें कांहीं जुने वृद्ध सांगत. याची आठवण पोष्टमन रा. चव्हाण यांना आहे. हें आपल्याला त्यांनीं दिलेल्या माहितीवरून दिसतें. म्हणजे या ठिकाणीं एकदां ब्राह्मणी स्मशान होतें असें निश्चित वाटतें. आणखी या भागांत कांहीं सतींच्या समाधी आहेत.

या काळानंतर ब्राह्मणांचें स्मशान ओंकारेश्वराजवळ गेलेलें दिसतें. जुन्या पुण्याचें स्मशान मंगळवारांत नागझरीच्या कांठीं होतें.

पोस्टमन चव्हाण व इतर ३१४ मराठे कुटुंबें यांचा पुलाजवळ विठोबाच्या घाटाखालीं प्रेतें जाळण्याचा हक्क पूर्वापार आहे. चव्हाणांच्या ऐकण्यांत पुलाच्या ओंकारेश्वराच्या बाजूची नंदीची समाध खून झालेल्या पेशवे सरकारची आहे, असें होतें. त्या पलीकडे एक लहान समाधि आहे. नदीच्या पलिकडच्या तीरावर गिरी गोसावी यांचें स्मशान असे. पुलाच्या ब्राह्मणेतर स्मशानाच्या बाजूच्या समाधी बडोदें राजघराण्यांतील माणसांच्या आहेत. खंडेराव गायकवाडाच्या कारकीर्दींत एक बाई पुण्यास येऊन राहिली होती. पुण्याचा प्रसिद्ध पहिलवान सावळाराम कुंभार हा तिजजवळ असे. ट्रेनिंग कॉलेज शेजारील ( मागें डॉ. कीर्तने होते तो ) वाडा तिच्याकडे होता. पुढें सिंदकरांकडे गेला. पंतांचा गोट सदाशिव पेठेपर्यंत होता. पुढें हटत हटत मागें गेला. पंतांना जागा एका मराठे घराण्यापासून वापरण्यास फुकट मिळाली होती. ठोसर पागा व इतर पुलाजळील जागा महाराज लिमये यांच्याकडे पुढें गेल्या, अशी रा. चव्हाणांनीं माहिती दिली.

---

## २१

# दहातोंडांची देवी

स्वाराच्या गेटाजवळ पंचमुखी मारुतीच्या मागें एक लहानसें पण उंच ( पायऱ्यांचें ) नुसता गाभारा असलेलें देऊळ आहे. हें सहस्रार्जनु क्षत्रिय मंडळाच्या

( पंचांच्या ) ताब्यांत आहे. पंचांचे मुख्य श्री. बाबूराव वाळवेकर आहेत. देवींची व्यवस्था पाहाणारा एक माणूस गोरले नांवाचा आहे. देवळांत दोन देवींच्या मूर्ति आहेत. एक अष्टभुजादेवी पांढऱ्या दगडाची व दुसरी अठरा हातांची व दहा तोंडांची, काळ्या दगडाची आहे. ही एकवीरा किंवा हिंगलाज देवी असावी. सर्व हातांत आयुधें असून त्रिशूळाला राक्षस लटकावला आहे. देवी मोठी चार फूट उंच आहे. तोंडें उजव्या बाजूस पांच, डाव्या बाजूस चार व मध्यें एक अशीं आहेत.

देवींच्या देवळाच्या उत्तरेस एक विष्णूचें जुनें देऊळ आहे. जुनी विष्णूची भंगलेली मूर्ति बाहेर काढून ठेविली असून नवी गाभाऱ्यांत बसविली आहे; शिवाय गाभाऱ्यांत साधू बैराग्यांनीं इतर देव ठेविले आहेत. गोपाळनाथ साधूची देवळांत समाधि आहे. बाहेर इतर समाध्या आहेत. हल्लीं देवळाच्या आवाराची व्यवस्था चांगली ठेविली आहे.

भद्रकाली ही अठरा हातांची असते म्हणून नृसिंहप्रासाद ग्रंथांत वर्णन आहे. पण त्या ठिकाणीं ती आलीढासनांत किंवा सिंहरथांत बसलेली असें वर्णन आहे. पण ही देवी उभी असून दहा तोंडांची आहे.

---

# २२
# दगडी दीपपुतळी

१ कसबा गणपतीला लागून दक्षिणेस जुनें ढेरे यांचें घर आहे. पूर्वींचें तें होनप देशपांडे यांचें. सांप्रतचें विष्णु मंदिर १४० वर्षांपूर्वींचें; त्यापूर्वींचा **रामेश्वर** महादेव आंत आहे. बांधणी उत्तर हेमाडपंती म्हणजे ४०० वर्षांपूर्वींची. शेजारीं समाधि. दोहोंवर घासलेले शिलालेख आहेत. रा. आबा चांदोरकर यांनीं 'पुणें समाचारां'त याची माहिती दिली आहे. तिचा उतारा कै. शं. बा. मुजुमदारकृत 'पुणें शहराचा पेशवाई नंतरचा इतिहास' यांत आहे. हें पुस्तक प्रसिद्ध झालेलें नाहीं.

या रामेश्वर देवळांत दगडी कोनाडा दगडी छपराचा आहे. तो पाहाण्या-सारखा आहे.

या रामेश्वराभोंवतीं दगडी दीपपुतळ्या होत्या; त्यापैकीं एक पायमोडकी निकामी झालेली दगडी दीपपुतळी प्रा. पोतदार व श्री. सरदार मुजुमदार यांस आढळली ती सांप्रतचे रामेश्वरचे वहिवाटदार श्री. बाबूराव ढेरे यांचेकडून आणली. ढेरे शिवकालीन आहेत. खेळोजी भोसले यांचे वेळचीं इनामपत्रें ढेरे यांजजवळ अद्यापि आहेत.

दीपपुतळी चारशें वर्षांची असावी.

## २३

# रास्त्यांचा नळ

पेशवाईतील आनंदराव भिकाजी रास्ते यांनीं श्री गणपतीचें देऊळ बांधून नंतर पुढें पूर्वेस रास्ते पेठ वसविली. त्याचे उत्तरेस राहता वाडा व श्री लक्ष्मणेश्वर देऊळ बांधलें. पेठेचे व वाड्याचे उपयोगाकरितां मौजे कोंढवे गांवचे हद्दींत पाटलाचे एका जमिनींतून नळ घालून ठिकठिकाणीं उस्वास बांधून श्री लक्ष्मणेश्वर देवळासमोर तीन मोठाले हौद बांधून पेठेची सोय लावली व एक वाड्यांत व आजुबाजूचे वावरास जमिनीस पाणी सोडलेलें आहे. कोंढवे गांव वाड्यापासून सात ७ मैलांचे अंतरावर वानवडी गांवचे दक्षिणेस आहे. सदर नळ शके १७०० इसवी सन १७७८ सालीं श्रीमंत पंत पेशवे सवाई माधवराव यांचे कारकिर्दींत बांधिले आहेत. पेठेची व्यवस्था व सर्व अधिकार श्रीमंत रास्ते घराण्याकडे सन १८६० पर्यंत होते. पेठे-वरील करही रास्त्यांकडेसच येत होता. म्युनिसिपल कमिटी स्थापन झाली असल्यानें तेव्हां कमिटीकडेसच तो अधिकार गेला व सायरबाब बंद होऊन कमिटी पट्टीरूपानें वसूल होऊं लागली. ह्न्याचें पाणी आजपर्यंत चालू आहे. मध्यं-तरीं अवल इंग्रजी अमल सुरू झाला. त्यावेळीं फौजेस चांगलें पाणी मुबलक मिळत नव्हतें. त्यावेळीं रास्त्यांचें पाणी चांगलें आहे हें पाहून फौजेस पाणी वापरण्यास घेतलें. व त्यांच्याकडे जरुरीपुरतेंच सोडीत होते. पुढें खडकवासल्याचें धरण झालें व त्याचे फिल्टरची व्यवस्था करून तें पाणी लष्करास वापरूं लागले व रास्त्यांचें पाणी पूर्ववत् त्यांच्याकडे येऊं लागलें. त्यांचें पाणी बिनमोबदला वापरलेबाबत नुकसानी-दाखल त्यांपांत फिल्टर झालेले पाण्यापैकीं दररोज पांच हजार ग्यालन पाणी मोफत ( चार्ज न घेतां ) देणेचें ब्रिटिश सरकारांनीं ठरविलें आहे. त्याप्रमाणें आज मितहू पाणी रास्त्यांच्या वाड्यांत येत आहे.

---

## २४

# जुन्या मंडईचा कौल

[ सातारा इतिहास-संशोधक मंडळाची ऐतिहासिक लेखमाला नं. २ क्रमांक ४१३ ]

" सेवेसी रामकृष्ण विज्ञापना येसीजे. माझे भाऊ दिलीहून दोघेतीघेजण आले आहेत. त्यांच्या रोजगाराची सोई जाहाली पाहिजे. त्यास साहेबी कृपाळु होऊन शहर

कसबे पुर्णे येथील सबजी मंडईचें काम सांगावें सबजी मंडई जाहालियास साहेबांची कीर्त आहे. वरकड शहरें दिली व बऱ्हाणपूर व आवरंगाबाद या शहरांत मंडईचा आमल चालत आहे. त्याप्रो मजपासून घेत जावा. कामकाज चालीस लागल्यानंतरी सरकार किफायत माझ्याणे जी होईल ती करून दाखवीन. तूर्त येवज रुपये सरकारांत सालिना खंड मख्ता ५००० रुपये, साहेबाची नजर १००० रुपये येकूण ६००० साहा हजार याप्रो बशर्त काम हामेषचंदीप्रो घेत जावें. येतद् विषयीचा बंदोबस्त चांगला करून देविला पाहिजे. हजारो रुपये खर्च करावे तेव्हा मंडईची वसाहत होत्ये. हें काम साहेबांच्या नावावर होऊन येईल. यासिवाय वाव हेर जिनस भाजी सरकारांत येत जाईल. "

---

## २५

# येरवडें-गारपीर रस्ता

सन १८१३

" येरोड्याचे मुक्कामीहून दोन पलटणें व घोड्याच्या तोफा दोन, टोपकर मंडळी सुद्धां प्रातःकाळीं निघोन खडकीचे पुलानें लांकडी पुलावरून शहरांतून बुधवारांतील सरकार वाड्या जवळोन भवानी पेठेचे रस्त्यानें घाशीरामाचे तळ्याजवळ जाऊन उभी राहिली. "

[ पे. द. ४१ ले. ५७

" पलटणें उदईक येरवड्याहून निघोन गारपिरास येणार सबब खडकीचे पुलावरून लाकडीपुलानें शहरांतून जावयाचा रस्ता दाखवाया करितां मशारनिल्हेनीं आपले कडील एक जासूद व सरकारचा जासूद एक एकूण दोन जासूद येरवड्यास पलटणांत पाठविले. "

[ पे. द. ४१ ले. ६०

यावरून येरवड्याहून गारपिरास जाणारा मोठा रस्ता लकडी पुलावरून, गांवांतून होतासें दिसतें.

---

## २६

# रविवार पेठेंतील मोठे लोक

यादी घरपटी माफ आसामी येकंदर पेठ रविवार कसबे पुर्णे सुा इहिदे मया तैन व अलफ

४७॥ फकीरचंद
७९॥ इमाम मुलाणा
६ विसोबा नाा सराफ
३६ हरिभक्ति
२५ कृष्णाजी भैरव थत्ते
१५ जिवबा नाा वाकडे
१४ महिपतराव प्रल्हाद
९ बालकृष्ण शास्त्री
१० गंगा विष्णु वैद्य
१० धोंडीबा आपा पुरंदरे
१७ विसाजी कृष्ण बिनीवाले
१२ रंगोबा नाा वानवले

२९१
५० वर्षासन श्री व्यंकटेश देवास नैवेद्य नंदादीप

३४१

पे. द. ४३. ले. २१ ] [ इ. स. १८००–०१

हरिभक्ति, वाकडे, वानवले, हे प्रसिद्ध सावकार होते. बिनीवाल्यांचा वाडा रविवारांत होता हें नक्की ठरतें.

---

## २७

# रामनवमीचे उत्सव

यादी गोट गस्ती विा आपाजी जनार्दन छ २ जिलकाद शुक्रवार. रामनवमीचे उछव सालाबाद प्रो सालमजकुरी आहे

१ तुलसी बागात
१ मेरालपंत पेठ सुक्रवार
१ नरसिंगराव मांडवगणे
१ त्रिंबकराव आंबीकर निा फरासखाना
१ दिनकरराव देशपांडे पुणेकर
१ हिरोजीराव पाटणकर
१ बाजीराव पाटणकर नारायण पेठ

| | |
|---|---|
| शनवार— | १ हैबतराव शंकर पम्भु |
| " | १ जनार्दन गोपाळ लवाटे |
| बुधवार— | १ कृष्णाजी नाईक थत्ते |
| रविवार पेठ शर्नीचे देऊळ | १ जेयरामचाचा गोसावी रामदार्मा |
| | १ मालोजी घोरपडे |
| | १२ |

पे. द. ४३ ले. ३७] [ २८-३-१८००

---

२८

# शेट्याचा बाजार

" श्रावण सुध ६ शेस्टी सोमवारी **मुजरी**चे झांबरे पाटील याणी पेसवियास पैका देऊं केला. त्या हिर्माहिरनीने सिरालसेट बाजागने नेऊन **सेखसलाह**च्या खिडकीने नदींत टाकिला. वरसास गोविंदजी देसमुखाच्या वाड्यावरून गंजीने नेत असेत. यंदा सेटियाचे बाजारे नेला. मागे कधी बाजारे नेला नव्हता. सेटियावर जुलूम जाला. नव गड्या होतो. म्हणून सांगावयासहि आले होते. "

पे. द. २२ ले. २९५] [ १४-७-१७३५

---

२९

# रोहरा ?

" कार्तिक सुध ३ शनवारी प्राथःकाली राजश्री बाजीराव पंतप्रधान मुलुक-गिरीस जावयास मुहूर्ते रा बाबूजी नाईक जोसी यांच्या घरास गेले; व डेरे भांबो-डाच्या रानात रोहरापासी दिल्हे बाबूजी नाईकांचे घरीहून दुसरे तिसरे रोजीं भांबो-डियापासी डेरे होते तेथे गेले. "

पे. द. २२ ले. ३६२] [ १५-१०-१७३७

---

३०

# शनवारवाड्याला आग व पाण्याचे बंब

ही आग १८०८ सालच्या एप्रिल महिन्यांतील. आग जव्हाहिरखान्यांत लागली. दोन तुळयांचे कोपरे व दहा कड्या जळाल्या. लगेच पाण्याचे बंब आल्यामुळें

फारसे नुकसान झालें नाहीं. शेजारीं दफ्तर होतें तें सुरक्षित राहिलें. पाण्यानें भिजलें मात्र. शुक्रवार वाड्यापुढील बंब आणले होते. पे. ३२ ले. २१४–२२३ अशीं दहा पत्रें या आगीसंबंधी आहेत. थोडी हलगर्जी झाली असती तर महान् अनर्थ ओढवला असता असें अनेकदां म्हटलें आहे. यापूर्वी १७९४ सालीं वाड्यांत आग लागली होतीच व पुढें १८१२ सालींहि लागली.

या आगीच्या वेळीं पाण्याच्या बंबांचा उल्लेख आहे हें विशेष ! बंब त्यावेळीं होते तर !

---

# ३१

# सदाशिव पेठेची चावडी व झेंडा

दु. बा. पे. रो. पान २९६ वर सदाशिव पेठेंतील देवळें सांगतांना दयाराम जोहाऱ्याच्या महादेवानंतर आणि सोट्या म्हसोबाच्या आधीं पुढीलप्रमाणें नोंद आहे:

" १ नागोबा–पेठेचे झेंडेजवळ चावडी पुढें चौथऱ्यावर आहे त्यास "

यावरून सदाशिव पेठेंत पेठ चावडी असून तेथें सरकारी झेंडाहि होता हें स्पष्ट आहे. ही चावडी व हा झेंडा जेथें होता तेथें एका चौथऱ्यावर नागोबा होता. त्याजपुढें पेशव्यांनी रुपया ठेवल्याचीही सन १८१०–११ मधील नोंद आहे. रोजनिशींत देवळें क्रमांनीं सांगितलीं असल्यास जोहाऱ्याचे महादेवापासून सोट्या म्हसोबाचे दरम्यान ही चावडी, झेंडा आणि नागोबा सांपडावयास पाहिजे. पेशवे दप्तरांत अधिक नोंदी शोधणें हा एक मार्ग हें स्थळ नक्की करण्याचा आहे. त्याच्या जोडीला या क्षेत्रांतील वास्तूंच्या वर्णनाचे भोगवट्याचे कागद पाहाण्यास मिळविणें हा दुसरा मार्ग आहे. सदाशिव पेठेंतील मंडळी या कामीं लक्ष घालतील तर ही महत्त्वाची जागा लवकर निश्चित करतां येईल.

---

# ३२

# केदारवेस

दु. बा. पे. रो. पृ. २८६ वर रविवार पेठेंतील देवळें नोंदतांना सोमेश्वर व मनराम बढयाचा रामचंद्र सांगून झाल्यावर कापड ओळींतील हनुमंताच्या पूर्वी पुढील नोंद आहे— " १ विष्णु जगन्नाथ काशिकर कासार आळींत केदार वेसीजवळ. " यावरून हल्लीच्या केदारेश्वराच्या देवळाचे थेट मागें रविवारपेठ व्यवहार आळीच्या फाट्याशेजारीं म्हणजे पूर्वीच्या कासारविहिरीच्या आसपास केदार वेस असली पाहिजे.

---

## ३३

# मौजे कासारी

कासारी, कुंभारी, मुंजेरी वगैरे लहान गांवें मिळून कसबे पुणें तयार झालें, अशी कथा प्रचलित आहे. यापैकीं कासारी गांवाची दिशा आपल्याला अनुमानानें ठरवितां येईल. कासार विहीर यान्यामागेंच कासार आळी येईल आणि कासार देवी. हीं ठिकाणें ज्या हद्दींत सांप्रत मोडतात तो भाग कासारी गांवाचाच असला पाहिजे. सांप्रत हा भाग कांहीं कसब्यांत व कांहीं रविवार पेठेंत मोडतो.

---

## ३४

# पासोड्या मारुति

दु. बा. पे. रो. पृ. २८६ वर नोंद अशी आहे–" १. हनुमंताचें देवालय कापड ओळींत नारायणगावीं पासोड्या विकावयास बसतात तेथें." हा उल्लेख रविवार पेठेच्या खालीं केला आहे. आज पासोड्या मारुति विद्यमान आहे. त्याचाच हा उल्लेख असला पाहिजे. जुन्नराजवळ नारायणगांवास होणाऱ्या पासोड्या येथें विकावयास बसत असत. यावरून पासोड्या मारुति हें नांव या मारुतीस पडलें असावें. छापील रोजनिशींत नारायणगांवीं असा शब्द अनुस्वारांसह लिहिला आहे. पण नारायणगांवीं म्हणजे नारायणगांवच्या असा अर्थ असल्यामुळें अनुस्वाराची जरूरी नाहीं.

---

## ३५

# टांकसाळ

दु. बा. पे. रो. पृ. ३०३ वर गणेश पेठेच्या सदरांत नोंद आहे ती–

"।. मुंज्या निंबाचे झाडाखालीं देवळींत टांकसाळीचे दक्षिणेस रस्त्यांतील यास."

डुल्या मारुतीच्या नंतर ही नोंद आली आहे. यावरून डुल्या मारुतीच्या आसपास कोठें तरी टांकसाळ असली पाहिजे.

---

## ३६

# महत्त्वाचीं देवस्थानें

( सन १७७३ त सवाई माधवरावांच्या जन्मकालीं )

**१ महादेवः**—१ नागेश्वर; २ वृद्धेश्वर ( भांबुर्डे ); ३ देवदेवेश्वर ( पर्वती ) हीं मुख्य देवस्थानें.

( ४ ) सिद्धेश्वर ( मंगळवार ); ५ केदारेश्वर ( सोमवार ); ६ त्रिंबकेश्वर ( वेव्हारआळी ); ७ केदारेश्वर ( गणपतीजवळ ); ८ नीळकंठेश्वर ( मजमदाराचे घरानजीक ); ९ स्वयंभू ( दुर्जनसिंगाचे हवेलीनजीक ); १० रामेश्वर ( शुक्रवार ); ११ काशी विश्वेश्वर ( तुळशीबाग ); १२ रामेश्वर (योगेश्वरी देवळांतील); १३ हरिहरेश्वर ( शनवार ); १४ पंचलिंग ( पुलावरील ); १५ अमृतेश्वर; १६ सिद्धेश्वर; १७ ओंकारेश्वर; १८ त्रिंबकेश्वर ( बांचवडे ); १९ महादेव ( बुधवार पेठेचे विष्णूचे देवळांतील ); २० महादेव ( बुधवार ).

**२ विष्णुः**—मुख्य देवस्थान १ विष्णु ( पर्वती ). २ विठोबा ( गंज ); ३ व्यंकटेश (तोफखान्याजवळ); ४ रामचंद्र ( तुळशीबाग ); ५ लक्ष्मीनारायण (बुधवार); ६ वेंकोबा ( बुधवार ); ७ कृष्णनाथ ( अमृतेश्वर ); ८ कृष्णाजी नाईक दातार याचे धर्मशाळेंतील; ९ विठ्ठल ( जोतीपंताचा ).

**३ गणपतिः**—मुख्य देवस्थान १ गणपति ( गांवांतील कसबा ! ). २ गणपति ( आदितवार ); ३ सोमवार पेठेंतील चावडीनजिक; ४ मातीचा गणपति ( शनवार ); ५ वाड्याचे कमाणी दरवाज्या नजीक; ६ योगेश्वरी देवळांतील; ७ मोरेश्वर ( तुळशीबाग ); ८ मोरेश्वर ( बुधवार विष्णूचे देवळांतील ).

**४ हनुमंतः**—मुख्य देवस्थान १ शनवार पेठेंतील. २ अमृतेश्वराचे देवळांतील; ३ बुधवारांतील शेंड्यानजीक; ४ रविवारांतील; ५ सोमवारांतील; ६ गणेश पेठेंतलि; ७ शुक्रवारांतील.

**५ महादोबा**, कसब्यांतील मुख्य देवस्थान.

**६ बहिरव** „

**७ पद्मोबा**

**८ बालोबा मुंज्या**

**९ वेताळ**, शुक्रवारांतील

**१० शेख सल्ला**

**११ शेख साद**

**१२ बाबदेव**

१३ मुंज्या, पार्गेतील.

१४ योगेश्वरी देवळांतील पिंपळाखालील देव

१५ म्हसोबा लकडखान्यांतील.

[ वाइ गेजनिशी स. मा. १. ७८ ]

---

## ३७

# ओंकारेश्वर

" राजश्री पेसवियानी गाये उतारी नवे सिवालये करविले. राजश्री सिवरामभट चित्राव यास काम घ्यावयास सांगितले असे. त्याचा मूहूर्त केला."

पे. द. २२ ले. ३३९ ] [ २६-१०-१७३६

" आषाढ सुध त्रयोदसी रविवासर प्रहर तिसरे प्रहरा नटगे मोर्डीस सिवालय बांधलें आहे, त्या मधे बाणांची स्थापना केली. बाण थोर उत्तम लक्षणयुक्त नरमदेहून ब्राह्मणानें आणिला होता. त्यास पाच सातसे रुा दिल्हे होते. साळोखा पार्थिव लिंगा-मागिली नांवड्या पाश्याणांची नवी करून लिंगस्थापना केली. सदरहू शिवालये व आवधा खर्चवेच पेसवियानी केला; परंतु वेदमूर्ती सिवरामभट चित्राव याजकडून काम-काजाचे पारपत्ये करविले. आवघी काम करावयाची व घ्यावयाची उजकरणी वेद-मूर्तीनी केली असे. गोविंदभट बरवे बापूभटाचे पुत्र, याणी मागे फटकाल कर्म केले होते; त्याजवर ब्राह्मणानी शब्द आणिला. समत केले. त्याजवर मातोश्री राधाबाई पेसवियांचे आज्ञेवरून ग्रामस्तानी समत घातले नाहीं. प्रभूची आज्ञा पाहिजे म्हणून अनमान केला, कोकणस्थानी ग्रामस्ताचा द्वेश मांडिला आहे."

पे. द. २२ ले. ३७८ ] [ १८-६-१७३८

---

## ३८

# बुधवारांतील बालाजी

" ४० हरिभक्ति परायण श्रीनिवास गोसावी यासी श्रीवेंकटेशाची स्थापना बुधवार पेठेंत केली आहे त्याचे नेवेद्य नंदादिपाबद्दल वर्षासन छ २८ साबान सन समस." ( १७८९-९० )

[ पे. द. ४५. ले. ४७ ]

---

# ३९
# जुनी व नवी बेलबाग

सोमवार पेठेंत नागेश्वराच्या जवळच पश्चिमेस ' जुनी बेलबाग ' नांवाचें एक विष्णूचें देवस्थान आहे. तें अगदीं हुबेहूब बुधवारच्या बेलबागेप्रमाणें आहे. देवमूर्ति, सभामंडप वगैरे सर्व लहान प्रमाणावर नानाफडणिसांच्या बेलबागेप्रमाणेंच आहेत. हें देवस्थान सध्यां खापर्डे यांच्या मालकीचें आहे. त्यांचे पूर्वज शेवटच्या बाजीरावाच्या वेळेस प्रसिद्ध होते. आडनांव कोतवाल होतें. ही बेलबाग किती जुनी आहे हें पाहिलें पाहिजे.

नानाफडणिसांनी आपली बेलबाग १७६५–१७६९ या कालांत बांधली. देवस्थानची जागा पूर्वी ' जनाईचा मळा ' या नांवानें ओळखली जाई. नंतर त्यावर पेशव्यांची पागा होती. देवळाला सुमारें २५००० खर्च आला.

---

# ४०
# बेलबागेंतील विष्णुमूर्ति

पे. द. ४३ मधील ७७ व्या पत्रांत [ २२–१–१७६६ ] हरीपंत फडके नाना फडणिसास विष्णु आणि गणपति या दोन मूर्तीबद्दल लिहितात—

" बैरागी हिंदुस्थानांतून विष्णु व गणपतीची मूर्ती घेऊन आले. मूर्ति फार चांगल्या याजकरितां घेतल्या. गणपतीस तुमचे नांवची अक्षत लाविली. विष्णुमूर्ति फार चांगली त्यास लहानसें देऊळ बांधू पुष्पवटिका करावी असें मानस "

यापुढें जागा पाहाण्याविषयीं मजकूर सविस्तर आहे. ही मूर्ति बेलबागेंत बसविलेली असेल काय ? गणपति कोठें बसविला ?

---

# ४१
# शुक्रवार पेठेंतील बेलबाग

" १॥ पर्वतीस जातांना डावे बाजूस पूर्वेकडे बेलबागे जवळचा
१ पंचमुखी हनुमंत, रस्त्यांत. "

ही तिसरी बेलबाग दिसते. [ वाड दु. या. पृ. २९२ ]

---

४२

# चोळखण आळींतील वैद्यांचें राममंदिर

या राममंदिरासंबंधानें जी कागदोपत्रीं जुनी माहिती आहे ती खालीं देण्यांत येत आहे.

हें राममंदिर वांईचे इतिहासप्रसिद्ध वैद्य घराण्यांतील पेशव्यातर्फे नागपूर दरबारीं वकील म्हणून काम करणारे नारायण बाबूराव वैद्य यांनीं सन १८१२।१३ सालीं बांधलें. नारायणरावांचे वडील बाबुराव विश्वनाथ यांनीं १९।६।१७९५ रोजी जनार्दन गोपाळ व माधवराव हरी विंझे यांजकडून त्यांचा वाडा कर्ज रु. ४१५० द. म. द. शें. ८८ प्रमाणें देऊन गहाण घेतला. १८ महिन्याच्या आंत व्याज मुद्दलसुद्धां रक्कम देऊन गहाण न सोडविल्यास वाडा फरोक्त समजावा अशी गहाणखतांत शर्त घातली होती. शर्तीप्रमाणें रक्कम न मिळाल्यामुळें वाडा वैद्य यांच्या मालकीचा झाला. हें गहाणखत आषाढ शु. ३ शके १७१७ रोजीं झाल्यावर बाबुराव आश्विन शु. १४ रोजीं त्याच सालीं निवर्तले यामुळें त्यांचे चिरंजीव नारायणराव यांनीं मालकी संपादन करून १७ वर्षांनीं या वाड्याचें रूपांतर राममंदिरांत केलें.

या मंदिरास लागलेल्या खर्चाचे ताळेबंद आहेत त्यावरून एकंदर खर्च रु. ११७६२८५ जाहले आहेत. सध्या मंदिरासंबंधानें कोर्टांत चालेल्या वादांत ताळेबंद हजर केल्यामुळें दाखवितां येत नाहींत; ते पाहिले असतां पूर्वीच्या जमाखर्चाच्या पद्धतीचीहि कल्पना होणारी आहे. यांत इमारतीस लागलेलें लाकूड, माती, लोखंडी सामान पाणी यांचे निरनिराळे तपशील दिले आहेत.

या मंदिरांत बसविलेल्या रामाच्या मूर्ति वऱ्हाडांतून सन १८११ सालीं ( शके १७३३ ) नारायणराव यांनीं आणल्या, असें त्यांच्या स्वारीचे जे भाद्रपद महिन्याचे जमाखर्च आहेत त्यावरून दिसून येतें. त्या जमाखर्चांत खालीं लिहिल्याप्रमाणें तपशील आहे—

मिा भाद्रपद वद्य १ बुधवार, मुक्काम कोंढाळी कोस ७

१ लागवड खोा खादी १ लांब हात २२ श्री रामचंद्रजींची मूर्त पुण्यास न्यावयाची ती पेटारींत आहे. त्या पेटारीस मढवण्यास व सोधण्यास वगैरे.

नारायणराव पुण्यास मार्गशीर्ष शु. २ रोजीं आले. त्यानंतर केव्हां तरी मूर्तीची स्थापना त्याच सालीं झालेली आहे. राम, लक्ष्मण व सीता यांची स्थापना प्रथमतः झाली. शके १७३५ चे ज्येष्ठांत हनुमंताची स्थापना झाली. त्यासंबंधीं कागदपत्र जमाखर्चाचे आहेत. हनुमंताची मूर्ति दरवाज्याजवळ उत्तरेच्या बाजूस सिंहासनावर बसविली होती. हल्लीं ती मूर्ति देवापुढें कारंजाच्या जागीं बसविली आहे. स. १८१२

शके १७३४ पासून रामनवमीच्या उत्सवाप्रीत्यर्थ दरसाल खर्च केल्याच्या रकमा रु. २०० चे वर जमाखर्चीत आढळून येतात.

यानंतर नारायण बाबूराव यांना पेशवाई बुडाल्यावर आपल्या उत्पन्नाची शाश्वति वाटेनाशी झाली म्हणून सन १८२४ सालीं आपल्या इनामी उत्पन्नाची व घराची वाटणी करून धाकटा भाऊ आनंदराव याजला आपल्या हिश्याची व्यवस्था करण्यास सांगितलें. याच वेळीं या मंदिरांतील देवतांच्या पूजा—नैवेद्याची व उत्सवाची निरंतरची व्यवस्था आपल्या उत्पन्नांतून करण्यासाठीं अप्पाभट बिन सदाशिवभट जोगळेकर यांस चैत्र शु. १ शके १७४६ रोजीं एक सनद करून दिली. जोगळेकर हेच शके १७३३ पासून देवाची पूजाअर्चा करीत असत. म्हणून त्यासच दरसाल आपल्या इनामी उत्पन्नांतून रु. १५० ची नेमणूक करून दिली. ती त्याच्या वंशजाकडे सन १९२१ पर्यंत चालली होती. पुढें त्यांचा निर्वंश झाल्यामुळें तें उत्पन्न वैद्य स्वतः देवाकडे खर्च करूं लागले.

अप्पाभट जोगळेकर यांना लोभ सुटून, नारायणराव सन १८२८ सालीं निवर्तल्यावर एक खोटें मृत्युपत्र तयार करून हें मंदिर नारायणरावांनीं आपल्यास बक्षीस दिलें असें म्हणूं लागले व नारायणरावांचे बंधु आनंदराव यांस मंदिराच्या देखरेखीस अडथळा आणूं लागले. यासंबंधानें फौजदारी दावे होऊन जोगळेकर यांचें मृत्युपत्र खोटें ठरलें व त्यास कैद झाली. पुढें आनंदरावांनीं दिवाणीत दावा करून जोगळेकराकडून कोर्टमार्फत सन १८३२ सालीं मंदिराचा कबजा घेतला व जोगळेकर यांस बाहेर राहून पूजा नैवेद्य व उत्सव सनदेप्रमाणें करण्यास परवानगी दिली. तथापि जोगळेकर याचा कोर्टदरबार करण्याचा क्रम थांबला नाहीं. त्यांत त्यास यश मुळींच आलें नाहीं. शेवटीं कंटाळून १८३९ सालीं दाजी वामन पटवर्धन यास लवाद नेमून लवाद निवाडा करून कोर्टात गुदरला.

हें मंदिर स्थापन झाल्यापासून असा परिपाठ पडला होता कीं, कोंकणांतील लावगन येथील कोणीही भिक्षुक पुण्यास आले म्हणजे या मंदिरांत उतरत असत. त्याप्रमाणें हल्लींच्या लावगनकर वैद्य यांचे पूर्वज दाजीभट हे सन १८२१ सालीं या देवळांत कुटुंबसुद्धां नारायणराव यांच्या परवानगीनें राहावयास आले. पुजारी जोगळेकर व दाजीभट यांना राहावयास निरनिराळी जागा दक्षिणेकडील सोप्यांत व माडीवर दिली. पुढें दोघांचें नीट जमेनासें झाल्यामुळें जोगळेकर यास कोर्टाचे हुकूमानें बाहेर जावें लागलें. अशा परिस्थितींत वैद्य यांना दाजीभट वैद्य यांस देवळावर व पुजाऱ्यावर देखरेख ठेवून कुटुंब सुद्धां सोप्यांत राहाण्याबद्दल एक अधिकारपत्र शके १७५५ सालीं द्यावें लागलें. त्यास अनुसरून दाजीभटांचे वंशज महादेवशास्त्री, बाजीराव व बाळशास्त्री हे याच मंदिरांत राहत असत. सन १८९३ च्या सुमारास या मंदिराच्या उत्तरेस बाळशास्त्री यांनीं घर घेतलें व ते लवकरच तेथें राहावयास गेले. त्यानंतर

महादेवशास्त्री व त्यांचें कुटुंब येथें राहूं लागलें. महादेवशास्त्री व त्यांचे चि. बाजीराव हे १९०३ सालीं प्लेगमध्यें निवर्तल्यावर त्यांचे चिरंजीव कृष्णाजी बाजीराव या मंदिरांत राहत होते. त्यांनीं देवळाच्या इमारतींत गैरहक्कानें दुरुस्त्या करून देवळावर बोजे उत्पन्न केले. ही गोष्ट देवळाच्या संस्थापकांचे वंशज वैद्य यांस आढळून आल्यावर त्यांनीं पुणें कोर्टांत १९२२ सालीं दावा लावला. व १९२५ सालीं मंदिराचा कबजा घेतला. खालच्या कोर्टाचे निकालावर हायकोर्टांत अपील होऊन वैद्य हे मालक ठरले. पण कृष्णाजी बाजिराव यांनीं ज्या लोकांकडून पैसे काढले त्या सावकारांनीं निराळा दावा आणावा असा निकाल झाला. त्याप्रमाणें गहाणदारांनीं पुणें कोर्टांत दावा आणून या मिळकतीवर आपले सुमारें ४० हजार बोजे आहेत असें ठरवून घेतलें. गहाणदारांचा दावा चालू असतांना वैद्य यांनीं देवाचे नजिकचे इष्टमित्र म्हणून सन १९३५ सालीं देवाच्या नांवानें गहाणदाराविरुद्ध दावा आणला आहे. त्याचा अजून हायकोर्टांत निकाल झाला नाहीं. त्यांत ही सर्व मिळकत देवाची आहे असें ठरल्यास हें देऊळ कायम राहील, नाहींतर त्याची कोर्टमार्फत विक्री होईल. खालचे कोर्टानें सभामंडप व गाभारा देवाचा आहे असें ठरविलें आहे.

या मंदिराची म्यु. टीच्या दफ्तरांत जी माहिती मिळते ती अशी आहे. सन १८७१ ते ७७ मध्यें या घराचा बुधवार पेठ घर नं. ४८४ होता. सन १८७७।७८ मध्यें पुनः नवे नंबर पडले त्यांत त्याचा नंबर ३३० लागला. सन १८९१।९२ मध्यें ३५१ होता व हल्लीं तो ३७६ आहे.

---

## ४३

# नरसोबाचें देऊळ

( सदाशिव पेठ, कारकोळपुरा )

सध्याचे मालक रा. महादेव लक्ष्मण जोशी व त्यांचे पुतणे हे आहेत. एक वर्ष आड एक अशी त्यांना वृत्ति आहे. यांचे पूर्वज गणेश दीक्षित पलसंनडक प्रांत उडपी सुब्राणी येथें संगमेश्वराहून गेले. नंतर पुण्यास आले. यांनीं नरसोबाची मूर्ति काशीहून डोक्यावरून वाहून आणिली व परचुऱ्यांच्या जागेंत स्थापन केली. सवाई माधवरावानें मूर्तीची संभावना करून इनाम दिलें.

नरसोबाचे देवळासमोर रास्त्यांची बाग होती; ( स्काऊट ग्राऊंड ) कोपऱ्यावर विटोबा होता. तो सरकारनें जागा घेतल्यावर समोर बसविण्यांत आला. रास्त्यांच्या बागेच्या उत्तरेस परचुऱ्यांची बाग होती; त्याच्या पलीकडे कै. म. मो. कुंटे यांचा वाडा व जागा. देवळाच्या शेजारीं ( उत्तरेस ) नगरकरांची बाग. दक्षिणेस मीमांसा–विद्यालयापर्यंत अग्निहोत्र्यांचीं एकजात घरें होतीं.

हें देऊळ मार्गशीर्ष शुा ४ शके १८१४ रोजीं *नारायण जोशी यानें बांधल्याचा 'पेशवाईचे सावलीत' उल्लेख आहे (पृ. २४२).

* गणेश (मूळ पुरुष)
|
वामन
|
नारायण

---

## ४४

# शेख सल्ला

पुण्यांतील सयदसादत व शेख सला ह्या दोन पिरांना इमारत बांधण्याकरितां १४०० रुपयांची देणगी देण्यांत आली.

पे. द. २२ ले. २०० ] [ ८-४-१७६८

---

## ४५

# शेखसल्याचे ताबूत

" विशेष सैदसादात व षेखसला पीर का। पुणें यांचे ताबूद मोहरमच्या महिनियांत फिरायाचा पूर्वी परस्परें कजिया होत होता. त्याज वरून तीर्थस्वरूप कै. आपास्वामींनी का। मजकूरचे रहवासी याचे साक्षीने, मुलअयाम दस्तूर लेहून घेऊन निवाडा केला, यादी जी लिहून दिल्ही त्याप्रो चालत असतां गुदस्ता षेखसलावालियानी सैद सादातवालियासीं कजिया केला. परस्परें जंग होऊन जखमी जाहाले म्हणून विदित जाहाले········जो मार्ग आपास्वामींनी करून दिल्हा त्याप्रो उभयेतानीं चालणे, त्या अंतर जाहालियास पारपत्य होईल. "

पे. द. ४३ ले. ३३ ] [ १७४१-६१ ?

---

## ४६

# बिबि सैदानी

"माघ शुध शेष्ठी शुक्रवारीं सात घटका रात्री उरली ते समईं राजश्री पंतप्रधान मुहूर्ते करून नदीपलीकडे बिबि सैदानी वरने डेरियात जाऊन राहिले

...................... तेथून सुध ९ मंगलवारीं कूच करून आलंदीस इंद्रायेणी-वर आले."

पे. द. २२ ले. ३९१ ] [ ३-२-१७३९

---

## ४७

## Our Lady of Immaculate Conception

पुण्यांतील पोर्तुगीज समाजासाठीं हें चर्च असून ते गोव्याच्या आर्च बिशपच्या ताब्यांतलें आहे. पुणें जिल्ह्यांतील कॅथोलिक धर्माचें तें सर्वांत जुनें स्थान आहे. १७९४ त पेशव्यांनीं देवस्थानासाठीं जागा दिली ( नानाच्या पेठेंत ). पुढें १८४२ त सरकारनें जास्त जागा दिल्यावर १८५२ त सध्यांचें चर्च बांधण्यांत आलें. हल्लीं हें आर्नेला हायस्कूल चर्चच्या आवारांत आहे.

[ Poona Guide 1902 ]

---

## ४८

# आंबील ओढा

हा ओढा पुण्याच्या दक्षिणेच्या डोंगरांतून ( कात्रज घाट ! ) वाहात आला आहे. हा पुण्याच्या जुन्या व नव्या वस्तीच्या मध्यावरून वाहात होता. तुळशीबागेंतील त्र्यंबकेश्वर देवळावरून, जोगेश्वरीच्या देवळावरून शनवार वाड्याच्या पश्चिमेनें अमृतेश्वराजवळून जाऊन नदीला मिळे. कसब्याच्या गणपतीपुढेंहि एक ओढा होता असें सांगतात.

दादोजी कोंडदेवानें याला धरण बांधल्याचा पेशवे दप्तरांत उल्लेख आहे. पुरंदरे दप्तरांत याला ' आंबील वोहळ ' म्हटलें आहे. पर्वतीचा रमणा बांधला तेव्हां हा ओढा रुंद व खोल केला. याची दोनतीनदां दुरुस्तीहि झाली. ( १७५२ ) एकदां याला पाणी येऊन पक्षाचे ( भाद्रपद ३०. पु. द. ३ पृ. १०४ ) चार पांचशें ब्राह्मण वाहून गेले. तेव्हां पर्वतीतळ्यांत याचें पाणी घेऊन पुढें पश्चिमेकडे बगीचा धरणें बांधून हा मुळेंत सोडून दिला. तेव्हां पासून हा ओढा प्रत्यक्ष गांवांतून वाहाण्याचें बंद झालें.

---

## ४९

# फर्मानबाडी कोठें होती ?

महादजी शिंदे यांनीं दिल्लीहून पेशव्यांसाठीं वकील मुतालिकी जी आणली ती समर्पण करण्याचा समारंभ कोठें झाला याबद्दल वाद आहे. वानवडी, गारपीर, किंवा संगम या तीन ठिकाणापैकीं कोणतें तरी एक ठिकाण असलें पाहिजे.

शिंद्याच्या फौजेचा तळ त्यावेळीं संगमापासून खडकीच्या बाजूला असल्यानें त्याच भागांत ही फर्मानबाडी असावी.

हा समारंभ ता. २२ जून १९७२ रोजीं १२ वाजतां फर्मानबाडींत झाला असें मॅलेट लॉर्ड कॉर्नेवालीसला लिहितो ( पूना रेसिडेन्सी कॉरेसूपॉन्डन्स भाग २ ). खरे लेखसंग्रहांत, "गारपिरा नजीक सरकारचे थोरले डेरे अठरा गजी व आणखी दोन तीन डेरे दिले. मंडप भोंवतीं बाडे देऊन फर्मान बूस* जागा केली." ( पत्र क्र. ३४८२ ) असें म्हटलें आहे. ग्रँड डफ संगमाचीच जागा सांगतो.

"In and Around Poona" या जार्ज फ्रँक्सनें लिहिलेल्या चोपड्यांतील तिसऱ्या चोपड्यांत वकील मुतालीचीं वस्त्रें देण्याचा जो दरबार भरला होता त्याचें सविस्तर वर्णन केलें आहे. या समारंभासाठीं बाडींत जें बादशाही सिंहासन तयार केलें होतें तें ॲग्रिकल्चरल कॉलेज जवळील रेल्वेच्या फाटकासमोर खडकीच्या रस्त्याच्या उजव्या बाजूस नदीकांठीं होतें, असें स्पष्ट लिहिलें आहे. फ्रँक्सनें रेसिडेन्सी दफ्तर पाहून माहिती गोळा केली असल्यानें फर्मानबाडीची जागा तो म्हणतो तीच असावी.

गारपीरची मर्यादा कोठपावेतों होती हें समजलें म्हणजे जास्त उलगडा होईल. गारपीर हें एका जुन्या पिराच्या समाधीचें स्थान आहे. हा पीर शेख सल्याच्या वेळच्या ( १२९० ) असावा म्हणतात. गारांत पुरलेला म्हणून गारपीर. लष्करांत सेंट पॉल चर्चजवळ ( पोस्टानजीक ) हें स्थान आहे. १८०२–१८१७ पर्यंत येथें ब्रिटिश लष्कर होतें. पुढें संगमावर गेलें.

---

## ५०

# शिवाजीचा लालमहाल

पुण्यास दादोजी कोंडदेवानें शिवाजीसाठीं झांबरे पाटलाकडून जागा घेऊन **शिडावर** एक वाडा जुन्या कसब्यांत बांधला होता (१६३६). तो पहिल्या बाजीरावाच्या

---

* वाचण्यांत चूक–' बाडीस ' पाहिजे.

वेळीं अगदीं पडून त्याचीं जोतीं फक्त राहिलीं होतीं. त्या जागेवर घरें बांधल्यास जागा 'निर्मळ' राहील म्हणून पेशव्यानीं तशी तजवीज केली. राणोजी शिंदे याला त्या जागेवर नवें घर बांधून दिलें. याच जागेंत सदाशिवराव भाऊच्या मुंजींत ब्राह्मण भोजनासाठीं मांडव घातले होते ( १७३६ ). गोपालराम ( देशपांडे ) याच्या वाड्यामागें लाल महालाची जागा होती. ती त्याला दिली. त्यानें यावर आपला वाडा बांधला. ( पे. द. २२ लेखांक २९२-३, ३११, ३४५ पहा. )

" आषाढ वद्ये ४ शुक्रवारी राजश्री पंतप्रधान याणी राजश्री सिवाजीराजे यांचा लालमहाल राजश्री दादाजी कोंडदेऊ याणी राजश्री शाहाजीराजे याचे कारकीर्दीस बांधला होता. त्यांचे भाऊ राजश्री संभाजीराजे सिवाजी राजे याचे भाऊ त्याचा महाल वेदमूर्ती राजश्री खंडभट शाळेग्राम याच्या वाडिया पावेतो होता. त्याचे जोते उतरामुख होते. ते उखळून चिरे कारंजियापासी घर बांधले त्याजला जोतियास नेले. राजश्रीच्या माहालावरहि येक दोन घरे बांधोन आवदार ( ? ) वाडा करून ठेवावा. तूर्त येक दोन घरे बांधावी. माहलात नेहमी घरे होऊन जागा निर्मल राहील आणि तूर्त राजश्री राणोजी सिंदे व रामचंद्रजीस घरे राहावयास होतील म्हणून पंती लालमहाल बांधावयाची तजवी केली. आठपंधरा रोज जाले. जुना हौद कारंजियाचा पका आहे. त्यावरती पछेमेकडे दिवाणखाना जुना होता. तेथे घर बांधिले. त्यास यांची* साधन नाहीं म्हणून त्या दिवाणखानीयाची जुनी काहीं बाहीं भिंताडे होती ते धोंडे काहडून आपल्या वाडीयाच्या सुतानें दोरीं टाकून तूर्त एकघर कारंजियाच्या कोनासी दक्षिणेकडल्या लावून ( ? ) केले होता, मुळें हे कारंजे रद जाले असे. देसपांडियाच्या पछमेस खंडभटाचें दक्षणेस जे जागा आहे ते माहालाची जागा आहे. खंडभटाच्या दक्षण भिंतिपासी चिरेबंदी जोते माहालचे होते ते आजी पंती उखळून चिरे हउदाकडे नेऊन तूर्त घर बांधतात त्याच्या जोतियास लावले असेत. लालमाहलचा वगैरे दोन यैसे तीन आट पंती गाडले होते ते उकरिले. पाणी लागले. मन्हामती तोडाची केली असे. लाल महालाची जमीन पछेमेसहि कांहीं गेली असावीसी आहे. तूर्त जोते काहडालियाने माहालचे हादेचे हिंदाण मोडले; परंतु ते जागा माहालची असें "

पे. द. २२ लेखांक २९२ ] [ २८-६-१७३५

" सिंदियास हली नवे घर लाल माहाल जुना त्यामध्यें बांधले तेथें राहणार "

पे. द. २२ ले. २९३ ] [ ६-७-१७३५

" फाल्गुन सुध १२ द्वादसी गुरुवारी राजश्री चिमाजी आपाचे पुत्र सदोबा याचा वृत्तबंध जाला, समारंभ बरा जाला. श्री देव चिंचवड मुंजीस आले होते. लाल माहलात ब्राह्मण भोजनाचे मांडव घातले होते. "

पे. द. २२ ले. ३११ ] [ १२-२-१७३६

---

* प्राची ?

" गोपाळराम याजला लाल महालचे जमिनींपैकी त्याच्या वाडियामागें जागा होती ते दिल्ही. त्या जागियावरी गोपाळपंती वाडा बांधला. खंडभटाच्या भिंतीपासी सात हात गली पंती टाकविली असे. "

पे. द. २२ ले. ३४५] [शके १६५८ पौष

---

## ५१

# शुक्रवार वाडा

एका अव्वल इंग्रजींतील रोजनाम्यांत, शनवार वाड्यांतील व शुक्रवार वाड्यांतील इमारती इंग्रजांनीं पाडून त्याचा लाकूड मसाला गारपीरवर नेल्याच्या नोंदी आहेत. तसेंच शुक्रवार वाड्याच्या ४ मजल्यावर पहारे होते याचीही एक नोंद आहे. शुक्रवार वाड्याच्या बांधकामासंबंधीं माहिती देणारीं तीन ऐतिहासिक पत्रें कान्हूरच्या नगरकरांच्या दप्तरांतील आहेत. पेशव्यांचे इंजिनिअर नगरकर असत. त्यांच्या वाड्यांच्या बांधकामावर नगरकर घराण्यांतल्या पुरुषांची देखरेख असे. अशी नागो बाबाजीपासून म्हणजे नगरकर घराण्याच्या पहिल्या पुरुषापासून (काल प. बाजीराव) प्रथा होती, अशी नगरकर घराण्यांत दंतकथा प्रचलित आहे. हीं पत्रें त्यांच्या दप्तरांत सापडल्यानें त्या दंतकथेस कांहीं आधार मिळतो.

(१) पत्र क. १ (५-३-१८१४ तारखेचे) वेताळ पेठेंतील दगडू कुंभारानें दुसऱ्या बाजीरावास लिहिलेलें. त्यांत शुक्रवार वाड्याच्या गच्चीच्या बांधकामाकरतां तूर्त २०० रु. चांदवड घेऊन संगरी विटा पुरविण्याचा मक्ता घेतला आहे. विटेचा नमुना लांबी रु. ६ रुंदी रु. ४ व जाडी रु. १ (यांतील रु. हा कोणत्या शब्दाचा संक्षेप आहे!)

(२) दुसरें पत्र टिकाराम व देवीदास गौंडी यानीं अण्णासाहेब नगरकर यांना २३-५-१८१४ रोजीं लिहून दिलेलें करार पत्र. त्यांत शुक्रवार वाड्याच्या गच्चीच्या चुन्याकरितां भाडेकरी यास देण्याकरतां १०० रुपये पावल्याबद्दल पावती दिली आहे.

(३) तिसरे पत्रावर तारीख नाहीं पण तें १८१५ सालचें असावें असें या पत्रांतील " साल गुदस्ता " या शब्दावरून दिसते. त्यावरून टिकाराम गवंडी पुणें शुक्रवारांत राहात होता. त्यानें चुना सोनोरी नजीक दिवें येथून खाणीचा भाजून २५ रुपये खंडीप्रमाणें पेशवे सरकारास पुरविला. त्याकरितां मोघम २५ खंडीकरतां ६०० रु. घेतलें—ही माहिती कळते. करार चिंतो वामन देशमुखांचा बाळाजी रामचंद्र सोवनी, त्रिंबकजी डेंगळ्याचा रावजी कृष्ण पेंडसे व नगरकरांचा रायो गोपाळ मराठे यांच्या विद्यमानें झाला.

श्री

श्रीमंत राजश्री बाबासाहेब साहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक दगडू बिन आनंदी शेट कुंभार वस्ती पेठ वेताळ किले पुणे रामराम विज्ञापना असीजे वाडा शुक्रवार येथील सरकारी वाड्याचे गचीस खंगरी विटा या प्रमाणें दरहजारी लाबत रु. सहा रुंदन रु. च्यार व जाडी रु. येक रुपये ३। सवातीन प्रमाणें गचीच्या कामास लागतील त्या कबूल केल्या आहेत त्या ऐवजी तूर्त मोघम रु. २०० दोनशे चांद्‌वड घेऊन विटा सदरहु वर लिहिल्या आसल्या प्रमाणे खंगरी सरकार पसंत पडावया जोग्या शुक्रवारच्या वाड्या जवळ माप देऊ हे लिहून मिती फाल्गुन शु. १४ शके १७३५ दिल्हे. सदरचा अक्षर



( निशाणी वीट )

श्री २३-५-१७१४

श्रीमंत राजश्री आणासाहेब नगरकर साहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक टिकाराम व देवीदास गौडी रामराम विज्ञापना असीजे वाडा शुक्रवार येथिल गचीचे कामाकडे चुना द्यावयाचा करार केला आहे त्यापैकी भाडेकरी यास द्यावयाबद्दल रुपये १०० शंभर आपण दिल्हे ते भरून पावलो मिती ज्येष्ठ शु. ४ शके १७३६ भावनाम संवत्सरे हे लिहोन दिल्हे सई हस्ताक्षर गोपाळ हरी राजवडकर

निशाणी कर्णी साक्ष



श्री

श्रीमंत राजश्री आणासाहेब नगरकर साहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक टिकाराम बिन चेतराम गवडी पेठ शुक्रवार शहर पुर्णे रामराम विज्ञापना असीजे वाडा शुक्रवार येथील सरकार वाड्याचे गचीचे कामास साल गुदस्ता चुना सोनोरी नजीक दिवे येथील खाणीचा भाजून पुणे मुकामी आणून मापे देऊन दर खंडीस रुपये २५ पंचवीसप्रमाणें देवीदास बिन जनूदास गवडी व मी दोघानी करार केला होता त्याप्रमाणें सालमजकुरी करोन मलायाप्रमाणें चुना खाणीचा उत्तम मासला आणून ठेविला आहे त्याप्रमाणे कन्याचे माप देऊन दर खंडीस रुपये पंचवीस प्रमाणे घेऊ आणि गचीस जो चुना लागेल तो देऊ घा(ह्य)न्ही तुर्त चुन्याचे ऐवजी रुपये

तूर्त मोघम पंच्यवसि
संडींचे प्रो रुपये ६००
सद्रहु करार विा बालाजी
रामचंद्र सोनी नीा चिंतो वामन
देशमुख व रावजी कृष्ण निा
त्रिंबकजी पा डेंगळे व राघो
गोपाल मराठे निा आपा नगरकर

पंच्यवीस संडींचे माप देऊन नंतर पुढें
पंच्यवीस संडी चुना लागेल त्या पो निमे
रुपये देऊन नंतर द्रोबस्त माप देऊन
बाकी पका राहील तो भाग घेऊ
कलम १

२

सद्रहु पनास संडी चुना वर लिहिल्या प्रमाणे द्र घेऊन मासल्या प्रमाणे चुना आणून देऊ व ज्याजती पनास सेरीज चुना गर्चास लागेल तो लिहिल्या दराने पैका घेऊन चुन्याचे माप शुक्रवारच्या वाड्याजवळ देऊ सद्रहू कागद लिहून दिल्हा सही हस्ताक्षर सदाशिव व्यंकटेश वेल्हेकर

साक्ष

१ वर्धो पानगम वि
राज्या पटवेकरी वस्ती
पेठ शुक्रवार

निशाणी गज

---

# ५२

## शुक्रवार वाडा

" शुक्रवारचे वाड्यात पांचवे मजल्यावर चौकोपऱ्यावर च्यार बंगले आहेत. त्यास दोनसे सत्तर रुपयाचे किमतीत खारवी पडदे केले. "

पे. द. २२ ले. २७० ] [ ३-९-९-१८०८

---

# ५३

## विश्रामबाग वाडा

" विश्रामबाग वाड्याची वास्तुशांति केली "

पे. द. २२ ले. २७२ ] [ २०-११-१८०८

" विश्रामबागेंतील सरकारवाड्याबाहेर नैऋत्य कोणात हौद करविला त्या बा खर्च ( ४००० ) मक्ता घेणार नागेपंत दातार."

पे. द. १२ ले. २७२ ] [ १०-१२-१८०८

---

## ५४

# विश्रामबाग वाड्याची रचना

विश्रामबाग वाड्याच्या जागीं पूर्वी हरिपंत फडक्याचा बाग होता, तो बाजीरावानें १७९९ त घेऊन त्याचें विश्रामबाग असें नांव टेविलें. या जागेवर वाडा बांधण्यासाठीं जे करार ता. २६–३–१८०७ रोजीं व १९–८–१८०७ रोजीं केलेले आहेत त्यांवरून वाड्याची रचना कशा प्रकारची होती हें कळतें. पश्चिमेस चौघई चार मजली, पूर्वेस दुघई दोन मजली व गची, दक्षिणेस दुघई दोन मजली, मधील घर तिघई दोन मजली, उत्तरेकडील एकघई दोन मजली याप्रमाणें इमारत सात खणी चौरस असावी. खांब, लगा, तुळया, जोतें, फरस यांची बांधणी 'तालीमखान्या' प्रमाणें म्हटलें आहे. हा **तालीमखाना** शुक्रवार वाड्याशेजारीं होता.

आजच्या विश्रामबागेवरून या जुन्या रचनेची कल्पना येईल काय तें पाहावें. ७२००० व ७५००० रुपयांचे दोनदां मक्ते दिलेले आहेत (पे.द.३२ ले. २१०,२२७.)

हा वाडा बांधण्यास प्रारंभ केल्याचें एक पत्र कृष्णराव तात्या वैद्य यांस ता. २६–१–१८०० रोजीं वांईस गेलेलें आहे. वाड्यासाठीं १ लाख रु. खर्च होणार असें पत्रांत नमूद आहे. (वैद्यसंग्रह)

"सदाशिव पेठ कसबे पुणें येथें नाना फडणीस यांचें हौदांतून विश्रामबागेंत आमचे वाड्यांत नहर चांगला उत्तमप्रत बांधून पाणी आणावयाबद्दल नारोपंत दानार याचे हवाली केले. (५००० रुपये)"

पे. द. २२ ले. २६६]                    [६–७–१८०७

---

## ५५

# बुधवार वाडा

"बुधवार वाड्याचे तयारी बाा खर्च केले (२५०००)."

पे. द. २२ ले. २७९]                    [२३–१–१८११

---

## ५६

# बुधवार वाडा रचना

"पश्चिमेकडील सोपा दुघई व पुढें अडीच गजाची पडवी अथवा सोप्याबरोबर दुमजला जसी सरकारची आज्ञा होईल तसे खण सुमारी ९ नऊ व चापेखन

याही बाजूचे दोन येकूण अकरा खण व उत्तरेकडील सोप्याचे खण च्यार येकधई व पुढें पडवी अडीच गजाची अथवा सोप्याबरोबर दुमजला येविसी सरकार आज्ञा होईल त्याप्रमाणें याचे खांब सुरूदार महरापासुधा व भिंतीचे आंगचे खांब चौरस लाकूड सागवानी चांगले निकोप लाल उत्तम नामी विश्रामबागचे दिवाणखाण्याचे मासल्याप्रमाणें ........ साडेसाहा महिन्यांत काम तयार करून द्यावयाचा " मक्ता रूपचंद नाईक व भवानजी नाईक सुतार निा सरकार यांनी २२-८-१८११ रोजीं केला. मक्त्याचे रुपये २२००० त्रिंबकजी डेंगळे यांजकडून मिळाले. ( पे. द. ४१ले. ५१ )

---

## ५७

# गणेश पेठेंतील पेशव्यांचा वाडा

शनवार वाडा, बुधवार वाडा, विश्रामबागवाडा व शुक्रवार वाडा हे पेशव्यांचे चार वाडे पुण्यास होते. वेताळ पेठेंतहि सरकारवाडा असल्याचा व गुरुवार पेठेंत उल्लेख आहे. पण त्यांखेरिज गणेशपेठेंत एक वाडा होता असें पुढील उल्लेखावरून दिसते.

" सरकारचे च्यारी वाड्यांत बिछाईत घालून वर चांदण्या धुवट घालाव्या व छतें धुवट बांधून सरकार मर्जीजोगी तयार करावी व गणेशपेठेंतील वाडयाची बिछाईत घालून चांदण्या घालाव्या. "–पे. द. ३२ लेखांक २५ ( सन १८१४ ).

हा वाडा आज कोणता ? जुनें आर्यभूषण नाटकगृह ?

---

## ५८

# शुक्रवार वाड्याखेरीज पेशव्यांचें शुक्रवारांतील घर

" शुक्रवारचे वाड्यासमोर जागा घरें आम्ही पूर्वी खरेदी केल्याच आहेत. त्या मोडून सगुणी कलवंतिणीचे घरचे दक्षणेस व चंद्रीचे घरचे दक्षणेस व **तालिमखाना** नवा शुक्रवारचे वाडयापुढें रस्ता मधी टाकून बांधिला आहे; त्याचे मुकाबिल्यास पूर्व पश्चम लांबीचा रस्ता मधी सोडून आम्ही घर बांधून त्यांत कलवंतिणी चिन्हाडकरासारख्या टेविल्या आहेत; त्या आमचे घरास साडे नऊ हजार रुपये लागले असत. लौकिकांत तें घर कलवंतिणीचे म्हणवितो. परंतु तें घर आमचे. कलवंतिणीचे नाहीं. " ( दुसऱ्या बाजीरावच्या हातची नोंद.) पे. द. २२ ले. २६१ ] [ १४-१०-१८०६

---

५९

# कोथरूड येथील पेशव्यांचा वाडा

कोथरूड येथें पेशव्यांची बाग असून आंत चांगला बंगला बांधला होता. या संबंधीं पेशव्यांच्या रोजनिशींतील खालील उतारे सांपडतात—

४१० कोथरूडचे बागेंतला आरसेमहाल जाया जाला तो उत्तम तयार करावयाचा छ १९ जिलकाद्

८६५ कोथरूडचे बागेंतील जळमंदिर दुरुस्त करावयाचा छ १९ जिलकाद्.

३७५ कोथरूडचे बागेंत माहालापुढें चालता तावदानी बंगला आहे तो दुरुस्त करावा याबद्दल छ १९ जिलकाद्

५९५ कोथरूड बागेंतील चौसोपी तयार करावयाबद्दल छ १९ जिलकाद्.

पेशवे दप्तर २२ लेखांक २६३ ] [ २९-१-१८०७

या वाड्याचे अवशेष आज कोथरूडच्या मृत्युंजयेश्वर महादेवाच्या देवळा-जवळ कॅनालपलीकडे दिसतात.

---

६०

# आनंदीबाईचें माहेरचें घर

आज शनवारांत डॉ. नीलकंठ सखाराम दाते यांच्या मालकीचें नेने घाटा-वरील घर ( नं. १२२ शनवार पेठ ) आनंदीबाईच्या माहेरचें होतें. ओकांकडून परचुरे व नंतर दाते यांचेकडे हें घर गेलें. आजहि त्या घरास वरील नांवानें ओळखिलें जातें. जुना भाग थोडा राहिला आहे.

---

६१

# धाकटे चिमाजी अप्पा पेशवे यांचे पुण्यांतील वाडे व वंश

पुणें म्युनिसिपालिटीचें सन १८६५-६६ चें दप्तर पाहात असतां, कसबा पेठें-तील घरांच्या यादींत नरसोबाचें देऊळ व नानाचा हौद यांच्या दरम्यान धत्र्यांचे कांहीं वाडे आढळले. त्यांमध्यें घर नंबर १०२, १०७, ११०, ११५, ११८ हे वाडे "आपासाहेब पेशवे मयत वारस नातू चिमणाजी गणेश धत्रे" या नांवावर नोंदलेले

होते. नं. ८५ व नं. १२८ हे नारायणशास्त्री बिन नीलकंठशास्त्री थत्ते यांच्या नांवानें आहेत. वरील महत्त्वाच्या नोंदीवरून चिमाजी अप्पाचा नातू चिमणाजी गणेश थत्ते यांचा शोध करण्याची कल्पना आली व थत्ते घराण्याच्या इतिहासावरून पुढलि माहिती मिळाली. 'पेशवाईच्या सावलींत' चिमाजी अप्पांच्या मुलीच्या लग्नाबाबद् शके १७५५ ची दोन तीन पत्रें आहेत (पृ. १०, ११, २६९). रा. ब. साने यांनीं पेशव्यांच्या बखरींत शेवटीं वंशावळींत अप्पांना द्वारकाबाई नांवाची मुलगी असून ती राघोपंत थत्ते यांस दिल्याचा उल्लेख सांपडतो. रियासतकार व इतर इतिहासलेखक धाकट्या चिमाजीच्या वंशाची माहिती देत नाहींत; असो.

चिमाची अप्पांचा जन्म चैत्र शुा ९ शके १७०६ चा (३० मार्च १७८४). १७९६ त त्याचें दत्तविधान होऊन पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं पण ५।६ महिनेच ती अंगावर टिकलीं. बाजीरावानें अप्पाचें लग्न मोरोपंत दामले यांच्या मुलीशीं करून दिलें (१६–५–१७९७). या बायकोचें नांव सीताबाई. ही २६–२–१८०९ रोजीं ओंकारेश्वराच्या देवळांत वाती लावीत असतां लुगडें पेटून भाजून वारली. दुसरें लग्न कोपरगांवीं २०–५–१८१२ रोजीं झालें.* मंगळवेढेकर मेहेंदळे यांची कन्याहि त्यांना दिली होती अशी माहिती मिळते. तिचें नांव सत्यभामाबाई.

बाजीरावाच्या पाठीमागून अप्पा महाराष्ट्र सोडून काशीस गेले (१८१९) व तेथें ज्येष्ठ ३० शके १७५२ (९–६–१८३०) रोजीं वारले. त्यांच्या मागून त्यांची मुलगी द्वारकाबाई हिचें लग्न जेष्ठ वा॥ १ शके १७५५ रोजीं काशीस राघो सदाशिव थत्ते यांचा मुलगा गणेशपंत याच्याशीं झालें. सर्व खर्च इंग्रज सरकारनें केला. चिमाजी अप्पा वारल्यावर त्यांची नेमणूक सरकारनें त्याच्या कुटुंबाला ठरवून दिली नव्हती असें दिसतें. (पेश. सावलींत पृ. १०–११; २६९).

**राघो सदाशिव थत्ते** हे प्रसिद्ध पेढीवाले थत्ते घराण्यांतील असून रसानगीदार अमलदार होते. पेशव्याकडून त्यांना २०० रु. वर्षासन होतें. व इंग्रज सरकारनें १८३० सालीं १२०० सालीना पेन्शन करून दिलें. (पे. सा. २६७). हे १८४२ त वारले. नीलकंठशास्त्री थत्ते हे यांचे चुलत पुतणे होत.

**गणेश राघो** हे चिमाजी अप्पांचे जांवई. अप्पांची मुलगी द्वारकाबाई हिचे सासरचें नांव सरस्वती होतें. हीं दोघे मुलगा (चिमणाजी अप्पांचा वारस नातू, पुण्यांतील वाड्यांचा मालक) लहान असतांनाच वारलीं.

**चिमणाजी गणेश** यांचा सांभाळ दुसरे बाजीराव ब्रह्मावर्ती होते त्यांनीं आपल्याजवळ ठेवून केला. यांना सरदार निळकंठ गोविंद खासगीवाले यांची मुलगी दिली होती. १८५७ त बंड उद्भवलें तेव्हां हे कुटुंबासह काशीस जाऊन राहिले.

---


* कन्या महादजीपंत जोशी यांची !

**रघुनाथ चिमणाजी** यांना रघुनाथ, गणेश, व लक्ष्मण असे तिघे मुलगे होते. वडील मुलगा व त्याचीं दोन मुलें ( शंकर व नीलकंठ ) नरसोबाच्या वाडीस राहतात.

**गणेश चिमणाजी** काशीस १९२५ त वारले. त्यांचा काशीनाथ नांवाचा मुलगा १० व्या वर्षीच वारला तेव्हां भाऊ लक्ष्मण याचा तिसरा मुलगा दत्तात्रेय दत्तक घेतला व विश्वनाथ असें नांव ठेविलें.

**विश्वनाथ गणेश** ( जन्म १९१७ ) काशीस असतात. विश्वविद्यालयांत शिक्षण घेतलें आहे.

**लक्ष्मण चिमणाजी**—( जन्म १८७९ ) कधीं पुण्यास असतात. त्यांचा वडील मुलगा **नारायण** (जन्म १९०३) बी. ए., एलएल्. बी. असून काशीस वकीली करतो. दुसरा **माधव** (जन्म १९१३) बनारस हिंदु वि.चा बी. एस्सी. असून काशीसच असतो. तिसरा दत्तात्रेय भावाला दत्तक दिला आहे. ( धत्ते घराण्याचा इतिहास )




× नवरा किंवा बायको या अर्थी. * हयात

यावरून धाकट्या चिमाजी अप्पांचे औरस पणतू आज हयात आहेत.

---

## ६२

# पिंपळखरे यांच्या वाड्याचें बेचनपत्र

खरेदी पत्र शके १७६५ शोभकृत् नाम संवत्सरे माहे कार्तिक वा ३ त्रितीया ते दिवसीं खरिदी कर्दे विठोजी बिन बापूजी चव्हाण वस्ती पेठ शुक्रवार शहर पुणें यासी फरोक कर्दे सदासीव माधवराव दीक्षित पटवर्धन वस्ती पेठ कसबा सन १२५३

फसली कारणे खरीदी पत्र लिहून औसीजे आम्ही घर जागा पेठ शनवार येथें सत्य-भामाबाई कोम विष्णु महादेव पिंपलखरे याची ती त्यानी आम्हास खरीदी किा रुा १५०० पंधराशे यास शके १७४७ माघ शुा १२ दिल्ही ती घर जागा इमल्या समेत आड सुधा हाली तुजला आम्ही आपले तरफेने फ्रोख्त किा रुा ४६० आक्षरी च्यारशे साठ चांदवड छापी यांस घर जागा आग वाडा पीछ वाडा सुधा इमल्या समेत दिल्ही त्याची मोजणी चवदा तसूचे हाताने हात सुमारी

| | |
|---|---|
| रुंदी दक्षण उतर दोन्ही भिती सुधा हात सुमारी ३० | लांबी पूर्व पश्चम दोन्ही पूर्व पश्चमेच्या भिती सुधा हात सुमारी ४८ |

येकूण रुंदी हात सुमारी तीस व लांबी हात सुमारी आठेतालीस घरजागा च्यार दिवाली सुद्धा यासी च्यतुःसीमा विा

| | |
|---|---|
| १ पूर्वेस घर राजश्री बापाजी रेंडे याचे आसे ——— कलम | १ पश्चमेस कैलासवासी मोरा बाबुराव फडणीस याची जागा |
| १ उतरेस घर बापाजी रेंडे याचे आसे —————— कलम | १ दक्षणेस रस्ता पूर्व पश्चम थोरला वागीचा असे |
| २ | २ |

४

किा वहिवाटीची—————————— कलमे

१ घराचा दरवाजा दक्षणभिमुख आसे

१ घराचे मोरीचे पाणी रस्त्याचे मोरीस मागील व पुढील आगणात जात आहे त्याप्रो पुढें तुम्ही वहिवाट करावी.

१ घराचा शेतखाना पश्चमेचे भितीस आहे त्याची वाग फडणीस याचे घरालगत बेल आहे त्या वाटेनें तुम्ही ही वागणूक करावी.—कलम

१ घर जागा मोजणी करून तुम्हास विकत दिल्ही त्या जाग्यावर इमारत पूर्व पश्चम घर तिघई ऐक-मजला खण ७ सात व पूर्व पश्चम सोपा दरवाज्यावरील आहे त्याप्रो खण च्यार इमारत दुमजला व सात खण इमारत दीड मजला येणेप्रो ईमारत व मागीलदारी आड वीटबंदी तोंड बांधलेला आहे त्या सुधा दिल्हा असे.

५

सदरहू जागा हात मोजणी चतुःसीमापूर्वक व किता कलेम सुमारी ५ पाच वर लिहिल्याप्रो तुम्हास आम्ही आपले स्वसंतोषे किमत रुा च्यारशे साठ यांस विकत दिल्हे असे तरी तुम्ही आपले चिनास येईल तसी नवी जुनी इमारत बाधून पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सुखरुप नादावे या घरासंमंधीं आमचे जवल जुने खरेदी पत्र होते ते

तुजला भोगवटियाकरिता तुझे स्वाधीन केले आसे. या घर जाग्यासंबंधी कालकला कोन्ही मुजाहमि होऊन वारसा करून हरएक बाब तंटा सागू लागल्यास त्याचे निवारण आम्ही करूं तुम्हास उपसर्ग लागू देणार नाही तुम्हीं या खरेदी पत्राप्रो घर जाग्याचा उपभोग घ्यावा या घरजाग्याविसी आमचाहि आर्थाआर्थी संबध राहिला नाही हे खरीदीपत्र आम्ही आपले स्वसतोषे किमतीचे रुो रोख घेऊन लिहून दिल्हे

---

## ६३

# मुजुमदार वाडा, कसबा पेठ, याचें मूळ खरेदीखत

खरीदखत शके १७०० विलंबी नाम संवत्सरे आश्वीन शुद्ध १ ते दिवसी राजश्री नारो नीळकंठ जोसी कुलकर्णी मौजे लोणी प्रांत सुपे यांसी नरसिंगराव बलाल व शिवाजी शंकर मांडवगणे पुणेकर कारणें खरीदखत लेहून दिल्हे येसेजे आपला वतनी जागा कसबा पुणे येथे आहे तेथे तुम्ही इमारत वाडा बांधून बहुत वर्षे नांदत आहा ती जागा तुम्हास आम्ही आपले खुश रजावंदीने फरोख्त केली जाग्याची किंमत रुपये १५०१ दीड हजार रुा घेऊन जागा तुम्हास दिली असे. जाग्याची चतुसमि मोजणी लांबी रुंदी

| | |
|---|---|
| लांबी दक्षण हात सुमार भिंती सुद्धा | रुंदी पूर्वपश्चम हात सुमार |
| ५८ गर्भात | २९ गर्भांत |
| ५ दोन्ही भिंती | ६ भिंती दोन्ही |
| ६३ | ३५ |

येणे प्रो मोजणी करून जागा तुम्हास दिल्ही असे त्याची हाद महदूद पूर्वेस मल्हार राम बापट दक्षिणेस मेराळ नारायण गुपचुप पश्चमेस **सरकारचा सिकारखाना** पलिकडे रस्ता उत्तरेस गली पलीकडे भटंभट हेरे येणे प्रो महदूद असे. वाडियांत तुम्ही पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें सुखरूप नांदणे. यास आपल्या मांडवगण्यांत अगर हरकोण्ही कजिया कटकट करील त्यास आपण वारु तुम्हाकडे अर्थाअर्थी समंध नाही हे खरीदखत लिहून दिल्हे सही बिा शिवाजी शंकर मांडवगणे

सही शिवाजी शंकर मांडवगणे

१ पत्रा प्रो साक्ष भटंभट हेरे आटघरे प्रांत पुणे

१ पत्रा प्रो साक्ष महादेवभट शाळग्राम आटघरे प्रां पुणे

१ साक्ष माणिकभट बिन शिवरामभट

धर्माधिकारी प्रां पुणें
१ पत्रा प्रो साक्ष गोपाल रंगनाथ
टकार आटघरे प्रां पुणें

---

६४

# कै. शंकर बापूजी मुजुमदार यांचा वाडा

श्री

खरीदीखत शके १७९३ प्रज्यापतिनाम संवत्सरे माहे वैशाख वाा ७ ते दिवसीं खरीदीकर्दे राजश्री बापुजी कासीनाथ मुजुंदार शहर पुणें पेठ कसबा यांसी फरोक्त कर्दे त्रिंबक बाबाजी मांडवगणे पेठ कसबा घर खाजगत कारणे खरीदीखत लिा दिल्हे ऐसिजे आमचे राहाते वडिलोपार्जित घर तुकडी पुणें पोटतुकडी सबरजष्टर शहर मार याचे हादीतील पेठ कसबा येथील घर नंबर ३५३ चे आमचे कबज्यांत आहे ते खण सुमारी २ दुघई······कवल्हार व घराचे पिछाडीस पूर्वेकडील भिंतीपर्यंत बखळजागा येकूण आगवाड्यापासून पीछवाड्यापर्यंत बखल जागा इमला धोंडा भेडा माती विटा वगैरे सुधा तुम्हास आम्ही आजमितीस तुम्हाकडून रोखसूर्ती रुपये १९९ आक्षरीं येकसे नव्याआणव घेऊन खरीदी दिल्हे यासी मोजणी लांबी हात ४० पूर्व-पश्चम आगवड्यापासून पिछोड्यापरयंत व रुंदी दक्ष उत्तर हात ८ आगवड्यापासून पिछवड्यापावेतो येणेप्रो यांसी चतुःसीमा

१ पूर्वेस पिछाडीची भिंत आपली असोन पलिकडे संभाजी बिा सदोबा घुले याचे घरावर आपले वळचणीचे पाणी पडावयाची वहिवाट आहे.

१ पश्चमेस वागणुकीचा घराचा दरवाजा पुढे रस्ता पलिकडे विष्णु आनंदराव लोहोगांवकर याचे घराची हाद.

२

१ दक्षणेस वाल्हेकर देशपांडे यांचे बखल जाग्याचे आलीकडेस आमचे वागते दरवाज्यापासून पूर्वेचे भिंती परयंत भिंत समाईक वाल्हेकर व आपण मिळोन पलिकडे वाल्हेकराची बखल जागा.

१ उतरेस सदाशिवभट बिा लक्ष्मणभट गुरजर यांचे घर दरम्यान आपले इमारतीचे भिंती पलीकडील खुली भिंत पूर्वेचे भिंती परयंत त्याची आसोन त्या भिंतीखालची जागा त्यास दिल्ही आहे आणि इमारतीची भिंत सर्व आपली आहे.

२

घराचे पाणी जाण्याची मोरी रस्त्यास मेळविली आहे व घराचा सेतखाना उत्तर बाजूस कोपऱ्यात सेतखाना तयार केलेला आहे. व कांहीं काम करणें राहिले या-मुळे बंद असोन तो चालू करून पाणी मोरीस मिळवावे वळचणीचें पाणी रस्त्यांत पडत आहे. येणेप्रो चतुःसीमा पूर्वक आम्ही आपली खाजगत वडिलोपार्जित घर जागा इमल्यासुधा सदरी लिहिल्याप्रमाणें तुम्हास वर लिहिले……… स फरोक दिल्हीं आहे. इमारत बाधल्यापासून भोगवटा आजपर्यंत आम्हींच घेतला सदरहु घराचे मागील कागदपत्र आम्हाजवळ होते ते तुम्हा जवळ भोगवट्यास दिल्हे आहेत यासिवाय कोणाकडे या घराबद्दल गाहाण वगैरे हारयेक बाबे कागदपत्र करून दिल्हा नाही कदाचित निघाल्यास त्याचे निवारण आम्ही करू तुम्हास तोसीस लागू देणार नाही व घराबद्दल हरयेक प्रकारे ——— भाऊबंद वगैरे यासी हिल्ला हरकत निघाल्यास त्याबद्दल तु ——— नुकसान होईल ते आम्ही अगर आमचे इष्ट वारस खुद निा येकमकाचा उजूर न धरिता वकसीर हजर आसेल तो भरून देईल या खताचे रुपये रोख घेऊन हे खरीदीपत्र तुम्हांस लेहून दिल्हें व सदरहु घरहि तुमचे कबज्यांत दिल्हे आहे तरी रुपये भरण्याविसी तकार राहिली नाहीं या खरीदी दिल्हेले घरांत तुम्ही पुत्रपौत्रादि वंशपरंपरानें राहून उपभोग करावा या घर जाग्याविसी आमचा संबंध राहिला नाही. सदरी दक्षणेचे चतुःसीमेचे पांचवे वोलित ( ळ ) व नववे वोळींत ( आ ) व आकावे वोळीवर ( ई ) ही अक्षरें शोध आहेत व सोळावे वोळीवर ( त ) व पंचविशावे वोळीवर ( ना ) ही अक्षरे शोध आहेत. हे खरेदीखत राजीखुषीनें स्वसंतोष लेहून दिल्हे सही तारीख ११ माहे मे सन इसवी १८७१ दस्तुरखुद

साक्ष

१ सदाशिवभट बिन लक्ष्मणभट गुर्जर पेठ कसबा दस्तुरखुद

सही त्रिंबक बाबाजी मांडवगणे दस्तुर खुद

१ विष्णु आनंदराव लोहोगांवकर पेठ कसबा दस्तुरखुद

१ पांडुरंग हरी ढेरे अटघरे दस्तुर खुद

१ रावजी मल्हार केमकर पेठ कसबा दस्तुर खुद

६५

# रविवार पेठेंतील मिसाळ यांचें घर

श्री गज्यानन[1]

{ १७२२ माघ व. ४.
{ १८०१ फेब्रु. २

कबालेपत्र कोतवाली शहर पुणे विा बळवंतराव अनंत राजश्री हरी चिंतामण व माधवराव त्र्यंबक व विनायकराव गणपत दीक्षित पटवर्धन गुहागरकर हाली वाा शहर मजकूर पेठ कसबा सुाा इहिदे मयातैन व अलफ सन १२१० शके १७२२ रौद्र नाम संवत्सरे दिल्हें तुम्हास कबालेपत्र ऐसे जे गिरमाजी नरहर मिसाळ राहुरीकर वाा पेठ रविवार याची जागा रविवार पेठेत तुमचे घराचे उतर अंगें घर कवलार दुमजला खण सुमार २ दोन होते ती जागा अगवाड्या पछिवाडया सुधां इमल्या समेत विकत दिल्ही त्याची किमत २००० रुाा दोन हाजार त्याणी तुम्हांपासून घेऊन जागा स्वसंतोषें देऊन खरीदीखत करून दिल्हे तें तुम्ही चौत्रा आणून दाखविलें त्याजवरून चौत्राहून त्र्यंबक आपाजी कारकूनव उदाराम बीन निबांजी गोंड्या दिा लक्षुमण बीन सुभानजी गोंड्या चाकर निा सरकार यास पाठऊन जाग्याची मोजणी करून कलमे करार करून दिल्हीं——चिा

लांची पूर्व पश्चम आगवाडयास पश्चमेस रस्त्याचे हदेस घराचे ओसरीचे जोत्याचे असार सुधां पछिवाडयास पूर्वेस बोळाचे हदेस भिंतीचे असार सुधां गज सुमार २६॥– यासी चतुःसीमा सेजार

१ पूर्वेस मधीं बोळ दक्षणेकडील तोंड बंद होऊन उतरेस रस्त्यास मिळतो रुंदी पुर्व पश्चम गज सुमार २॥ पलीकडे माणकोजी नाा गोंगले यांचे घर कवलार

१ पश्चमेस बाजार रस्ता दक्षणउतर जातो रुंदी पूर्वपश्चम गज सुमार

रुंदी दक्षण उतर जागा गज सुमार

३।– ऐन गर्भी जागा गज

·।४॥ चांदई दक्षणे कडील ऐन रुंदी गज ·॥३ पाौ निमे पलीकडील सेजारी तुमचे जुने घराखाली ·।४॥ बाकी जागा गज सुमार ·।४॥

·।– चांदई उतरेकडील ऐन रुंदी गज ·॥·४ पाौ निमे पलीकडील सेजारी रत्नोजी कुंभार याची ·।– बाकी तुमचे जाग्याखोली गज ·।–

——

४८–॥

---

१ अक्षर वेगळें.

२०।३ पलीकडे वल्लभदास माहादसेट यांची दुकान कवलार
१ दक्षणेस खुा तुमचे घर कवलार
१ उत्तरेस रत्नोजी बिन कान्हु कुंभार परदेसी याचे घर कवलार

४

घराचा आगवाडा पश्चमामुख असे ——— कलम १

जाग्यांत सेतखाना पछिवाड्यास पूर्वेस बोळाचे हदेस दक्षण कोपऱ्यास असे

निकास खिडकी बोळाकडे पूर्वामुख असे ——— कलम १

वागावयास दरवाजा पछिवाड्यास पूर्वेस बोळाचे हदेस पूर्वामूख असे ——— कलम १

घराचें पाणी मोरी बाधोंन सिरस्ते मो रस्त्याचे मोरीस मेळवावे ——— कलम १

येकूण लांबी साडेसवीस गज दोन तसू व रुंदी च्यार गज अडीच तसू व कलमे सुमार ८ येणेप्रों जागा तुम्हांकडे करार करून देऊन किमतीचे रुपयांवर सरकार सिरस्ता दर सदे रुा १० प्रो रुा २०० दोनशे जाले त्यास सरकारची सनद सन मजकुरी छ ४ रजब आमचे नावची सादर जाली तेथें लिहिले कीं, राजश्री माधवराव त्र्यंबक दीक्षित पटवर्धन याणी शहर मजकुरी पेठ रविवार येथें गिरमाजी नरहर मिसाळ याजपासून सन सबा तिसैनात खरीदी करून घेतली त्याची किा रुा २००० दोन हाजार त्याचे खरीदीखत पाहून कबाल्याचा अकार होईल तो मारनिले याजपासून सन समस तिसैनात खड्याचे स्वारींत कर्ज ऐवज सरकारात घेतला आहे त्या पो रद कर्ज खर्च लेहून कबाला करून देणे म्हणोन त्याजवरून सदरहू दोनशें रुा तुमचें नावें रद कर्ज खर्च लेहून कबाला करून देणे म्हणोन त्याजवरून दोनशे रुा तुमचें नावें रद कर्ज खर्च लेहून हें कबालेपत्र तुम्हास भोगवटियास करून दिल्हें असे तरी सदरहू जाग्यांत तुम्ही पुत्रपौत्रादी वंशपरंपरेने सुखरूप नांदावे +जाणिजे छ+ १७ रमजान +मोर्तबसुद[१]

प्रारंभीं कागदाच्या डाव्याबाजूस पहिल्या ओळीच्या टोकास वर्तुली दोन कड्याळाचा पुढील शिक्का आहे व तशाच आकाराचा मोर्तब आहे.

श्री
पंतप्रधान चर
णी तत्पर बळवंत
राव अनंत कोतवाल
शहर पुणें नि-
-रंतर-

---

\+ तिन्ही अक्षरें भिन्न. १ हाच मोर्तब कागदास एक जोड आहे तेथें दोनदां उठविला आहे.

## ६६

# शिंदेवाडा–वानवडी

आज महादजी शिंदे यांची समाधि वानवडीस आहे. तिच्या उजव्या बाजूस ओढ्यापलीकडे एक पडका वाडा किंवा त्यासारखी छोटीशी इमारत अद्यापिहि उभी असलेली दिसते. समोरच शिंदे सरकारांचा नवा वाडा आहे. पूर्वी पेशवाईत शिंदे यांच्या तळाची जागा हा सर्व भाग व्यापून होती हें सर्वमान्य आहे. आज जरी समाधीची जागा व नवा वाडा हीं शिंदे सरकाराकडे आहेत तरी बाकीचा बहुतेक सर्व भाग लष्करी खात्याचे ताब्यांत व कांहीं खाजगी मालकांकडे आहे.

शिंदे यांचा जुना वाडा येथें होता किंवा कसें हें आज पुराव्यानें ठरविणें प्राप्त झालें आहे. यासंबंधीं दोन पुरावे आहेत—

१ पुणें लष्कर विभागांत पाण्याचे नळ आणण्यासाठीं पाहाणी झाली त्याचा एक पाहणी ग्रंथ इ. स. १८५७ सालचा मुं. सरकारनें प्रसिद्ध केलेला आहे. या ग्रंथाचे नांव Report of the supply of water to the Poona Cantonment, Government Record, New series No. XLvii–Plans and section 9 sheets असें आहे. या ग्रंथांतील नकाशापैकीं शीट नं. ९ वरून हा ता. २३ आक्टो. १८५७ रोजीं तयार झाल्याचें ठरतें. शिल्पज्ञाचें नांव P. L. Hart, Captain Engineer. special duty असें आढळलें.

पुणें म्याझिटीअरमध्यें शिंदे–वाड्याची नोंद प्रत्यक्ष अशी नाहीं. परंतु Poona Cantonment चे नकाशांत छत्री पलीकडे लागूनच Scindia's wada म्हणून दिला आहे. आजहि हा वाडा, वाडा म्हणूनच संबोधला जातो व तो शिंदे सरकारकडेच आहे. तो छत्रींचे डावे बाजूस अगदीं खेटून आहे. अगदींच किरकोळ आहे. हार्ट याचें नकाशांत मात्र ओढ्यापलीकडे व छत्रीचे उजवे बाजस जी एक मोठ्या बुरुजाची पडकी इमारत आज दिसते तीच दर्शवून Scindia's Palace असा तिचा नामोल्लेख केला आहे.

२ आणखी पुरावा शिंदे वाड्याबद्दल आढळला हाहि एका सरकारी ग्रंथांतच आढळला. Captain John Clunes याचा. इ. स. १८२६तील हा ग्रंथ म्हणजे म्याझिटीअरकारांनीं उल्लेखिलेला Itinerary and Directory नांवाचा होय. यांत पान १० वर पुणें नगर मार्ग तपशीलवार सांगत असतां पुणें येथील त्या वेळच्या

Travellers' Bunglow खालीं टिपण दिलें आहे. हा Travellers Bungalow जुनी Residency डावी टाकून व शहर उजवें टाकून नदीपार झाल्यावर जवळच लागत असे. म्हणजे साधारणपणें आजच्या Collector कचेरीजवळ.

टिपणांत तो लिहितोः—

Note:— "From the Travellers Bunglow near the entrance of Cantonments, to the Church is 1½ mile and the continuation of the road to the *Ruins of Scindia's Palace*, near which the Cantonment ends is 1½ mile further."

महादजी शिंदे पाटिलबुवा यांच्या छत्रीचा प्रारंभ "About 1830" झाला असें ग्याझिटिअरकार म्हणतो. म्हणजे Clunes च्या वेळीं ही छत्री जुन्या अवस्थेंतच व लहानशीच असली पाहिजे. आणि Clunes जो Palace सांगतो व ज्याला Ruins म्हणतो तो वर आम्हीं सांगितलेला व १८५७ सालीं हार्टनें नकाशांत दाखविलेला जो वाडा तोच-हल्लींहि मोडक्या अवस्थेंत परंतु थोडी पूर्व वैभवाची साक्ष देणारा जो वाडा आपल्या भक्कम बुरुजामुळें अजूनहि भव्यसा दिसतो तोच-असला पाहिजे. या वाड्याचा उद्धार झाला पाहिजे.

---

## ६७

# शिंदे छत्री

"दौलतराव शिंदे याणी हुजूर विनंति केली कीं आपले तीर्थरूप कैलासवासी माहादजी शिंदे याचे छत्रीचे खर्चास येक गांव नेमून देविला पाहिजे म्हणोन त्याजवरून मौजे उरली ता सांडस प्रा पुणें २०५० रुपये कमाल वेरजेचा मारनिलेकडे छत्रीचे खर्चास करार करून देऊन हे सनद तुम्हास सादर केली असे म्हणोन रामचंद्र नारायण यांचे नांवे सनद"

पे. द. २२ ले. २३४] [५-९-१७९५

## ६८

# न्या. बाळशास्त्री टोकेकर यांचा वाडा व हौद

बाळशास्त्री दीक्षित टोकेकर जोशी हे पेशवाईत पुण्यास न्यायाधीश होते. ते मूळचे रत्नागिरी जिल्ह्यांतील संगमेश्वराचे. तेथें त्यांची शास्त्रिवृत्ति असे; तीसाठीं त्यांना जवळचीं ८ गांवें इनामहि होतीं. गोविंदराव गायकवाड यांनींहि त्यांना १७९८ त एक वर्षासन करून दिलें होतें.

बाळशास्त्री हे दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत पुण्यास फार प्रसिद्ध होते. त्यांना पैसा पुष्कळ मिळाला व तो त्यांनीं दानधर्मांत सर्व खर्चलाहि. होळकर दंग्याच्या वेळीं जे ब्राह्मण कैदेंत घातले होते त्यांना सोडविण्यासाठीं त्यांनीं पदरचे पैसे भरले. गोदावरीच्या तीरावरील क्षेत्रांतून त्यांनीं अनुष्ठानें सुरू केलीं होतीं. त्यांना बरेच कर्ज झालें तें पेशव्यांनी पट्टी करून फेडलें व सदाशिव पेठेंत विश्रामबागराजवाड्याजवळ वाडा बांधून दिला. याच वाड्यासमोर बाळशास्त्र्यांनीं पुष्करणीचा हौद बांधला. हा वाडा सध्यां विश्रामबागेच्या मागें जो कानिटकरांचा वाडा आहे त्याच्या शेजारीं दक्षिणेस होता. मागें डॉ. परसनसिंग या वाड्यांत राहात होते. १८४२ पर्यंत हा बाळशास्त्री यांचे समाईक कुटुंबाकडे होता, पुढें वडील घराण्याकडे गेला. या वाड्यांत अग्निहोत्र चाले, अवशिष्ट कुंडहि होतें. बाळशास्त्री यांचा वाडा म्युनिसिपालिटीनें रस्ता रुंदीसाठीं घेतला. ( १९३११ ) आतां त्याचा मागमूसहि नाहीं. बाळाशास्त्री शके १७४६ त वारले. त्यांचा वंश—

| | |
|---|---|
| बाळशास्त्री | (भाऊ) शिवरामशास्त्री |
| (दत्तक पुत्र) रंगशास्त्री | हरिपंत* |
| शिवरामशास्त्री | पुरुषोत्तमपंत |
| वासुदेवशास्त्री | बापु |
| कृष्णराव ( रिटा. डे. कलेक्टर ) | विश्वनाथपंत ( वकील ) |

* हे बाजीरावाबरोबर ब्रह्मावर्तास गेले होते. पुढें परत आले.

### बाळशास्त्री यांचा हौद-पुष्करणी

बाळशास्त्री यांनीं हा हौद आपल्या घरासमोर ब्राह्मणांसाठीं १७९५ त बांधला. याला पाणी नाना फडणिसाच्या आंबेगांव नहराचें असून तें सदाशिव पेठेच्या हौदांतून घेतलेलें आहे. सदाशिवपेठ हौद व पुष्करणी यांमध्यें तीन उस्वास बांधून पाणी आणलें होतें. पुष्करणी जवळचा उस्वास म्यु. नें हौद पाडला तेव्हां पाडला व बाकी दोन अद्याप फडतरे वाडा व देशमुख वाडा यांच्या आसपास दिसतात. पण तेहि लवकरच पाडले जातील. हा हौद ११५० चौ. फूट होता व त्याला खर्च २५०० रु लागला. पाणी नाना फडणिसांनीं फुकट घेऊं दिलें; तें शेवटपर्यंत होतें. हा हौद टोकेकरांच्या मालकीचा म्यु. नें १९३१ त विकत घेऊन पाडला. आतां म्यु. नें लहान कुंड बांधून बाळशास्त्री टोकेकर यांच्या नांवाचा संगमरवरी दगड लावला आहे. पुष्करणीचा हा हौद मागें पुण्यांत प्रख्यात असे.

---

## ६९

# होळकर छत्री

खडकीस होळकर पुलापलीकडे मुळेच्या कांठीं जें एक तटबंदी महादेवाचें देऊळ आहे ती होळकर घराण्यांतील एका पुरुषाची छत्री आहे. तिला होळकर सरकारांतून वर्षासन आहे. या छत्रीचें वर्णन गायकवाडकृत पुणें वर्णनांत (भाग २) आहे. छत्री विठोजी होळकराची आहे, असें वर सांगून खालीं टीपेंत ग्रंथकारानें तेथील पूजाऱ्याकडून मिळालेली माहिती जी दिली आहे तींत छत्री मल्हारराव होळकराची म्हणून म्हटलें आहे व सभामंडपांतील नंदीपुढें जी एक समाधी आहे ती मल्हाररावाचा शूर-शिपाई 'लाख्या बारगीर' (लाख रुपये पगारदार) याची आहे, असेंहि लिहिलें आहे.

छत्री सभोंवतीं भिंत ९०′ × ७०′ असून मध्यें लहान देऊळ आहे (१५′ × १५′ × १०′). गाभाऱ्यांत दोन सांबाच्या पिंड्या आहेत. मागें कोनाड्यांत तक्ताची जागा आहे. (पुणें वर्णन भा. २ पृ. ६२)

विठोजीची बायको सती गेली तेव्हां या दांपत्याच्या या दोन लहान मोठ्या पिंड्या आहेत असें म्हणतात.

दुसऱ्या दोन तीन ठिकाणींहि छत्री विठोजीचीच म्हटली आहे. पण पंतप्रधान २ री शकावली यांत (पृ. ८९) "भाद्रपद वा ८ दौलतरावाकडील मुजफरखान याणें तुकोजीचा पुत्र मल्हारराव यांस मारलें. छत्री खडकी पुलाजवळ आहे." असें आलें आहे. 'पेशवाई अखेर' यांत मिति भाद्रपद वा ९ दिली आहे.

मल्हाररावाची बायको गरोदर होती. ती पुढें केसोपंत कुंटे यांच्या वाड्यांत प्रसूत झाली.

विठोजीच्या बायकोस सती जाण्यास परवानगी मिळाली नाहीं; तिला व मुलाला कैदेंत ठेविलें, अशीहि माहिती दिली आहे. ( रियासत ).

तेव्हां छत्री कोणाची ?

---

७०

# तुळशीबागेचे पूजारी जोशी यांचा वाडा

श्रीमत राजश्री तात्या सुभेदार स्वामींचे शेवेसी———

आश्रित नारो कृष्ण व बालाजी कृष्ण जोसी कृतानेक सा नमस्कार विज्ञापना आपला वाडा तुलसीबागचे दक्षण दरवाज्याकडे **सतीचे देवलाचे** पूर्वेस आहे त्यापौ निमे पूर्वेकडील वाडा आम्हास पूर्वीपासून राहावयास दिल्हा आहे त्यास वाडा जुना जाहला मोडकलीस आहे यास्तव नवी इमारत केली पाो म्हणोन आम्ही विनंती केली त्यावरून आम्हास आज्ञा जाली की पाचशे रुो पावेतो इमारतसि लावून जोतें घालून दुमजला घर बांधून सुखरूप राहाणे पुढे दाहा वर्षानंतर घराची गरज लागेल तेव्हा इमारतसि रुो लागतील ते तुम्हास देऊन घर आम्ही घेऊं म्हणोन त्यावरून आम्ही मान्य करून घर बांधून राहातो इमारत तयार जाल्यावर पुढे दाहा वर्षानंतर घराची गरज आपणास लागल्यास इमारतीचा पैका मुदल घेऊन घर देऊ बहुत काय लिहीणे हे विज्ञापना मिती जेष्ठ वाा १४ शके १७२८ क्षयनाम संवछरे————

[ तुळशीबागवाले दप्तर ]

---

७१

# बाबूजी नाईक बारामतीकर यांच्या वास्तू

१. श्रीमंत बाजीराव पेशवे यांनीं पुणें येथें स्वतःकरितां वाडा बांधण्यास सरुवात केल्यानंतर, त्यांचे आसपास इतर मंडळींनीं आपापले वाडे बांधले. पेशवे यांचे वाड्याचा कांहीं भाग इ. स. १७३२ मध्यें पुरा झाला होता.

२. इ. स. १७३३ मध्यें पुणें येथील, कसबा, शनवार व सोमवार या पेठांची "चौधरीकी" बाबूजी नाईक जोशी यांस, श्री. बाजीराव यांनीं दिली (१६।८।१७३३).

३. सन १७३५ ते १७३९ पर्यंत बारामतीकर यांनीं स्वतःकरितां वाडा बांधला. हल्ली शनवार पेठ म्यु. घ. नं. ४८ चा वाडा तोच हा वाडा.

४. या वाड्यांत स्वारीवर निघण्याचे वेळीं श्री. बाजीराव मुहूर्ताची वेळ होईपर्यंत येऊन राहिल्याचे उल्लेख आहेत; पुढें श्री. नानासाहेबही येथें उतरले होते. हा वाडा निजामाचे धामधुमीचे वेळीं जळाला होता. आज जुना भाग फारच थोडा शिल्लक आहे.

५. सौ. भिऊबाई जोशी, श्री. बाजीरावांची बहीण व बाबूजींची भावजय, सन १७७४ मध्यें वारली. तिच्या स्मरणार्थ बाबूजींनीं श्री. शिवरामभट्ट चित्राव यांचे जागेंत श्री सिद्धेश्वराचें देवालय बांधून त्यांसच पूजा सांगितली. चित्राव यांस पिंपरी वाघेरे येथें बाबूजींनीं जमीन इनाम दिली ( सन २५।१०।१७५० ) व ह्यापूर्वीच श्री. पेशवे यांनीं देवाचे पूजेअर्चेसाठीं दरसाल सुमारें रु. २०० ची नेमणूक करून दिली ( १५।१०।१७४९ ).

६. इ. स. १७५० चे सुमारास, बाबूजींनीं खाजगीवाले यांनीं नवीन वसविले- ल्या शुक्रवार पेठेंत आपलेसाठीं मोठा वाडा बांधला. हल्लीं तो वाडा दाने यांचे ताब्यांत आहे. याच वाड्यांत १७५१-५२ चे सुमारास मा. श्री. ताराबाईसाहेब राणी यांचा मुक्काम होता.

७. शनिवार पेठेंस बारामतीकरांचे वाड्यासमोर मोकळ्या जागेवर 'लक्ष्मण नाईक चाबूक स्वार' याणीं बिगरपरवानगीनें, घर बांधल्याबद्दल नाईकांनीं श्री. पेशवे यांचेकडे तक्रार केली. बारामतीकरांच्या नालबंदीच्या ऐवजापैकीं रोख रुपये ३५०४६।- 'चाबूकस्वार' यांस देऊन 'हवेली' नाईकांचे स्वाधीन केली ( २७-१०-१७७० ).

यापूर्वीं याच मोकळ्या जागेवर वे. शा. सं. गोडबोले भटजी यांनीं यज्ञ केला ( मार्च-एप्रिल १७४२ ).

खर्ड्याचे लढाईचे वेळीं निजामाकडील ब्राह्मण वकीलास या ठिकाणीं राहण्यास जागा दिली होती. ( प्रो. पोतदार )

८. श्रीमंत पेशवे यांचें दप्तर याच ( हल्लींचा शनवार घ. नं. ४३ ) वाड्यांत, सन १८५८-५९ पर्यंत होतें. १८५९ सालीं सदाशिव पांडुरंग बारामतीकर यांचे स्वाधीन इंग्रज सरकारनें वाडा केला. तळघरांत दप्तर होतें व वरील भाग मालकांचे वापरांत होता.

९. इ. स. १७२० मध्यें श्री. शाहू महाराजांनीं बाबूजींचे वडील सदाशिव नाईक यांस कांहीं जमिनी इनाम दिल्या, त्यांत वानवडी येथील जमीन येते. तेथें "भिऊबाईचा बाग" होता असा पे. द. नि. का. मध्यें उल्लेख आहे.

श्री (१६।८।१७३३)

राजमान्य राजेश्री केसो संभदेव कमाविसदार कसबे पुणें गोा यासि

सेवक बाजीराव बल्लाळ प्रधान नमस्कार सुा आर्बा सलासैन मया व आलफ रा बाबूजी नाईक जोसी यांस कसबे मजकूर पेठ शाहापूर व पेठ मूर्तजाबाद कसबे मजकूर येकून तीन पेठाचे चौधरीपण नुतन करून दिले आहे तरी तुम्ही मानिलेचे हातून चौधरिपणाचा धंदा करून घेऊन गैरराहा शिरस्त्याप्रमाणे हकलवाजीमा यांस देत जाणे जाणीजे छ १६ रबिलाखर आज्ञाप्रमाण (मोर्तब)

२

श्री

(२५-१०-१७५०)

अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री
नारायण गिरीधर गोसावी यांसी

सेवक बाबुराव सदाशिव नमस्कार सुा इहिदे खमसेन मया व अलफ वेदशास्त्र संपन्न राजश्री शिवरामभट बिन वासुदेवभट चित्राव गोत्र कौशिक हे थोर ब्राह्मण स्नानसंध्या करून आमचे अभिष्ट चिंतून आहेत यांचे चालवणे अवश्य जाणोन मौजे पिंपरी काा हवेली पुणे या गावापैकी यांस नुतन इनाम जमीन चावर ॥• निमे एकूण बिघे ६० साठ करून दिले आहेत. तरी नवीन जमीन मोजून देऊन खेरीज हकदार इनामदार करून सदरहू इनाम भटजीस व त्यांचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवणे. प्रतिवर्षी नूतन पत्राचा आक्षेप न करणे. या पत्राची नक्कल लिहून घेऊन अस्सल पत्र भोगवटीयास यांजकडे देणे जाणिजे छ ५ जिल्हेज बहुत काय लिहीणे (मोर्तब)

बार कार्तिक शु. ६ शके १६७२

३

राजमंडळ

२७-१०-१७७०

स्वारी राजश्री पंतप्रधान सुा इहिदे (सबैन मया व अलफ) सरंजाम निा बाबूराव सदाशिव दफाने पत्रे

छ ७ माहे रजब खासा स्वारी मशारनिल्हे याणी हुजूर विनंति केली की आपली जागा पुण्यांत चौकांत वाड्याचे शेजारी आहे त्यापैकी कांहीं जागा लक्षुमण नाईक चाबुकस्वार यानी घेऊन हवेली बांधिली आहे ते जागा आमची आम्हास देविली पाहिजे. म्हणोन त्याजवरून चाबूकस्वार याणी तुमचे जाग्यांत हवेली बांधली आहे त्यास त्याचे इमल्याचा पैका जहाला तो रु. ३५०४६। पस्तीसहजार सवाशेचाळीस तुमचे पथकाचे नालबंदीचा ऐवज सरकारांतून देणे आहे त्यापैकी सदरहू पस्तीस-

हजार सवाशेचाळीस रुपये नांवे नालबंदीपैकी खर्च लिहून चाबुकस्वार यांस दिल्हा आणि तुमची जागा तुमचे स्वाधीन केली असे. तरी तुम्ही आपली जागा हवेली सुधा घेऊन सुखरूप नांदणे म्हणोन मशारनिल्हे याचे नावे

रसानगी यादी सनद १

---

## ७२

# सदाशिव पेठेंतील होळकरवाडा व ठोसर घराणें

पेशवाईत बाळाजीपंत ठोसर नांवाचे मोठे ब्राह्मण सरदार होते. सवाई माधवरावाचे लग्नांत बाळाजीपंतांना यावयास उशीर झाला म्हणून नाना फडणीस यांनीं पंगत थोपवून धरली होती, अशी आख्यायिका आहे. यांचे नातू राघो केशव हे धारला पेशव्यांच्या वर्तीनें होते. व आनंदीबाई धारला असतांना तिच्यावर देखरेख यांचीच असे. पुढें आनंदीबाई कोपरगांवीं असतांना राघोपंत बाजीरावास शिकविण्यासाठीं ठेविले होते. ते बाजीरावाबरोबर पुण्यास आले. ( पे. द.४ व बखर ). यांना रु. ६००० चा सरंजाम असे. राघोपंत १८०९ सालीं वारले. त्यांचे चिरंजीव अल्पवयाचे असतांना १८२० सालीं कंपनी सरकारनें सरंजाम जप्त करून १२०० रु. सालीना पेनशन करून दिलें. महादजी यांचे चिरंजीव नारोपंत यांना तें पेनशन त्यांच्या हयातीपर्यंत मिळे. पुढें बंद झालें. नारो महादेव हे फर्स्टक्लास सबजज्ज होते. त्यांचे चिरंजीव सुप्रसिद्ध साहित्यिक व नाटककार सदाशिव नारायण ठोसर होत. ते मुंबई म्युनिसिपालिटीमध्यें असेसर आणि कलेक्टर या हुद्यापर्यंत चढून चार वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले. ते कुर्ल्यास स्वतःचे घरांत राहातात.

राघो केशव यांचे दुसरे चिरंजीव धोंडोपंत यांचा वंश म्हणजे शनवार पेठेंतील ( मेहुणपुरा ) ठोसर होत. श्री. रामचंद्र भास्कर ठोसर, सेवानिवृत्त प्रिन्सिपॉल ट्रेनिंग कॉलेज ( धुळें ) हे या घराण्यांतील होत. शनवारांतील वाडा हा ठोसर यांचा जुना वाडा होय. पण आज पूर्वीचा वाडा राहिला नाहीं. नवीन नवीन बांधकाम वरचेवर होत गेलें. अकरा खणी वाडा होता तो सावकारांनीं एक एक खण काढून नेल्यामुळें पार बसला व बखळ मात्र राहिली.

ठोसरांच्या जहागिरींत हवेली तालुक्यांत नऱ्हे आंबेगांव आहे. तेथील ठोसर आणि बेलबागकर यांच्या दोन समायीक विहिरींतून पाट बांधून नाना फडणीस यांनीं पुण्यास पाण्याचा दुष्काळ पडला असतां पाणी सदाशिव पेठेंत हौदांत आणून सोडलें.

नारो महादेव ठोसर महाड मुक्कामीं सबजज्ज असतांना त्यांनीं पुणें पेठ सदाशिव येथें एक जुना वाडा खरेदी केला. त्या वाड्यामध्यें पूर्वी होळकर कैदेंत होते व त्या वाड्याचें नांव **होळकर-वाडा** असें होतें. हा वाडा शनीच्या पाराजवळ शेवडे बोळासमोर आहे.

सदाशिव पेठेचे कुलकर्णी जे ठोसर ते या ठोसरांच्या पैकीं आहेत. कुलकर्णी ठोसरांचे वंशज मातीच्या गणपतीजवळ राहात. ते हल्लीं मुंबईस असावेत. ठोसरपागा यांची कीं काय समजत नाहीं.

सदाशिव पेठचे कुलकर्णी धोंडो रघुनाथ उर्फ आबा ठोसर हे होते. हे शनवारां-तील ठोसरांचे ( रा. भा. ठोसर यांचे ) पणजे होत.

---

## ७३

# पुण्यांतील जुने वाडे (हप्ता १ ला)

[ या टांचणांत पुण्यांतील जुने वाडे नमूद केले आहेत. हल्लीं या वाड्यांना जे म्युनिसिपल घरांक आहेत, ते टिपून यांस जोडावयाचे आहेत आणि हे वाडे असल्यांचेच कशावरून, ते केव्हां, कोणी बांधले, खर्च काय झाला, मूळ वास्तु केवढी होती, आज किती शिल्लक आहे, इत्यादि माहिती मिळेल तशी मिळवून नोंद-विण्याची आहे. कित्येक वाडे नोंदनांना संशय वाटत असेल तेथें तो दर्शविला आहे. प्रस्तुतच्या वाडा-मालकांचे भोगवट्याचे कागदपत्र पाहून खात्री करून घेण्याचा प्रयत्न करावयाचा आहे. ]

**शनिवार वाड्याची चौगीर्द**—अनेक मुत्सद्दी लोकांस राहावयास जागा दिल्याचा उल्लेख आढळतो. आजहि जुन्या पेशवाई घराण्यांचे वाडे जाग्यावर तोडक्या पडक्या मोडक्या स्थितींत आहेत, व कित्येक त्याच घराण्यांकडे चालत आहेत—

वाडा उत्तर भाग-१ आजचा बटाट्या मारुति त्यासमोर जेथें स्मारकाचा त्रिकोण आहे तेथें गोविंदराव कृष्ण काळे ( निजाम दरबारचे पेशव्यांचे वकील ) यांचा वाडा होता. कृष्णराव काळे हे नानासाहेब माधवरावांचे वेळीं वजनदार मुत्सद्दी होते. हें कागदपत्रावरून स्पष्ट होतें. तेव्हांपासून वाडा असावा.

२ काळे जसे बारामतकर तसेच बाबुजी नाईकहि बारामतकर होत. त्यांचा म्हणजे जोशी बारामतकरांचा वाडा काळ्यांच्या पश्चिमेला आजचा आहे तो बावडे-करांचा वाडा म्हणून गणला जातो.

जोशी, बारामतकर, बावडेकर, मेडतकर हे सर्व एकच घराणें. हा वाडा सुमारें इ. स. १७२९-३० सांत खरेदी केला अशी माहिती श्री. आबासाहेब बावडेकरांजवळ

आहे. ते ही सर्व माहिती ( साधार ) जुळवीत आहेत. यांचा जुना वाडा प्रस्तुतच्या वाड्याच्या पश्चिमेस होता.

आतां असेच शनवार वाड्याच्या पश्चिमेस वळूं. तेथें प्रथमचा वाडा लागतो तो शोधून नमूद करणें आहे. त्यापलीकडे बुरुज ( तोफेचा ) टाकतांच समोर वाडा पोतनिसांचा–हे घराणें सांप्रत नाशिकास आहे–देशस्थ घराणें. अधिक माहिती मागाहून.

त्यापलीकडे दक्षिणेस वाडा ओंकारांचा–ओंकार हे वाकेनिसींचे कामावर होते–पेशव्यांचे आप्त.–बारामतकरहि पेशव्यांचे आप्त.

ओंकारांपलीकडे– कोठेंतरी पुण्याचे सुभेदार बापूजी श्रीपत ( चित्राव ) यांचा वाडा असावा. शोध होणें आहे.

त्यापलिकडचे वाडे निश्चित करणें आहेत. पण येथें आसपास बाबूराव केशव ठाकूर यांचा वाडा असावा. ( हरिहरेश्वराचे देवळा शेजारीं )

आतां शनवार वाड्याचे दक्षिणेस वळूं:—

आण्णासाहेब पटवर्धन यांचा आजचा वाडा आहे. त्याचे पलीकडे सांगलीकरांचा वाडा आहे. शोध केला पाहिजे कीं पटवर्धनांचा ( सांगलीकरांचा वाडा ) केव्हांचा व तो कोठपावेतों विस्तार !

यापलीकडे आजहि बिनिवाले यांचा वाडा आहे. पण मूळ बिनीवाल्यांचा वाडा रविवारांत नाईक कंपनीच्या शेजारच्या वैष्णव मंदिरासमोर दारुवाला पुला अलीकडे होता. तो कांहीं वर्षांपूर्वी बिनिवाल्यांकडून गेला. शोध केला पाहिजे. प्रस्तुतचा बिनिवाले वाडा लिमये–खाजगीवाले यांचा होता असें ऐकिलें आहे.

बिनीवाल्यांपलीकडे येतो इचलकरंजीकर घोरपडे यांचा वाडा. तो केव्हां बांधला वगैरे शोध करावयाचा आहे.

त्यापलीकडे कोपऱ्यावर नाना फडणीस यांचा वाडा.

इचलकरंजी वाड्यासमोर रस्त्याखालीं एक जुनी मोठी विहिर आहे. ती रस्ता उकरतात तेव्हां दृष्टीस पडते. विटांचें काम दिसतें.

नानांचा वाडा–समोर नानांचा हौद व मध्यें रस्ता–हा रस्ता जुना की नवा सांगतां येत नाहीं. पण नानांचे हौदापाठीमागें वाडा ताई साठीचा होता. ताई साठी नारायणरावाचे आजोळ. साठे यांस वाडा बांधण्यास जागा इ. स. १७६३–६४ त दिल्याचा उल्लेख सांपडतो. या वास्तूवर पूर्वी छत्रपति शिवाजी महाराजांचा वाडा होता. त्याची हद्दमहदूद ठरविणें आहे. आजची मधली ( वाडा अंबरखाना व बाग यांमधली ) वाट नवी की जुनी !

येथेंच रामचंद्र बाबांचा सात मजली वाडा होता. हे रामचंद्रबाबा म्हणजे प्रख्यात रामचंद्रबाबा शेणवी असावेत. हा वाडा जळाला.

याच्या आगेमागें शिवकालीन शाळेग्राम, ढेरे, मोकाशी (नागरगांवकर), यांचे वाडे होते व आजहि आहेत. याबद्दल जुने उल्लेखहि आहेत.

येथेंच बाबूराव फडणीस–म्हणजे बहुधा मोरोबादादांचे वडील, यांचा वाडा होता. तोहि जळाला. प्रस्तुत फडणीसांचा वाडा तेथें नाहीं. मोरोबादादांचा वाडा हल्लीं बुधवारांत आहे.

पूर्वेनें पुढें जाऊं. शनीचें आजचें देऊळ आहे. तेथें वाडा कोणाचा? पण पलीकडे मुजुमदारांची पिछवाड येते. मुजुमदारहि जुनें व त्यांचा वाडा अद्यापि मुजुमदाराकडेच आहे.

यापुढें वाड्याची उत्तर येते. येथें पूर्वीं ढेकणेप्रभृतींचीं घरें होतीं तीं पेशव्यांनीं घेऊन त्यांच्या पलीकडे जुना कोट (हिसार) पाडला, तेथें कोटाबाहेर जागा दिल्याची नोंद पेशवे दप्तरांत आहे.

मुजुमदारांचे वाड्याचे पश्चिमेस पेशव्यांचा **'सिकारखाना'** (हल्लींचें नरसोबाचें देऊळ व गुंजाळघर) होता. मुजुमदार–वाडा मांडवगणे यांच्या बखळीवर शके १७०० त बांधल्याचा कागद मुजुमदारांजवळ आहे. (भा. इ. सं. मंडळ १८३४ चा अहवाल पृ. ८२).

आतां उत्तरेस मोकळी जागा ढेकणें वगैरे घरांची केली. त्याच्या पूर्वेस आज जीं जव्हारकरवाडा किंवा तासगांवकरवाडा वगैरे घरें आहेत तीं कोणाचीं वगैरे तपासणें आहे. ती ओळ संपल्यावर खालीं जुन्या कोटाकडे रस्ता जातो. त्यांत कोपऱ्यावर आतां निराळें घर आहे. परंतु पूर्वीं तो भाग पुरंदरे वाड्याचाच असावा. पुरंदरे–वाडा जुना मोठा पेशवाईतच झाला. त्याचें वर्ष व पूर्वीं तेथें कोणाचीं घरें वगैरे शोधलें पाहिजे.

पुरंदरे–वाड्यासमोर नदीकांठीं जरा खालीं कानडे (रामचंद्र गणेश) यांचा वाडा (जो कोनकर वाडा म्हणून अलीकडे होता व जेथें काळकर्ते परांजपे बहुत वर्षे राहात होते व ज्यांतील जुनें चित्रकाम प्रस्तुत प्रिन्स ऑफ वेल्स अजबखान्यांत गेले आहे) येतो. त्यामागें दर्गा व अलीकडे गोविंदराव काळे वाडा.

अशी ही शनिवारवाड्याची चौगिर्दी पुरी झाली.

---

## ७४

# पुण्यांतील जुने वाडे (हप्ता २ रा)

**१ पेठे वाडा**–पेठ कसबा (शितोळे वाड्यासमोर) तांबट आळी–कांहीं दिवसपूर्वीं दरवाजा व गच्चीचा भाग पडका होता तोहि गेला. आतां मालक बदलले, पार स्वरूप गेलें. थोडे भिंतीचे दगड व एक जुना आड मात्र

शिल्लक आहे. आठवण मुद्दां बुजेल-हा अर्थात् त्रिंबकरावमामा पेठे यांचा वाडा.

२ मोरोबादादा वाडा-हल्लीं बुधवारांतः नुकताच फडणीस घराण्यांतून पोटभरे यांजकडे गेला. दोन तीन चौक आहेत. हौद, उच्छ्वास, हस्तिदंती दिवाणखाना, वरपर्यंत पाणी जाण्याची सोय, तळघर, जाळीचा चौक ( जाळीचें काम पेशवे शनवारवाड्यांतहि होतें ) त्याला सुंदर लाकडी गोटे, सुरूचे खांब, भिंतींत कोरीव वेलपत्तींचे कोनाडे, नक्षीदार पटई, दुघई दिवाणखाना, इत्यादि काम अजून दिसतें. कांहीं वर्षांपूर्वी दारांत मोठेले खांबाची सुंदर देवडी ( देहली ) होती. त्यापूर्वी आंतील चौकांत सबंध तांब्याच्या पत्र्यांनीं मढविलेली मेघडंबरी होती म्हणतात. दर्शनी गच्चीवर दोन टोकांस उंचशा दोन खोल्या होत्या ! वाडा फार भव्य, काम सुबक. असा वाडा दुसरा पुण्यांत नव्हता. बांधकाम सुमारें १७६० इ. पहिला चौक दगड घोटीव आरसपानी. पाणी कात्रजचें. एक मोठा हौद सुमारें ६० X ३० फुटांचा, २० फूट खोलीचा होता म्हणतात.

३ पारसनीस वाडा-पेठ शनवारः पारसनीस म्हणजे कृष्णराव पारसनीस प्रसिद्ध मुत्सद्दी ( नानासाहेब पेशवे काळ ) यांचा वाडा-अमृतेश्वराला लागून. आंत एक सुंदर विष्णुचें देऊळ आहे. जुनें आहे. बाकी काम कांहीं शिल्लक नाहीं. एके काळीं पेशवाईंचा सर्व फारसी दप्तरखाना येथें होता. निदान या घराण्याकडे तें काम होतें. पारसनीस मंडळी 'अपसव्य' विद्येंत विशेष प्रवीण होती. अद्यापि वाडा घराण्याकडे आहे.

४ दीक्षित पटवर्धन वाडा-कसबा-सांप्रत मंगलभुवन. एक सुंदर दिवाणखाना व दरवाजा चांगला शिल्लक आहे. चौक जुना आहे. बाकी बदल झाला. दीक्षित पेशव्यांचे आप्त व सावकार त्यांचे वाड्याचे बांधकामास श्रीमंताचे वाड्याबरोबरच प्रारंभ झाला. यांचा नाशिकास वाडा फार मोठा आहे.

५ शाळिग्राम वाडा-त्र्यंबकशास्त्री शाळिग्राम-न्यायाधीश यांचा वाडा. कसबा पेठ नीळकंठेश्वराचा बोळ.

६ कोन्हेर त्रिंबक एकबोटे वाडा-फांकडे एकबोटे वाडा-केदारेश्वर बोळ.

७ शितोळे देशमुख वाडा-कसबाः जुनें कांहीं राहिलें नाहीं. नवा बांधतात. हल्लीं मालक बडे शितोळे म्हाल्हेर.

८ **धर्माधिकारी वाडे**–वाडे लहान–कसबा मुजुमदार बोळ व शितोळे वाड्याजवळ.

९ **होनप देशपांडे वाडे**–वाडे देशमुखांचेजवळ.

१० **धडफळे वाडा**–धडफळे यांचेकडेच आहे. पेठेवाड्याशेजारीं. येथें शनवार वाड्यांत जाण्यापूर्वी पेशवे रहात.

११ **सखाराम बापू बोकील वाडा**–शनवार पेठः आताचे रमणबागे जवळ. वाडा आतां पंडित सराफ यांजकडे गेला.

१२ **चंद्रचूड वाडा**–शनवार पेठ–जुनें कांग्रेस हौस. जुनें काम कांहीं विशेष नाहीं. हा गंगोबा तात्याचा वाडा. ह्यांचा अति मोठा व सुंदर वाडा निंबगांव येथें आहे.

१३ **होळकर वाडा**–हल्ली नवीन मराठी शाळा.

१४ **बारामतकर वाडा**–शुक्रवार पेठः सांप्रत दाते वाडा. हा मूळ बाबूजी नाईकाचा मंडई जवळ रामेश्वराचे ओळींत मोटार स्टँड समोर.

१५ **शुक्रवार वाडा–पेशवे**–सांप्रत गोखले ( बाबा गोखले ) वाडा. सर्व पाडला. हौद एक दोन कांहीं वर्षांपूर्वी होते. देवघराची जाळी गणपतराव देवधर यांचेकडे आली.

१६ **सचिव वाडा**–पंत सचिवांकडे आहे. शुक्रवार पेठ.

१७ **रास्ते वाडा**–रास्ते पेठ–रास्ते यांचेकडे आहे. काम अजून जुनें कांहीं आहे. मोठा पाण्याचा स्वतंत्र नळ कोंढव्याचा चालू.

१८ **पानसे वाडा**–शुक्रवारांत आहे. जुनें कांहीं नाहीं. हे तोफखानेवाले पानसे. समोर तोफखाना–सांप्रतची मामलतदार कचेरी.

१९ **वैद्य आठघरे वाडा**–कसबा–सांप्रत वैद्याकडे. मुजुमदार बोळ.

२० **ढेरे-राजर्षि वाडे**–ढेरे राजर्षि ( कुळकर्णी ) यांचेकडे अद्यापि आहेत. आठघऱ्यांपैकीं.

२१ **ठकार वाडे**–( कसबा गणपति पूजारी )–वाडे गणपति शेजारीं. कसबा पेठ.

२२ **दरेकर वाडा**–खंडेराव दरेकर सरलष्कर. मंडईजवळ पूर्व कोपरा.

२३ **देशमूख वाडा**–मंडईजवळ दरेकराजवळ–हा चिंतोपंत देशमूख सिद्धये–बाजीराव दुसरे या वेळचे–यांचा. अद्याप घराण्याकडे.

२४ **थत्ते वाडा**–थत्ते पेशव्यांचे आप्त–वाडा सांप्रत लक्ष्मीरोडमध्यें आला. पूर्वी ढमढेरे बोळ.

२५ **कर्वे वाडे**–पेशवे उपाध्ये कर्वे–वाडे बुधवारांत अप्पा बळवंत चौक. आंत जुनें गोपाळकृष्णाचें मंदीर. एक वाडा–नेने घाट. नवा घेतला!

२६ **मेहेंदळे वाडा**–बळवंतराव गणपत यांचा–अप्पा बळवंत म्हणून प्रसिद्ध आहे. अद्यापि घराण्याकडे.

२७ **राजमाचीकर वाडा**–मेहुणपुरा. अद्यापि घराण्याकडे.

२८ **जमखिंडीकर वाडा**–अद्याप घराण्याकडे. यांत घराण्याचे देव अद्यापि असतात.

२९ **कुरुंदवाडकर वाडा**–सांप्रत सेवासदनकडे–बुधवार.

३० **नगरकर वाडा**-हे कान्हूरकर अभ्यंकर. पूर्वी वेदशास्त्रोत्तेजक सभा व वेदशास्त्र–पाठशाळा होती. हुजूरपागेजवळ. आतां तेथें सरस्वति विलास बिल्डिंग आहे. कांहीं भाग लक्ष्मीरोडमध्यें गेला आहे.

३१ **दीक्षित वाडा**–मोर दीक्षित ( बाजी दु. ) मराठ्यांचे सेनापति–विश्रामबागेला लागून.

३२ **चक्रदेव वाडा**–जोगेश्वरी बोळांत. हा नारोपंत चक्रदेव यांचा.

३३ **ढमढेरे वाडा**–बुधवार पेठ–पेशव्यांचे बुधवार–वाड्यासमोर. घराण्याकडे.

३४ **खाजगीवाले वाडे**–गोविंद शिवराम यांचे वाडे–१ मंडईजवळ. २ हल्लीं नूतन मराठी हायस्कूल. ३ हल्लीं बिनीवाले.

---

७५

# पुण्यांतील जुने वाडे ( हप्ता ३ रा )

३५ **रामशास्त्री प्रभुणे यांचा वाडा**–शनिवार पेठेंत होता असें रामशास्त्री याचे चिरंजीव गोपाळशास्त्री यांनीं स्वदस्तुर लिहून दिलेल्या गहाणखतावरून ठरते. ( पहा पेशवाईच्या सावलींत पृ. २७ )हा वाडा पुण्यांतील सावकार चिपळोणकर यांचेकडे गहाण गेला. साधारणपणें आजच्या शनिवार पेठेंतील गांधी, पुरंदरे व चंद्रचूड यांचे वाड्याचे पिछाडीस कबुतरखान्यांतील रमणबागेला लागून ही वास्तु असावी असें वाटतें. शेजारींच सखाराम बापूंचा वाडा होता.

३६ **चिपळोणकर सावकार यांचा वाडा**–मोरोबा दादा फडणीस यांच्या वाड्याचे पूर्वेस सांप्रतच्या आनंदाश्रमाला लागून नूतन मराठी हायस्कूलच्या सभागृहाचे मागें चिपळोणकर घराण्याचा वाडा येतो. अगदीं अलीकडे

**३७ चासकर वाडा**–कृष्णराव महादेव चासकर यांचा वाडा–शनिवार पेठेंत पोलीस चौकी मार्गे गपचूप गणपति समोर आहे. चासकरांकडे आहे. या घराण्यापैकीं एका शाखेचा — जोशी — यांचा वाडा सांप्रतच्या अप्पा बळवंत वाड्याच्या दक्षिणेला येतो. एकभाग जोशांचेकडे अद्यापि आहे. जुनी विहीर आहे. चार दोन खण जुने शिल्लक असतील.

**३८ भिडे वाडा**–रामजी ( महादेव ? ) भिडे सावकार यांचा वाडा. जोगेश्वरी जवळ देवळाला लागून दक्षिणेस भिडे यांचेकडे. निदान परवापर्यंत तरी होता.

**३९ झांबरे चावडी व वाडा**–कसब्यांत पुण्याचे पाटील झांबरे यांची चावडी व घरें आहेत ( पेशवे डायरींत उल्लेख आहे ).

**४० चित्रावांचा वाडा**–शिवरामभट चित्राव यांचा वाडा म्हणजे अमृतेश्वर देऊळाचे आवारांत अद्यापि चित्रावांकडे आहे. ओंकारेश्वराजवळहि एखादा यांचा वाडा असावा.

**४१ रायरीकर यांचा वाडा**–उरवड्याचे चिंतो विठ्ठल रायरीकर यांचा वाडा. शनिवारांत ओंकारेश्वराचे दक्षिणेस रस्त्याचे पलिकडे अद्यापि रायरीकरांकडे आहे.

रायरीकरांचे आणखी एक जुनें घर शनिवारांत गोळे–पोतदार यांचे वाड्यांचे पिछाडीचे बोळांत आहे. सांप्रत रायरीकरांकडेच, कांहीं भाग तरी, आहे.

**४२ शेलूकर वाडा**–आता शेलूकराचा बोळ मांग्या मारुतीच्या पलिकडून फुटक्या बुरजाकडे जातो तो. आज शालूकराचा बोळ म्हणतात. यांतच बहुधा पहिलाच डाव्या हाताचा वाडा शेलूकराचा असावा.

**४३ रामचंद्र नाईक परांजपे यांची हवेली**–पेठ शनवार ( बुधवार ? ) वरील शेलूकर बोळांतून काकिर्डे बोळाकडे जी गल्ली जाते तींत काशीकरांच्या विश्वेश्वराचे देवळानजीक मोठ्या दरवाजाची हवेली लागते ती. पूर्वी हा वाडा फार मोठा होता. मोटालीं तळघरेंहि असावींत. उंची शनिवारवाड्याहूनहि अधिक होती म्हणतात पण मग पेशव्यांनी उंची थांबविली अशी आख्यायिका. आज वाड्यांत दर्शनीय कांहीं नाहीं. अद्यापिहि बहुधा धायरीकर परांजपे यांचेकडेच आहे.

**४४ बोगळकर नाईक तांबवेकरांची हवेली**-पूर्वीं बुधवारांत आनंदोद्भव नाटकगृह होतें ती हवेली. अजून हि तांबवेकराकडे असावी.

**४५ वानवळे नाईक वाडा**-( बाग ! ) पुणें खजिनाविहिरीला लागून अनाथ विद्यार्थीगृहाचे समोर वानवळे यांचा वाडा ( किंवा बाग ) होता या नवकोट नारायणाचा एक वंशज एकनाथ म्हणून भीक मागत हिंडत होता.

**४६ मेंडजोगी** ( पुण्याचे एक पेठ कुलकर्णी ) **वाडा**-इच्छारामपंत ढेरे यांचा वाडा आहे. अंबरखान्यासमोर एक मेंडजोगी यांचा वाडा आहे.

**४७ बापू गोखले यांचा वाडा**-सदाशिव पेठ ( शुक्रवार पेठ ! ) नातूंचे बागेसमोर काळ्या हौदा पलीकडे अकरा मारुती शेजारीं गोखले यांचा वाडा.

**४८ आवजी कवडे यांचा वाडा**-महिपतराव कवडे यांचा वाडाः शनिवार-वाड्याचे गणेश दरवाज्याचे समोर जरा खालीं अंबरखान्याला लागून. हल्लीं प्रेमळ विठोबाचें मंदिर आहे तेथें होता, अजूनहि वास्तु कवडे यांचेकडेच आहे असें कळतें.

**४९ फडके वाडा**-रविवार पेठ. मोठा भव्य व सात चौकी वाडा. दोन तीन वेळां जळाला. आंत चांगले एकदोन दिवाणखाने आहेत. गोपाळराव गोखले वगैरेंचीहि व्याख्यानें येथें झालेलीं आहेत. पूर्वीं मिशनरी यांची शाळा ( कीं नाना महागांवकराची ! ) हि यांत होती. आंत गणपतीचें सुंदर देऊळ आहे. हौद एक असा आहे कीं त्याला खालीं खंडी खंडी लांकडें घालून एकदम हौद भरून गरमपाणी तयार होऊं शकतें. सुरूच्या खांबाचा दिवाणखाना आहे. हा हरिपंत फडके यांचा वाडा. अजून श्रीमंत फडके यांचेकडेच आहे.

**५० चौधरी यांचा वाडा**-दुसरे बाजीराव पेशवे यांचे वेळीं प्रसिद्ध असलेले रूपराम चौधरी यांचा वाडा व बाग. यांचे उल्लेख दु. बा. पे. यांचे रोजनिशींत अनेकवार आले आहेत. हा वाडा त्यावेळीं शुक्रवार-पेठेंत होता. ( किता पाहा पृ. २९१ ) वाड्यांत राम, सीता व लक्ष्मण, गोपालकृष्ण, गणपति, हनुमंत असे देव होते. त्यांच्या वाड्यांसमोरं त्र्यंबकोबाचें देऊळ होतें. हा वाडा सांप्रत के. बंडोपंत माजेकर वकील यांचेकडे गेला असल्याचें कळतें.

## ७६

# पुणें नगर पाहाणी ( फेरी १ ली )

ता. ८ आक्टोबर १९३९ रोजीं सकाळीं ८ वाजतां आगाऊ ठरल्याप्रमाणें कसबा पेठेची पाहाणी करण्यास प्रा. द. वा. पोतदार व श्री. चिं. ग. कर्वे हे शनवारवाड्यापासून ( आणखी मंडळी येण्याची वाट पाहून) निघाले. प्रथम **पांढरी कोटाचे अवशेष** पाहाण्यासाठीं दीक्षित पटवर्धन यांच्या वाड्यांत गेले. आतां नवें बांधकाम झाल्यानें कोटाचे अवशेष दिसत नाहींत. ह्याच ओळींत **अक्कलकोटकरांचा वाडा** आतां महाजन वकील राहातात तो असून पुढें चौकांत गेल्यावर समोर **त्रिंबकमामा पेठे** यांच्या वास्तूची जागा आहे. ती पाहून कुंभारवेशीकडे वळले. कुंभारवेशीबाहेर मारुतीचें देऊळ आहे. त्या देवळाला टेकून असलेला मोठा शेंदूर फांसलेला दगड पूर्वेतिहास प्रसिद्ध '**गाधा गाढव**' असेल काय ! नंतर मागें वळन डाव्या हाताच्या पहिल्या रस्त्यानें निघालों. लवकरच जरा उंचावर एक बैठें देऊळ लागलें. शोध करतां तें **मुंजोबाचें** आहे असें कळलें. देवळांत २ वीरगळ आहेत.

यानंतर पुढें जाऊन डाव्या बाजूस नदीकडे वळले. तेथें पीर व मसीदी आहेत. पूर्वेच्या अंगाला दक्षिणोत्तर चांगली बांधलेली **बुरुजी भिंत** लागते. नानासाहेब पेशव्यांनीं बांधण्यास सुरवात केलेलें **गांवकुसूं** हीच असेल काय ! खालीं घळीसारखा रस्ता नदीपर्यंत जातो. त्यानें कडेला गेले तों डाव्या हातास उंचावर—ज्या ठिकाणीं नागझरी नदीला मिळते—एक अगदीं जुनी पडकी मसीद लागली. शेजारीं कबरस्थान आहे. शेख सला कुंभारवेशीजवळचा पूर्वीं येथें होता म्हणतात. त्याच्यामागें ढोल्यांचा मळा आहे. ढोले हे माळी; गांवचे पाटील. आंतील विहिर शिवकालीन वाटते.

परत मंगळवारच्या गेटाजवळ येऊन नाकझरी बांधून काढलेली पाहिली. तीरावर एक बसकें देऊळ दिसलें. आंत निराकार शेंदूर लावलेला मोठा दगड होता. शोध करतां ह्रा **बापूजी देव** आहे, असें समजलें. हाच ऐतिहासिक '**बाबजी**' असेल काय ! आणखी शोध केला पाहिजे. त्याच्या शेजारीं मारुतीचेंहि लहान देऊळ आहे. त्याच्या पुढेंच **माळीवेस** होती. तेथून आंत डाव्या बाजूस गेले तों **तुकाईचें** देऊळ लागलें. घर नं. ७९२ आहे. आंत दोन देवींच्या ( लहान व मोठी ) महिषासुरमर्दिनी स्वरूप असलेल्या मूर्ती आहेत. एक कोंढणपूरची व दुसरी तुळजापूरची ( मूळपाठ ) असें समजलें. वैद्य माळी यांजकडे देवीची व्यवस्था आहे. जवळच उत्तराभिमुख महादेवाचें देऊळ आहे ( घ. नं. ७५८ ). त्याच्या मागच्या लहान बोळांत एका खोलींत प्रसिद्ध '**यमाईचें**' देऊळ आहे. पुजारीण म्हातारी नांव 'जाई पारखे' ही माळीण आहे. ढोले, पारखे, बरबटे, या घराण्यांची अक्षत अद्याप या देवीला येते. मूळपीठ

जेजुरीचें. जानाई आणि जाखाई यांचीं देवळें अद्याप शोधणें आहे. आज देवळाची अनास्था आहे.

नंतर व्यवहार आळींत आले. ५४० घर नंबरांत एक महादेवाचें जुनें देऊळ दिसलें. तें त्र्यंबकेश्वराचें असून कै. सीतारामपंत व्यवहारे जोशी यांच्या मालकीचें आहे. देऊळ रस्त्याखालीं गेलें आहे. शेजारून भैरवनाथाला जातांना **ऋणमुक्तेश्वर** महादेवाचें देऊळ चौकीप्रमाणें आज असलेलें लागलें ( घर नं. ५३६ ). स्वयंभूस्थान आहे. भैरवाचे अलिकडे एका जुन्या वाड्याचे अवशेष आहेत. **भैरवाचें देऊळ** आज चांगल्या स्थितींत आहे. त्याच्या डाव्या हाताला पाराखालीं मुंजा आहे; व दोन-तीन जुने दगड आहेत.

हें नगर संशोधन करण्यापूर्वी म्युनिसिपालिटींतून १८६५ सालचें घरनोंदणीचें ( कसबा ) रजिष्टर पाहिलें होतें. त्यांत कसबा मुंजेरी, कसबा माळी असे स्वतंत्र भाग दिलेले आहेत व जुन्या वाड्यांची व देवळांचीं नांवें आहेत. घर नंबर मात्र वेगळे असल्यानें ते आजच्याला जुळत नाहींत.

---

७७

# पुणें नगर पाहाणी ( फेरी २ री )

ता. ४ एप्रिल १९४० रोजीं पेशवे दप्तरांत पुण्यासंबंधीं कागद पाहिल्यानंतर श्री. कर्वे व श्री. डिकसळकर संध्याकाळीं मुद्दाम सोमवार पेठेंतून देवळांची पाहाणी करीत गेले.

नरपतगीर गेटामागें जें एक जुनें देऊळ दिसतें तें अपेक्षेप्रमाणें व्यंकटेशाचें ठरलें नाहीं. रोजनिशींतून एक व्यंकटेशाचें म्हणून देऊळ येतें. प्रस्तुत देवळांत तीन मूर्ति आहेत. मधली दत्तात्रेयाची व एका बाजूस अनुसूया व दुसऱ्या बाजूस अत्रिऋषि. सर्व मूर्ति काळ्या दगडाच्या आहेत. देवळांतून बाहेर पडतांच डाव्या हाताला एक पार आहे. त्या खालीं घोड्यावर बसलेला एक स्वार अशी वीरकलाची प्रतिमा आहे व मागें सहज न दिसणारी अशी विष्णूची फार झिजलेली मूर्ति पडलेली आहे. हीच जुनी **व्यंकटेशाची मूर्ति** असावी.

पुढें गेल्यानंतर मोठमोठे हौद असलेले जुनें **लक्ष्मीनारायणाचें देऊळ** लागतें. नरपतगीर गोसावी यांनीं याची स्थापना शके १७०१ त केली. खर्च ८००० रु. आला. हौदांत पाणी नानांचे हौदांतून घेतलें आहे. देव-मूर्ति सुंदर व संगमरवरी दगडाच्या आहेत. देऊळ पेशवाईनंतरचें वाटतें.

या नंतर ते **नागेश्वराकडे** वळले. नागेश्वराच्या देवळांत गाभाऱ्यांत उजव्या हातांला ५ फूट वर असें गायमुख जुनें दिसलें. तें अभिषेकासाठीं असेल, कीं जुनीं देवालयरचना वेगळी असेल ! देवळामागें एक पंचमुखी लिंग व नंदी व इतर लहान मूर्ति झिजलेल्या पडल्या आहेत. आवारांत इतरहि कांहीं देवतावशेष आहेत. देवळाच्या मागच्या दरवाज्याबाहेर एक मोठा जुना नंदी पडला आहे. आज देवापुढें आहे तो नवा दिसतो.

नागेश्वराशेजारीं उत्तरेस मारुतीचें जुनें देऊळ आहे. हाच सोमवारांतील **झेंड्याचा मारुती** असावा. समोर पश्चिमेस एक **विठोबाचें देऊळ** आहे. विठोबा-रखमाईच्या मूर्ति फार उंच व जाड आहेत. या विठोबारखमाईच्या देवळाची नोंद पेशवे रोजनिशींत आहे. शेजारीं ऋषींच्या बैठ्या मूर्ति असून कडेला पांढऱ्या दगडाची एक स्त्री–मूर्ति आहे. ती **अहिल्याबाईची मूर्ति** असें सांगण्यांत आलें. विशेष चौकशी करतां, देऊळ भंडारे नांवाच्या एका काण्णव ब्राह्मणाचें असून त्याची समाधि देवळाच्या आवारांत आहे. या समाधिस्थ पुरुषाची वृद्ध स्नुषा भेटली. तिनें सांगितलें कीं, आमचीं चार देवळें होतीं. शेजारचें '**जुनें बेलबाग**' देऊळ ५०० रु. स सध्यांच्या खापर्डे घराण्यास विकलें. जास्त माहिती रा. कुलकर्णी वकील ( भांबुर्डा ) यांजकडे मिळेल.

'**जुनी बेलबाग**' पाहिली. गेल्या पाक्षिक सभेंत याची माहिती दिलीच होती. जुन्या बेलबागेसमोर काळ्या रामाचें मंदिर आहे.

---

## ७८

# पुणें नगर पाहाणी ( फेरी ३ री )

श्री. राजाराम दामोदर देसाई व श्री. कर्वे १५ जून १९४० रोजीं पर्वतीच्या तळ्याकांठचीं देवळें संशोधण्यास निघाले. तळ्यांतील गणपति व नवलोबा हे देव फक्त प्रसिद्ध आहेत. तळ्याच्या कांठीं हिराबागेच्या दक्षिणेस रस्त्यावरच दुसरें नवलोबाचें व महादेवाचें देऊळ आहे. **दोन नवलोबांचा** उल्लेख वाडरुन दुसरे बाजीराव रोजनिशींत ( पृ. ३०६ ) खालीलप्रमाणें आहे.

२ श्री नवलोबा, तळ्याचे बाजूस

१ पश्चिमेकडील बाभळीचे झाडाखालीं यास

१ पूर्वेस हिराबाग नजीक

---

२

हिराबाग जवळच्या नवलोबाची शेंदरी मूर्ति कोणत्या आकाराची आहे, हें स्पष्ट समजत नाहीं; वाघ किंवा हत्ती सारखी आहे. तिला कळे लावण्यास दोन भोंके आहेत. देऊळ पंचांच्या ताब्यांत आहे.

या देवळाच्या शेजारीं दक्षिणेस एक मोठा पण पडका वाडा, तळ्याकांठानें चांगला तट व बुरूज करून बांधलेला आहे. हा पर्वतीवरचे कोणी पटवर्धन आहेत त्यांचा आहे. आंत बऱ्याच मूर्ति आहेत. मध्यभागीं गाभाऱ्यांत सांबाची पिंडी आहे. ओरीवर कोनाड्यांत फार मोठा **उभा गणपती** आहे. तो पाहाण्यालायक आहे. एक विष्णु मूर्ति अर्धवट पुरलेली अशी आहे. या देवळास विघ्नेश्वर किंवा व्याघ्रेश्वर म्हणतात. Franks च्या पुस्तकांत पर्वतीच्या वाटेवर Waghoba Stone असल्याचें वाचलें होतें. तो तर हा नव्हे ! या बाजूस पेशव्यांच्या शिकारखान्यांतील वाघ बांधीत नसतील ना !

पर्वतीच्या तळ्याच्या पूर्व बाजूस सेटलिंग टँकजवळ एक तळ्यासारखाच खोलगट भाग आहे. त्यांत आतां बाग लाविली आहे. या बागेंत २।३ जुनीं देवळें व अस्ताव्यस्त पडलेल्या मूर्ति आहेत. एक मोठी विहीर आहे. एक महादेवाचें देऊळ आहे. जुनी मूर्ति नंदीसकट काढून नवी बसविलेली दिसते. वरील रोजनिशींतच दोन महादेवाच्या देवळांचा उल्लेख आहे–( पृ. ३०७ ).

२ महादेव

१ तळ्याचे कांठीं पूर्वेकडे

१ सोनभट याचे घरीं पर्वतीस जातांना तळ्याजवळ डावे बाजूस, यास

२

हा मळा बेताळ पेठेंत राहणारे रा. ताम्हणे यांचा आहे असें समजलें.

---

## ७९

# पुणें नगर पाहणी ( फेरी ४ थी )

## पर्वती परिसर

रविवार ता. २७ नोव्हेंबर १९४० रोजीं रा. कर्वे, डॉ. कर्वे ( बंगळूर ) व रा. कोल्हटकर यांनीं पर्वतीचा रमणा व भोंवतालची जागा हीं पाहाण्याची ठरवून सकाळीं ७ वाजतां पायऱ्यापासून प्रारंभ केला.

पायऱ्यांना लागून उजव्या हातास एक भिंत आहे. आंत उतरून गेल्यावर एक बंदिस्त आवार लागते. या ठिकाणीं पेशवाईत 'नग्गा' गोसाव्याचा मठ होता

म्हणतात. मध्यें एक उंचवटा लागतो, त्याला पायऱ्या असून कांहीं उंच जोत्याचें बांधकाम दिसतें. ईशान्येच्या कोंपऱ्यास खोल्यांचे अवशेष दिसतात. या मठाच्या बाहेर एक विहीर होती ती नुकतीच म्युनिसिपालिटीनें बुजाविली. आवारांत शिवलिंग होतें तें दिसत नाहीं.

या मठाच्या बाहेर आल्यावर उत्तरेच्या बाजूस वळलें म्हणजे टेकडीचे पायथ्याशीं एक पत्र्याचें लहान देऊळ लागतें. हे '**मांगीर बुवा**' नांवाच्या मांग व्यक्तीचें आहे. याला महारमांग लोक अद्याप भजतात व जत्रा भरवितात. या ठिकाणीं जातींच्या पंचायतीहि भरून न्यायनिवाडा होतो. हा मांग पेशव्यांच्या शिकारखान्यावर होता. या **शिकारखान्याची** माहिती ( पे. ब. १२४ ) मध्यें आहे. त्याला एका गेंड्यानें भोंकसलें व तो देवतारूप बनला.

**वाघोबा**—या देवळावरून पुढें पश्चिमेकडे गेल्यावर उजव्या हाताला एक पडका पार लागतो. यावर भोकें पाडलेले दगड आहेत. या दगडांना ' वाघोबा ' म्हणून पूजतात. पूर्वीं या दगडांना वाघ बांधीत. ते वाघ या जागेंत हत्तींशीं झुंज करीत.

**वेताळ**—या पुढें जरा गेल्यावर वेताळाचा चबूत्रा लागतो. हा वेताळ पर्वती गांवची ग्रामदेवता आहे. आजहि या ठिकाणी वेताळाची उपासना चाललेली दिसून येते. जागा स्वच्छ ठेवली असून थोडी बाग केली आहे. मध्यभागीं वेताळ आणि म्हसोबा यांचे दगड असून भोंवतालीं वेताळाचे स्वार म्हणून दगड मांडलेले आहेत. वेताळाचा जमादार " भांग्या बोवा " स्वार आणि वेताळ यांच्या मध्यें आहे. याला गांज्याची चिलीम वाहावी लागते. महाशिवरात्रीस येथें जत्रा भरते. या जागेशेजारून कालवा चालला आहे.

आणखी पुढें गेल्यावर कॅनालच्या पलीकडे एक दगडी आवार बांधलें आहे. त्यांत एक जुनी समाध दिसते. ही कोणाची आहे, हें संशोधलें पाहिजे.

**हरण बंगला कीं ससा बंगला**—" उत्तरेच्या बाजूस टेकडीच्या पायथ्याशीं एक गच्चीवर तुळशीवृंदावन दिसतें. त्यास हरणाचे आखर म्हणतात. तेथें पेशवाईंत हरणास दाणा-पाणी घालीत असत. कालव्याचे पलीकडे एक पडिक बंगला दिसतो. त्यांत हरणें ठेवीत; म्हणून त्यास हरणाचा बंगला म्हणतात " ( पर्वती संस्थानचें वर्णन, डिकेकृत १९१८ पृ. २० ).

" पांच सातशें ससे, काळे, पिवळे, अबलक असे पर्वतीचे वाटेवर बागेंत तऱ्याचे कांटीं खोली बांधून तींत ठेवले " ( पे. ब. १९२५ पृ. १२४ ). ह्यावरून हा ससा-बंगला कीं काय ?

**विहीर**—उत्तरेच्या बाजूनें वर चढल्यावर कार्तिक स्वामीच्या मार्गे एक लागतें. या शेजारी पूर्वेस एक चांगली विहीर आहे. हिला नुकताच रहाटहि होता व पाणी पिण्यासहि येत. शेजारीं एक दगडी कुंडी आहे.

**गुंफा**—दक्षिणच्या बाजूस टेकडीच्या पोटांत पूर्वाभिमुखी एक गुंफा आहे. तींत आनां तुडुंब पाणी आहे. मार्गे श्री विष्णु रघुनाथ करंदीकर यांनीं ती उपसून पाहिली होती. गुंफा दुघई दिसते. पुढें एक टाकें आहे.

**रमणा**—पायऱ्यांच्या दक्षिण बाजूस आंबील ओढ्याच्या पश्चिमेस मागील ओढ्यापर्यंत रमण्याची हद्द दिसते. रमणा १७५१ त बांधला. १७६३ त निजामानें जाळला. १७६५ त पुन्हां बांधला. १८०६ त दुरुस्ती केली. पश्चिमेकडची भिंत चढत चढत विष्णूच्या देवळापर्यंत गेली आहे. दक्षिणेची भिंत अद्याप चांगली शाबूत असून त्या ठिकाणीं एक मोठा दरवाजा दिसतो. आग्नेयेच्या बाजूस एक तळें आहे व शेजारीं मोठी खोली असलेली दिसते. रमण्याच्या उत्तर आणि दक्षिण टोंडाशीं दुहेरी तटाच्या भिंती आहेत. व तेथें चौथरे अद्याप उभे दिसतात. एक गणपतीचें ओसाड देऊळ झाडा-खालीं आहे. कोठें कोठें भिंतींचे अवशेष सांपडतात. हा रमणा श्रावण मासाखेरीज इतर वेळीं पेशव्यांच्या सैन्यासाठीं उपयोगांत येत असावा. रमणा आवारांत पूर्वेकडे एक लहानसें तळेंहि आहे. याला पांच दारें होतीं असे उल्लेख सांपडतात.

**गांववेस व धरण**—परत आंबील ओढ्यानें येतांना रमण्याची हद्द संप-ल्यावर पर्वतगांवचा तट लागतो. तो चांगला शाबूत आहे. वेशीहि दिसतात. बाहेर ओढ्याकाठीं स्मशान भूमि आहे. तींवर समाधी आहेत.

कालव्याच्या पुलाच्या अलिकडे जें **धरण** किंवा सांडवा आहे, तो **दादाजी कोंडदेवानें** बांधलेला असावा. त्यासंबंधीं उल्लेख कागदांतून सांपडतात. सांडवा अद्याप चांगला मजबूत आहे.

# विक्रयालय शाखा

सदर शाखा ही भा. इ. सं. मंडळाची ग्रंथविक्रीची एक पोट शाखा असून सदर शाखेमार्फत गरजू मंडळींस ऐतिहासिक दुर्मिळ पुस्तकें पुरविलीं जातात.

कांहीं पुस्तकांचे गट विक्रीस आहेत ते खालीलप्रमाणें:—

## १ शिवचरित्र कार्यालयः—

| नांव पुस्तकें | किंमत |
|---|---|
| शिवकालीन पत्रसारसंग्रह भाग १ व २ प्रत्येकीं ३८८ रु. प्रो | ७–०–० |
| शिवाजी निबंधावली भाग १ व २ प्रत्येकीं ३८८ रु. प्रो | ७–०–० |
| शिवचरित्र निबंधावली | ३–८–० |
| इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी | १२–०–० |
| चित्रमय शिवाजी | १–०–० |

सदर गटांतील पुस्तकें शिवचरित्रविषयक निबंधरूपानें व पत्ररूपानें असून शिवचरित्रावर नवीन प्रकाश पाडणारीं अशीं आहेत.

## २ ॲबट ग्रंथमालाः—

| | |
|---|---|
| १ भानुदास | रु. १–०–० |
| २ एकनाथ | रु. १–८–० |
| ३ भिक्षूगीत | रु. १–८–० |
| ४ दासोपंत | रु. १–८–० |
| ५ बहिणाबाई | रु. १–८–० |
| ६ स्तोत्रमाला | रु. १–८–० |
| ७ तुकाराम | रु. १–८–० |
| ८ रामदास | रु. २–०–० |
| ९ भक्तिविजय भाग १ | रु. ३–०–० |
| १० ” ” २ | रु. ३–०–० |
| ११ भक्तलीलामृत | रु. ३–०–० |
| १२ ज्ञानेश्वर | रु. ३–०–० |
| | २४–०–० |

सदर पुस्तकमाला अमेरिकन मिशनरी ख्रिस्तवासी जस्टिन इ. ॲबट यांनी इंग्लिशमध्यें लिहिली असून महाराष्ट्रांतील संतांची चरित्रविषयक माहिती यांत आहे.

**३ साधन-चिकित्सा—** ३-८-०

सदर पुस्तक उत्साही संशोधक श्री. वा. सी. बेंद्रे यांनीं लिहिलें असून यांत शिवशाहीच्या साधनाचा चर्चात्मक इतिहास आहे. या पुस्तकांत संशोधकांना विशेषतः नूतन संशोधकांना पुष्कळशी उपयुक्त माहिती मिळेल.

**४ नेनेकृत महानुभावीय वाङ्मय—**

| | |
|---|---|
| १ चक्रधरसिद्धांत सूत्रें | रु. १-८-० |
| २ दृष्टान्त पाठ | रु. १-८-० |
| ३ आचारस्थळ | रु. ०-६-० |
| ४ लीळा चरित्र भाग १ | रु. ०-४-० |
| ५ " " भाग २ | रु. ०-६-० |
| ६ " " भाग ३ | रु. ०-८-० |
| ७ " " भाग ४ | रु. ०-६-० |
| ८ लीळा चरित्र उत्तरार्ध | रु. ०-२-० |
| ९ शिक्षणकला व मानसशास्त्र | रु. २-१२-० |

सदर पुस्तकांतून महानुभावीय वाङ्मयाची माहिती असून महानुभावीय पंथांतील लोकांना हीं पुस्तकें फार उपयुक्त आहेत.

..........................................................................

वरील पुस्तकांशिवाय इतर ऐतिहासिक पुस्तकांविषयीं पत्रव्यवहारानें माहिती मागवावी.

मंडळाच्या 'स्वीय' व 'पुरस्कृत' ग्रंथमालेंतील पुस्तकांची यादी स्वतंत्र छापली असून ती मागविल्यास आनंदानें पुरविली जाईल.